रघुवीर सामंत

# जिवंत झरे

अमरज्योति
वाङ्मय

# जिवंत झरे

रघुवीर सामंत

— अनुक्रम —


१ पंढरीची वारी

२ रिकामा ग्लास

३ निमक हराम

४ हपूसचा अंबा

५ जीवंत झरे

६ दुबळ्यांची दुनिया

७ मोहाची फळं

८ नोकरी लागली!

For Any Book You Want—

THE
BOOK
CENTER
[Private Ltd.]
BOMBAY-28.

निरोगी जीवनासाठीं
प ळे का ढा
गेलीं २ तपें घरोघरीं
वापरतात.

आगामी
— रघुवीर सामंत वाङ्मय —
❀ 'भेटेन पुन्हां!' ❀
(प्रदीर्घ सामाजिक स्वतंत्र कादंबरी)
❀ पाप्यांचीं पितरें ❀
(सामाजिक कादंबरी)
चिमण्या जगाचे नेते!
(शालेय जीवनावरील कादंबरी)

# पंढरीची वारी

आषाढी—कार्तिकी कांहीं नसतांहि, आज दुपारींच पंढरीची वारी करून परतलोंय् मी! आल्यापासून मन अगदीं भरून आलंय्; म्हणूनच, सांगावंसं वाटतंय्—

तसा मी 'माळकरी' नाहीं, 'वारकरी' नाहीं; किंबहुना, माझी ही पहिलीच पंढरीची वारी! तीहि, केवळ योगायोग एक.

आणखी दुसरा योगायोग असा, कीं, जातांना बरोबर एका पुरचुंडींत मूठभर हाडं होतीं!...

कुठंहि टाकली, तरी माती मातीलाच मिळणार! तें समजायला कुठल्या धर्माचं असावं लागतं थोडंच, आपल्याला? पण त्या अस्थि मात्र चंद्रभागेच्या उदरांतच जायला हव्या होत्या; म्हणूनच, पंढरीला जाणं मला भाग पडलं!

मी दिलेल्या एका वचनाची ती पूर्ति होती.

माझ्या कुटुंबांतलीं पिकलीं पानं केव्हांच गळून गेलीं आहेत; वडिलांचं छत्र गेल्यालादेखील आठनऊ वर्षं होऊन गेलीं आहेत; सारे दूरचे, जवळचे नातलग—मित्र या घडीला तरी सुखासमाधानांत आहेत. बरोबरच्या त्या अस्थींत रक्तामासांचा संबंध नव्हता, तसा; मानल्या तर जवळच्या, नाहींतर अगदीं तिन्हाइताच्याच! एका सामान्य आशिक्षित कामकऱ्याच्या—आमच्या जुन्या घरगड्याच्या—होत्या त्या अस्थि!...

वास्तविक, नोकरी—धंदा—व्यवहार, कसलाच आतां संबंध उरला नसतांहि आपल्याच पावलांनीं त्याचा पांडुरंग त्या दिवशीं अकस्मात् माझ्या घरीं

चालत आला; बापाच्या उरल्या अवशेषांचं तें बोचकं, त्यानं आमच्या पॅसेंजच्या कोपऱ्यांत ठेवलं; तेव्हां, तो न बोलतांहि, ती बातमी मी जाणली.

उभ्या उभ्या, चारदोन प्रश्नोत्तरानंतर, एका अनुनुभूत जाणीवेनं नि संमिश्र भावपूर्ण नजरेनं, मी पुन्हां एकदां बाहेर पाहिलं. मग भरभर माझी छोटी बॅग भरली व त्याला म्हणालों, "चल!...पाऊण तासांत गाडी आहे कुर्डुवाडीची. ....निघूं या. सांभाळून घे हं ऽ अलगद्...."

माझीं मुलं, त्यांची आई साऱ्यांच्या त्यावेळच्या चमकल्या डोळ्यांत आश्चर्य होतं; 'कुठं ?' हा प्रश्न तरंगत होता; त्या क्षणच्या माझ्या तसल्या वागणुकीचं माझं मलाहि नवलच वाटत होतं !

तरी, बाहेर पडतां पडतां, मी त्यांना हळूच एवढंच म्हणालों, " आपला तान्हू ऽ !....तो गेला बरं गेल्या गुरुवारीं ! या पांडुरंगाबरोबर पंढरीला जाऊन आलं पाहिजे आहे, चार दिवस—"

*

गाडींत पांडुरंगानं मला सांगितलं,—

" अगदीं पंधरवड्यापूर्वींपर्यंत तो सर्वद्यांकडल्या घरकामावर होता. गेलीं दोन वर्षं, तो अधूनमधून घरीं यायचा; पण फक्त शिमग्या–राबाला; पेरणी–आवणीला; गौरी–पित्रीला; दिवाळीला नि झोडणी–मळणीला. ' पुरे कीं नोकरी,' असं कधीं आया बोले; तं हंसून म्हणे तो–' अग, तूं हाईसच कीं घरीं ! हीं कामकरी हाडं माजीं; आखिरपावेतो,...तीं कामांतच झिजलीं पायजेत ! त्यांतच समद्यांचं कल्याण हाय् !".

" नाहीं म्हणायला, आवंदा आगोठीला मात्र चांगली ' दोन वारांची ' रजा घेऊन आला होता. रस्त्यावरल्या नव्या घराचं काम काडलंन् ! चिखलांत जुन्या विटांची पडवी उभी केलीन्; भिंतींत तुमच्याकडल्या दोन खिडक्या, दोन दारं उभारलीन्; तुमच्या जुन्या 'वाशीका'चा माळा उठवून, वरूनहि घर कौलारलंन्; जमनी चोपल्यान् सगळ्या, तुळतुळीत....

" त्यावेळीं, एकदां सांजेचा, मला हांक मारून बाबा म्हणाला,— ' पांडुरंगा ऽ ! बग !...आतां रस्त्यावरल्या घराची आपली ही पडवी– तुझ्या म्होरल्या सालच्या किरण–दुकानाला ब्येस जागा झाली ! नाय रे ऽ ? चला, विठाईच्या कुरपेन् ' व्याज ' न घेतां बी, चारी पोरी उजवल्या; दोन



कौलारं झालीं; चार शेतं झालीं. तुझी विद्या झाली; तुज्या आयेला बी आधार झाला ! अरे ऽ , ह्येच आपलं समाधान !! बापजाद्यांचं काय बी नको बरं ऽ आपल्याला ! मी तसं सांगून बी टाकलंय् तुज्या चारी चुलत्यान्ला; ध्यानी घे, हो ऽ व् ! आतां उरलं येक–तुजं लगीन; काय ? आन् पुंडल्याचं फायनल शिक्षण !....त्ये मातर नाय् दिसनार–झेपनार मला; पिकलं पान ह्ये ! कवा बी झडेल !...ऋण काढून तू सण नाय् करायचा ?....अरं ऽ....माज्या नाय् , आन् तुज्या बी बापान् नाय् करज् ठेवलं;....तूं बी संबाल होव् ! अडीच-तीन वर्साचा तुजा चाकरीचा पैका जमा हायेच तुज्या मालकाकडं;...अगदीं हात लावूं नको, बरं कां ? म्होरल्या दसऱ्याला चांगलं वीस 'विसा'बी व्हतील ! अं ! तवांच घे ! कमजास्त लागले तू दादाकडं जा दादरला !....पर आदीं मातर घाल हितं तुजं इयकासचं दुकान !...आन् मंग,....आवडीसवडीन् कर तुजं लगीन् ! ...बरं ? "

*

कान टवकारून ऐकत होतों मी—मुलाबरोबरच्या तान्ह्याच्या त्या हितगुजांत, त्याच्या साऱ्या एकमार्गी लांबच लांब जीवनाचं जणूं प्रतिबिंबच पडल्याचा मला भास झाला.

त्याच्या मनाचा तो स्वाभिमानी पीळ !...यामुळंच, बारा तेराव्या वर्षीं, शिक्षण मधेंच टाकून, तो बापाकडून पळाला होता; रस्त्यावर खडीच्या टोपल्या टाकून, अर्धमुर्ध कां होईना, पण स्वतंत्रपणें पोट भरूं लागला होता. पाट लावून बापानं घरांत आणलेल्या त्याच्या नव्या आईचा तो तोरा ! तिथं तरी त्याच्यावर तरी तो चालणार नव्हता; तेंचं त्याचं कणखर समाधान होतं;—त्यांतच त्याच्या मनगटाचा खरा जोर होता !—

आपल्या उत्साही कामसूपणामुळंच, चारपांच वर्षांत, तान्ह्या आपल्या मालकाच्या मर्जीतला विश्वासू नोकर झाला होता. कंत्राटदारानं, आपण होऊनच, त्याला लग्न करायला रक्कम काढून दिली होती; तान्ह्यानं गांवांतलीच एक मुलगी निवडलीन्; पण, न विसरतां, तो बापाच्या दारीं गेला; नि आपल्या लग्नाचा वडिलधारा मान त्यानं बापालाच दिला. तेंच आपल्या कुलशीलाला साजेसं, असं वाटलं होतं त्याला !

लेकाचं लग्न तसं परस्पर त्याच्याच कमाईनं उरकलं; त्यानं बाप खूप लाजला; तान्ह्याला आपल्याच घरीं संसार थाटायचा आग्रह करूं लागला.

तेव्हां मात्र, विशी आंतबाहेरचा तान्ह्या म्हणाला, "नको...बाबाऽ! हाय् ह्येच ब्येस!.... तुजा संसार वायला;....माजा वायला!...आज घडीला त् माज्या माथ्यावर हाय् मालकाच्या करजाचा डोंगर; असला ल्येक तुला र काय कामाचा? म्हातारपनीं मातर, माज्याकड तूंच येऊन ऱ्हा, मजेंत, हावंऽ तितकंऽ दिस! त्येवडी बरीक हिंमत हाय माजी मला!!....कसं म्हनतोस?...बोल!!"

त्या समंजस उत्तरानं, तान्ह्याचा प्रेमळ बाप लाजेनं अधिकच काळवंडला तो बाईलबुद्ध्या होता; आतां, चार नव्या कच्च्याबच्च्यांचाहि धनी झाला होता; तरी पण, त्याचे डोळे आसवांनीं डबडबले त्यावेळीं. तसा भावी काळच्या सुस्थितीचा तो विश्वास, ती अमाप हिंमत,...तान्ह्याला मनांत कां वाटली?

आपले अविश्रांत श्रम, हुकमी काटकसर, कामसू बायकोची सर्वांगीण मदत नि देवावरली मनापासूनची श्रद्धा;... हेच त्यावेळींचे त्याचे आधाराचे चार खांब! नि त्यांवरच, आपल्या संसाराचं नवं छोटं घरकुल त्यानं मोठ्या आत्मविश्वासानं उभारलं! ना कसलं व्यसन, ना कुठली खोटीनाटी शान; वर्षामागून वर्षं गेलीं. तान्ह्या वाढला—त्याचं जग वाढलं!...

कशा कोण जाणं, जीवनाच्या मर्यादा तान्ह्याला अगदीं नैसर्गिकपणंच कळत! चैनी कंत्राटदाराच्या आपल्या मित्रांबरोबर खाण्यापिण्याच्या स्वैर बैठकी होत; स्वतः तान्ह्याच साऱ्यांना ग्लासं भरून देई; आधींच साऱ्या तयारीपासून अखेर बैठकींत होणाऱ्या रोडेची साफसुफी करीपर्यंत, तान्ह्याच सारं निमूट करी. पण कधीं त्यांतला एखादा ग्लास ह्याच्या ओठापर्यंत वर सरला नव्हता! त्याचीं त्यालाच त्याबद्दल धन्यता वाटे.

एकदां तर,...मोठ्या लहरींत येऊन, मालकानं स्वतःच त्याला 'ध्यायचा' खूप आग्रह केला; पण तेव्हांहि, तो अदबीनं पण आत्मविश्वासानं म्हणाला होता,—" नाय नाय!...हात जोडतों!... तेवढं बरीक नका सांगूं, शेट!! ऋणको गरिबाचं काम नाय बगा ह्ये!...मी असा मेलों, त् मंग करज कोन फेडील तुमचं?...... माजी कच्चीबच्चीं कोन् संबाळील?...तुमचं आपलं



खुशाल चालूं द्या!... हा माजा इमानी चाकरीचा धरम् तेवडा हाय;.... कामांत कदी कसूर नाय होणार माजी!...."

त्याक्षणीं मालकाची नशा खाडकन् उतरून, त्याचा चेहराहि क्षणभर काळवंडला होता. पुन्हां कधीं तान्ह्याच्या वाटेला गेला नव्हता!—

*

पुढल्या चारपांच वर्षांत, तान्ह्या नुसताच कर्जमुक्त झाला नव्हता; तर त्यानं आपल्या गांवांत पाऊणशें शंभराची शेतजमीनसुद्धां खरेदी केली होती. मालकानं त्याला मुकादम करून, पगारहि वाढवला होता. नवरा-बायको दोघंहि श्रम करून घरांत पैसा आणीत होतीं.

डाळ-भात-नदींतली 'फुकट' भाजी, हा त्यांचा मुख्य खर्च!...मग, महिन्यानं एकदां, तेल-तिखट-मीठ चिंच;...उपासा-सणाला कधीं गुळाचा-तुपाचा छटाक;...दिवाळीला रवा-तूप-साखर इ. लाडवाचं सामान नि दोन-तीन फटाक्यांच्या पेट्या; असं त्याचं, बघबघतां, वर्षंहि निघून जाई.

याउप्पर आणखी थोडा खर्च असे...तान्ह्याच्या घरधनीणीला, जुनेऱ्यां-बरोबरच गुढग्यापर्यंतचीं दोन नवीं लुगडीं; त्याला स्वतःला, दोन कोपरी-कुडतीं, दोन 'ढोपरीं' धोतरं नि (गांधींच्या चळवळीपासनं) दोन पांढऱ्या गांधी टोप्या; चार पोरींना झबलीं, टोपरीं चिरगुटं-गोधड्या;...

पण मग, त्याशिवाय दुसरी आणखी गरज ती कसली त्याची?...

दारूला तर तान्हू कधींच शिवला नव्हता. सुरुवातीला कुडाच्या विड्या तेवढ्या ओढी; पण खर्च जास्त, म्हणून मग, तो आपल्यांचीं पानं-तंबाखू-चकमक यांवर आला. पुढं, तें टाकून, पानसुपारी नि तंबाखूची चंची बाळ-गलीन्, पानं महागतांच, सुपारीच्या खांडाबरोबरच तो तंबाखू चघळूं लागला; सुपारीहि महाग होतांच, तो फक्त चुन्यानंच तंबाखू मळून, 'बार भरीत' पिचकाऱ्या टाकूं लागला.

तरी अखेर, त्याचं कोष्टक जमेना; म्हणून, आपल्याला फक्त दोनच पैशांच्या 'चिमटीभर' खर्चांत टाकणाऱ्या तपकिरीच्या डबीलाच, आपल्या साऱ्या व्यसनांची हौस त्यानं चिकटवली. ती मात्र, अगदीं अखेरपर्यंत; ती त्याच्या नाकाला कायमची चिकटलेली असे-दिसे!

या बाबतींत तान्ह्या एकेकदां गंभीरपणें म्हणे,–"असं हाय् बगा ! ज्ञानोबा–तुकोबा म्हणतात—माणसाच्या मनाचं येटोळं अफाट अफाट असतं; काबू नसल्, तर् तें मावायला समदं जग बी नाय पुरणार !.. मंग्, आपल्या हातरुना-बाईर आपला पाय नेईल, तो छंद काय कामाचा आपल्याला ?.... 'असा धरि छंद...जाय् तुटोनिया, भवबंद !...छंद लागला टिटवीला....तिनं समुद्र बी मंथन केला !' मंग सांगा–यसन् आपल्याला मारील, का आपन यस्नाला मारूं ?...बोला !! "

*

असल्या त्याच्या हजार गोष्टी आठवताहेत आज. पण सांगायला वेळ नाहीं; कदाचित् कंटाळालहि तुम्ही...

एक मात्र निश्चित !...खूप खूप श्रम करूनहि, तान्ह्याच्या संसारांत, पैसा एकंदरींत फारच थोडा शिरला!–तरी पण, तो तसा एकदां शिरला, कीं, तान्हूच्या बळकट सांपळ्यांत तो कायमचाच सांपडलांच, म्हणून समजावं !... त्याच्या, घरकुलांत कसली ना कसली कायम व्यवस्था केल्याशिवाय, त्याच्या हातून बाहेर निसटायची, त्या दिडकी–पैशाचीहि बिशाद चालत नसे !!—

...नि तसं करत करतच, तान्ह्याच्या संसाराचं खटलं, असं... इतकं... वाढत गेलं होतं !—

स्वतःच्या मालकी जागेवरलं राहतं झोपडं; मागल्या दारची दुभती शेळी; खुंटाला बांधलेले दोन बैल; जवळ सोडलेली काबाडी गाडी; नांगर; एक गाय–वासरूं; कोंबड्या;...असं सारं सारं लटांबर वाढतच गेलं होतं !—

घरांतल्या चार भिंतींतलं लटांबरहि तसंच वाढलं होतं !—

काशी, वाराणशी !.... चंद्रभागा-भीमा !...पांडुरंग—पुंडलीक !...अशा एकेका जीवाच्या अवतारांबरोबरच, एकेक तीर्थक्षेत्र नि सारी पंढरीच, त्यानं आपल्या घरांत, कायमची साक्षात् वसवायला आणली होती !.... कारण, प्रत्यक्ष यात्रेचा खर्च, त्याच्या हिशेबीं, त्याला परवडणारा नव्हता !...

तान्ह्या स्पष्टच म्हणे,—"संसार सोडून, कर्ज करून, आपल्या मागं धांवत ये, असं देव थोडंच सांगतो आपल्याला !–तोच येईल. हवं तर् सवता भेटायला, एक दीस ! ...कसं ? बोला ! ! "

*



आणि अखेर, चार मुलींच्या पाठीवर, कित्येक वर्षांनीं, त्याच्या घरांत तो भेटायला आलाच !....पहिल्या पगाराला घेतलेला तुकोबाचा गाथा, त्याच्या घरांत होताच, इतकीं वर्षं; सांजसकाळ वापरून वापरून आतां त्याची सुटी पोथी झाली होती. तान्ह्यानं मुलाच्या बारशाला सबंध पारायण केलं, गाथ्याचं ! घरच्या घरीं, आपल्या आपणच 'माळ घेतली;' नि मोठ्या भक्तिभावानं, त्यानें मुलाचं नांव 'पांडुरंग'च ठेवून दिलं !—

....त्या दिवसापासून तान्ह्यानं स्वतः 'वशट' सोडलं; कधीं चुकूनहि 'तांबड्या पाण्या'चा संपर्क नको, म्हणून,...कंत्राटदारकडली ती फायदेशीर नोकरी सोडली; पण, होती ती मैत्री कायम ठेवून; त्याच्याचकडल्या शिफारशीवर नवी घरकामाची नोकरी मिळवून...

जणूं पारख करूनच, माझ्या धार्मिक वडिलांच्या घरांत, तान्ह्या तसा ( आपल्या चाळिशीच्या आंतबाहेर ) शिरला होता. त्याला आतां, त्यापुढें, सुसंगति नि संथ आयुष्य हवं होतं.

माझ्या वृद्ध वडिलांच्या अंगाला तेल लावतांना, पाय चेपतांना, डोकं 'थापतांना,' दोघांच्या दिलखुलास गोष्टी चालत. ब्रह्मदेवापासून किडामुंगीपर्यंत नि चर्चिलपासून गांधीपर्यंत, सर्व विषय त्यांत येऊन जात. मालक-नोकराचं औपचारिक नातं तिथं साफ विरघळून जाई. तुकोबाचे अनेक अभंग तान्ह्यानं घडाघड पाठ म्हणावेत; नि त्यानंतर भाष्य करून, बाबांनीं त्याला ते समजावावेत; किंवा एकोबाज्ञानोबांच्या ओव्या बाबांनींच एकेका ओळीचा अर्थ लावीत तान्ह्याला म्हणून दाखवाव्यात. भक्तिपाठांत, ते दोघेहि अगदीं तसे पटाईत होते; म्हणूनच, त्यांचं बघतांबघतां मेतकूट जमलं होतं !—

*

माझ्या विशीपासून, तो मी स्वतंत्र संसार थाटून, ऐन तिशींत त्यांत पुरा गुरफटेपर्यंत, तान्ह्याला आमच्या घरांत तसा वावरतांना मी पाहिला होता. पुढं, लढाईच्या महागाईत, जास्त कमाईसाठीं, तान्ह्या खडीकामावर रोजंदारीला निघून गेला.

पण, जाण्यापूर्वीं कोणाशीं कसलं भांडण नाहीं, तंटा नाहीं; रागारागीचा एखादा शब्दहि नाहीं. महिनाभर आधीं सांगून, जातांना बाबांच्या पायां पडून, तो म्हणाला होता,–" लय् वाढता खर्च; आतां भागत नाय् !...संसार

सावरायलाच नोकरी सोडतोय ! पन मानसं, घर,... नाय् सोडलंय हो !....तें सारं माजंच हाय ! आन् मी व् तुमचाच हाय !...मध्यानरातचा निरोप द्या;...धांवत येन् बगा !"

ते त्याचे शब्द खरेखुरे नि जिवंतच होते. तान्हूंच जाणं–येणं पुढंहि तसंच राहिलं. बाबांच्या आजारांत नि अखेरयात्रेला, तो न बोलवतां, आस्थेवाईकपणं हजर होता. त्यांच्या पश्चात् तो माझ्याशींदेखील आजतागायत कसा ना कसा निगडित होताच.

मग, वर्षांमागून वर्षं गेलीं होतीं. दिवस फार महागाई–जिकीरीचे आले होते. गरीब–श्रीमंत, सारखेच भरडून निघून, हवालदिल झाले होते. त्यांतूनच, मी माझी नि तान्ह्या त्याची वाट काढीत, आम्हीं पुढं गेलों होतों.

पण, इतक्या गडबडींतहि, चारदोन महिन्यांनीं, अगदीं न चुकतां, तो माझ्या घरीं मुंबईला फेरी मारी; हक्कानं चहा घेऊन जाई. केवळ, चार प्रेमाच्या साध्या गोष्टी–गप्पा, हाच त्याचा हेतु असे. म्हणे,–" बाबाशेटची पुरी संगत लाभली नाय मला !....आतां तुमची तरी हुकवायची नाय जीव हाय तंवर..."

...या साऱ्या आठवणी–जाणीवांनींच,... धांवत्या डब्यांत, त्या वरल्या बांकाच्या साखळीला लटकून डुलणाऱ्या, त्याच्या अस्थींच्या पुरचुंडीकडे माझं एकदम लक्ष गेलं.

'आपल्याबरोबर पंढरीच्या वारीला जणूं तोच निघाला आहे,' असा भास झाला मला;....नि वाटलं....गाडीच्या ठेक्यावर, भावपूर्ण घोगऱ्या आवाजांत तो माझ्यासमोर भजन म्हणत आहे– 'पांडुरंग दाऽरीं ! पंढरीची वाऽरी !! पांऽडुरंग दारीं ! पंऽढरीची वारी !!'

*

यावरूनच, तीन वर्षांपूर्वीची तान्ह्याच्या मनाची ती गडबड, धडपड एकदम आठवतेय् मला—

त्या दिवशीं, तो सकाळींच, माझ्या बिऱ्हाडीं मुंबईला थडकून, उभ्या उभ्याच एकदम म्हणाला होता,–" रामपारचा मुद्दाम आलोंय् आज मी, दादा !...आतां नोकर नाय तरी बी तुमचाच हाय ना मी ? तवा दादा, या वख्ताला, तुमी जरा थोडी चाल कराया हवी,....माज्यावर !"



" चाल करायची ? " मला अर्थ समजेना.–" बस तर खरा आधीं खालीं, तान्हू; चाल पुढें बघूं..."

खालीं बसून, मोकळेपणानं तो सांगू लागला मला—" एक झकास ठिकान हेरलंय, दादा, आमच्या भिमीसाठीं ! तसे आमच्यांत त् समदेच पोरीसाठीं 'व्याज' घेतात खूप; पर मी काय पैका घेऊन पोरी विकनारा नाय, दादा ! आतांपावतों, पयल्या तिघा पोरींना नाय उजवल्या मी तशाच ? आज अफाट म्हागाय हाय ! पन् म्हणून काय, या आखीर वख्ताला आपली अब्रू विकून पैका करायचा ? छे छे !... तवां, बगा, काल व्यायी मानसं आलीं, त्यांना मी साफ बोललों—' देनं घेनं काय नाय !—पर, मांडवांत दारू नाय, कोंबडं-बकरी नाय चालनार मला–!' ही माजी पयली अट–"

" अरे वाऽ तान्ह्या ! आमच्यापरताहि अधिक सुधारक झालास कीं रे तूं !" मी कौतुकानं उद्गारलों.

तोंच, तान्ह्या हंसत पुढं म्हणाला—" हां,... मी बोललोंय त् खरा !–ते बी कबूल झालंत् !... पर, मनांत लय भ्या वाटतंय–या म्हागाईत येळेवर श्याशंभराची नड पडल्-का काय ? रामपारीं तुमच्या दारांत म्हनून आलों !... माज्यासाठीं तुमाला आज एक हिरवी नोट काडावी लागनार, दादा !... चारांपैकीं एक शेत घ्यावं लिवून; हवीत त् 'परमेश्वरी'बी घ्या ! तसे गांवांत मारवाडी मला मोप...पैसापासरी मिळतील देनारे; पन् त्यांचा वारा बी नकोय मला !...म्हनून तुमाला तरास हा !...कसं म्हनतां, दादाऽ ?...पळून जाईन मीऽ ?? "

मीहि क्षणभर गपचुप विचार केला; मग, चटकन् कपाट उघडलं; लखोट्यांत दुमडून ठेवलेली शंभराची (ठेवणींतली, शिल्लक) नोट काढली नि ती तान्हूच्या हातीं देऊन, मी हळूच म्हणालों,–" घे, संभाळ ! वेंधळ्यासारखी टाकशील हं कुठं तरी ! नीट निऱ्यांमधें बांध !..."

*

त्याक्षणीं त्याची दृष्टि कृतज्ञतेनं ओतप्रोत भरली होती. तरी, क्षणभर घुटमळून, तो मला म्हणाला,—" परऽ दादा ऽऽ याची चिटी-पावती ? माजा कागद घेतां ना लिवून ? "......

घरांतून आलेला चहाचा पितळी कप त्याच्यापुढं करीत, मी त्याला हंसून म्हणालों,—" वेडाच का रे तान्ह्या , तूं ?...एकवेळ, नाहींच म्हटलं

असतं मी, सरळ !... पण दिल्यावर, कागदाचीं चिठोरीं करून घेण्याइतका मूर्ख नाहीं मी !.... त्यांचे तुकडे करून, शंभर रुपये होणार आहेत थोडेच ? तूं असलास, तर देशील, केव्हांना केव्हां ! होईल पुढं मागं ! पण, तुझीच बँक बुडाली, तर काय तुझ्या जमिनींत नि तुझ्या पांडुरंगाच्या खिशामधें शोधणार मी माझा पैसा ? अरे तान्ह्याऽ, जायचेच् असले हे माझे पैसे, तर तूं नि तुझा पांडुरंगच काय... साक्षात् देवदेखील आणून देणार नाहीं मला !...जाऽ, कार्य पार पाड आधीं ! निश्चित मनानं जा हो ? ”

तान्ह्या,....दांताखिळी बसल्यागत उठला नि पाणावल्या डोळ्यांनीं माझ्याकडे पाहात, जायला म्हणून उघड्या दाराकडे वळला.

तितक्यांत, एक आठवण होऊन, मी खिशांतलं पाकीट काढलं, नि पांचाची एक नोट त्याच्यापुढं करीत म्हणालों,–“ हं...हे घेऽ !...तुझ्या भिमीला हा आमचा अहेर...आशीर्वाद !—”

तान्ह्यानं ती गपचुप खिशांत घातली, गद्गदून हात जोडले नि जातांना पुटपुटला, “ हें त् दादाऽ, तुमच्याच रकमेवरलं मलाच उलट याज झालं तुमचं ! पंढरीऽनाथ !....”

तान्ह्या गेल्यावर, माझ्या मनांत कितीतरी वेळ, एक अपूर्व समाधान तरंगत होतं !...पांचपंधरा, दहावीस करीत, वर्षभरांत, सारी रक्कम तो पुरी करील, असा मला मनांत विश्वासहि वाटत होता !—

*

पण काय आश्चर्य ! अवघ्या दहाबारा दिवसांतच तो परत आला.

त्याच्या त्या नव्या येण्याचा मला उलगडाच होत नव्हता.

बरोबर मळ्यांतली तीजी भाजी होती. इथंच कोपऱ्यांवर घेतलेला, लग्नाचा म्हणून, बर्फीहलव्याचा मोठा पुडा त्यानं माझ्या मुलापुढं केला. मोठ्या खुषींत येऊन, तोंडानं तो भिमीच्या लग्नाचं वर्णन करीत होता. मी यायला हवं होतं, म्हणून प्रेमळ तक्रार करत होता.

चहापाणी झाल्यावर, तान्ह्या जायलाहि उठला.

तरी पण-तेवढ्यांत, तो थबकला, रेंगाळला, घुटमळला !



मला अचंबाच वाटला, तें पाहून; क्षणभर, मनांत वाकड्यातिकड्या शंकाकुशंकाहि गेल्या येऊन, त्याच्या हेतूबद्दलच्या ! वाटलं, ‘ आणखी मागणी आहे कीं काय ? ’

पण तेवढ्यांत, आपल्या निऱ्यांमधून, तान्ह्यानं पैशाचा कसा बाहेर काढला; त्याचे बंद सोडले; नि मग, आंतून दहाच्या तीन, पांचाच्या सहा, दोहोंच्या पांच, एकाच्या वीस नोटा काढून ठेवून, अधेल्या-पावल्या-चवल्या आणेल्यांच्या दहा राशी त्यानं माझ्यापुढं मांडल्या.

आणि मग, हळूच म्हणाला—“ जरा मोजून बगा, दादा !—”

*

समोरचं तें चमत्कृतिपूर्ण अपूर्व दृश्य पाहून, आश्चर्यानं बेशुद्ध पडायचीच माझ्यावर पाळी आली होती !

मी अडखळतच तान्ह्याला विचारलं,—“ हें....हें...हेंऽरेऽकाय, तान्ह्या ? ”

“ हे मी तुमचे नेलेले पैसे, दादा ऽ !” मोठ्या अभिमानानं नि आपुलकीनं माझ्याकडे पाहून, तान्ह्या हंसत म्हणाला,–“ आधीं मोजून ते पदरांत घ्या कसे !....उदंड आयुष्य देईल तुमाला, पंढरीराया ! ”

“ पण इतक्या लौकर ?...सगळेच्या सगळे ??....” मी तर पार तिरिमिरल्यासारखा झालों होतों. “ त्या दिवशीं ते नेलेस कशाला ?...नि आतां हे आणलेस कुठून ?....पक्का लबाड आहेस तूं !... ”

मनांत क्षणभर वाटलं– ‘ म्हाताऱ्यानं केवळ परीक्षाच नाहीं ना पाहिली माझी ? ... ’

तेव्हढ्यांत तान्हू हंसत म्हणाला–“ अहो ऽ पन् दादा ऽ ! मला का सपन् पडलं व्हतं ?...हा समदा अहेरच जमलेला !...देनाऱ्यांनी तो परतायचा, तो पुढं मागं; तवा मंग, म्हनलं, ठेवून काय करूं माज्यापाशीं ह्ये विष ? तें तसंच भाईरच्या भाईर तुमच्याकडं आणून पोचवलं, तरच म्हनलं, त्याचं अमृत व्हईल ! तवां...म्हनून धांवत आलों, आजच्या आज !...घ्या....दादा ऽ ! ...आतां पुनां कवा, रातीच्या पोटांत तुमच्या म्होरं हात पसराया मला, माज्या पांडुरंगाला जागा झाली ! आन् तुमाला बी, कदीं माज्यावर उजून चाल कराया मोकळीक ! कसं म्हनतां ?...बोला ?? ”

विविध भावनांनीं मी अगदीं गुदमरलों होतों !

तरी मी हंसून तान्ह्याला म्हणालों—“ अरेऽ, मला आतां कांहीं म्हणायला, मींगं आणखी बाकी ठेवलं आहेस काय तूं ?—तरी पण, मी म्हणतों—मीच शहाणा आहे, तान्ह्या ! त्या दिवशीं, तुझं ऐकून, तुझं लिहून घेतलं असतं, तर आज असा हा हातोहात मूर्खच ठरलों असतों कीं रे मी !...तूंच माझं हंसत हंसत नाक कापलं असतंस ! मग ? आहे ना मी शहाणा ?....काय ? ...कसं म्हणतों ? ”

आम्ही दोघेंहि त्यावर समाधानानं मोठमोठ्यानं हंसलों.

*

अशी ती पांच वर्षांपूर्वींची गोष्ट !...अद्‌भुत, असामान्य !—

आणि चार दिवसांपूर्वीं, तान्ह्याचा पांडुरंग एकाएकीच माझ्या दारीं आला; आपल्या बाबासाठीं, मला बरोबर घेऊन, पंढरीला निघाला. ! मीहि मंत्रमुग्धाप्रमाणं चटकन् उठून, त्याच्यामागून पंढरीच्या वारीला गेलों !...

त्या साऱ्या घटनेमागील जाणीव ! तोहि सहजच घडलेला दुसरा प्रसंग;... त्या आठवणीनं मी चारदोनदां तरी चपापलों होतों—माझ्या मनांत, पुनः पुन्हां, ती एकच स्मृति भुतासारखी उभी राहात होती !

‘ तान्हूबरोबर व्हायची पंढरीची वारी !—’

तें झालं होतं असं—

माझ्या जुन्या घराचं सामान खूप घासाघीस करून त्यानं माझ्याकडून खरेदी केलंन्....मला वाटतं, आठदहा महिने होऊन गेले त्या गोष्टीला. तीच तान्हूची--माझी अखेरची भेट ! रक्कम रोख माझ्याकडे चुकती केलीन् नि निघतां निघतां, तान्हू म्हणाला,—“ गांवगाड्यावरलीं माजीं घरं-शेतं बघायला ‘ येईन येईन ’ म्हणत आलां, इतकीं वर्सं...दादा, तुमी !... पर आजपावृतों कदींच जमलं नाय् ना तुमाला ?....ब्येऽस बाऽ ! मर्जीऽ तुमचीऽ !... अगदीं देवासारकंच झालं कीं ह्ये !...ठरलं !...आतां मातर, कदीं बी पुनां बोलावनार नाय् होऽ मी तुमाला !...‘पतित पावन नाम ऐकुनी आलों मी दारां;... पतित पावन न व्हसी म्हनुनी फिरतों माघारां !!....”

“ जमलंच नाहीं बघ...” त्याच्या त्या नामदेवी टोमण्यानं मनांत मी ओशाळलों होतों; तरी हंसून म्हणालों....“ तरी पण...मी कांहीं देव नाहीं



बरं, तान्ह्या, तुझा ! म्हटलं, तर तुझा देव आहे एक,...तुझा पांडुरंग...तुझ्या गांवाला !...नि एक देव तुझा राहिलाय तिकडे...पंढरीला ! काय ?...खरं ना हे...तान्ह्या??....”

“ तेंऽका बरंऽ, दादा ?...” तान्ह्या पटकन् आवेगानं म्हणाला होता—“ अवो .. देव त् तुमच्यांत् हाय, माज्यांत् बी हाय !.... पंढरीला हाय तसा तो हितं बी हाय !! बघायला मातर डोळ हवंत् !! ”

पण मग, तेवढ्यांत, कसल्याशा नव्या कल्पनेनं तान्ह्याचा चेहरा मोहरला; एकदम फुलला; नि तो मला चटकन् म्हणाला—“ बरं पन्, दादाऽ,...आमचं गरिबाचं गावडं घर-दार येक ऱ्हाव् द्या !.. पर आतां मागं बोलल्यापरमानं, संगतीनं येकदां पंढरीच्या यात्रेला मातर जाऊं या !.... काय ? येत्या आषाढीला येतां ?....बोला ?”

“ आपल्याला नाहीं रे बुवा वेळ !” तान्ह्याला थोडं खिजविण्यासाठींच मी म्हणालों—“ अरेऽ,...नुक्तंच म्हणालास...पांडुरंग नि पंढरी इथंच आहे म्हणून ! मग रे ही यात्रा तुला मला हवी कशाला ?— आपल्याकडे तर बुवा पैसेहि नाहींत, प्रवास खर्चाला, पंढरीच्या वारीच्या—”

“ आरा ऽ...रा ऽ....रा... ! अगदींच नास्तिक होव् नका असं, दादा ऽ ! ” माझ्याबद्दल अगदीं खराखुरा कळवळून, तान्ह्या म्हणाला, —“ अवो ऽ येळ नसेल त् मुद्दाम काढला पाहिजे !...आन् तुमच्या ऽ कड् बी जर पैसं ऽ नसतील, त् सवता मी ऽ करतों निम्मा खरच !....पर तसं कशाला ? समदा ऽ च खरच करतो द्या मी तुमचा;...चला ! पर घरांतून आदी बॅग—वळकटी घेऊन भाईर तू पडा ? हमाल बी घरचाच - हाय मी ! —फुलावानी जाल, फुलावानी याल् ! ”

त्या क्षणाच्या त्याच्या लकलकत्या डोळ्यांत, त्यामागल्या त्याच्या साऱ्या भावनांची उत्कटता स्पष्ट दिसत होती. त्यामुळंच, मला मनांत एकदम ओशाळल्यासारखं वाटलं....

तेव्हां मग, मीच त्या बोलण्याला पटकन् नवी कलाटणी देऊन म्हणालों, “ बरं...बरं !...वेळ मिळाला, कीं, आतां जाऊं हंऽ केव्हां तरी !....नि जाण्यायेण्याच्या खर्चाचं असं करूं आपण;....माझा अर्धा खर्च तूं करायचा नि तुझा अर्धा खर्च मी करायचा; मग तर झालं ?...”

अशिक्षित असला तरी तान्ह्या तसा हिशेबांत पटाईत ! माझ्या बोलण्यांतील ही ' हिशेबी थट्टा ' त्याला पटकन् समजून, तो मोठमोठ्यानं हंसला.

मग पुन्हां खुलून, तो मला हळूच म्हणाला,––" थट्टा पुरे, दादा !... जायचं कवा ? बोला ? ..."

" मी म्हणेन तेव्हां...." मी हंसून म्हणालों,–" किंवा तसं कशाला ? पुढल्या वर्षी ठरवणार असशील, तर अगदीं तूं म्हणशील तेव्हां निघूं...."

" ठीक....ठीक ! ठरलं हं ऽ दादा ऽ...ध्यानांत धरा !..." दारांतून बाहेर पडतां पडतां, तान्ह्या मला हंसत म्हणाला होता–" मी म्हणेन तवां निघायचं !... मंग मातर, बयादे नाय चालाचे..."

मीहि त्यावेळीं त्याला म्हणालों होतों, " हो, ठरलं ऽ ! नक्की ऽ !! "

*

आणि त्यानन्तरचा हा.... आतांचा योगायोग !....

आमची दोघांची पुन्हां परस्पर भेट झाली; ती अशी चमत्कारिक !

त्याचा पांडुरंग आधीं नि त्याच्याबरोबर तो–नव्हे....त्याच्या अस्थि !!

त्या वेळीं, आल्यावर, पांडुरंगानं घुटमळत अडखळत मला सांगितलं होतं–

" बाबाची छातींतली कळ जास्त झाली; तेव्हां, तो मला म्हणाला–

' पांडुरंगाऽ ! हा संसार करतांकरतां, माजी संमदी जिंदगी गेली !– जितेपनीं जमलंच नाय्...आतां तरी तें होव् दे !....बग, मला पंढरीलाच ने, होव् ? चन्द्रभागेमदींच टाक बरं...मला !.. येकला मातर जावूं नकोस;.... आदीं दादांच्या घरीं जा !....त्यांना म्हणावं,–' पंढरीला चाललोंय् माज्या बाबाला घेऊन !' आपसुक सांगात येतील ते, तुज्या ! तसं ठरलंय आमचं !"

*

त्याच्या त्या निरोपानंच चमकून, मी त्यावेळीं तडकाफडकीं उठलों होतों; पांडुरंगाबरोबर नव्हे–तान्ह्याबरोबरच, ठरल्याप्रमाणं पंढरीला जात असल्यासारखं मला वाटलं होतं.

म्हणूनच, तान्हूचा नाहीं, तरी त्याच्या पांडुरंगाचा निम्मा खर्च मी व माझा निम्मा खर्च तान्हूच्या पांडुरंगानं ठरल्याप्रमाणं केला होता !

मागलं वचन पाळलं होतं आम्ही !....



ठरल्याप्रमाणंच, तान्हू माझ्याबरोबर पंढरीला पोहोंचला होता; नि माझ्या देखतच, ' कायमच्या स्नानाला' चंद्रभागेमध्यें उतरला होता !

जातां-येतांना, हें सारं सारं नवं जुनं माझ्या मनांत गर्दी करून आलं नि वाटलं–'आम्ही खूप शिकलों, बडबडलों–लिहिलं !...तरी फुकटच गेलों !... तान्हू मात्र खरा जगला;...खरा खरा संत-महंत झाला ! !—'

आणि म्हणूनच, सगळा नाहीं, तरी तान्ह्याचा अर्धा तरी पंढरीराया, त्या यात्रेंत, नकळतच माझ्या हृदयांत शिरला; तिथं तो कोंदटला,...तें व्यापून माझ्या चराचरांत उरला !....

तान्हूबरोबरच्या त्या पाहिल्या नि अखेरच्या पंढरीच्या वारींतून, माझ्या मनाला मिळालेली ती अभिनव शुचिर्भूतता!....ती जीवनाची न्यारी खरीखुरी जाणीव ! !—

कुठल्याहि पुस्तकांत मला ती अजून सांपडलेली नाहीं;...सांपडणार देखील नाहीं ! !—

●●●

# रि का मा ग्ला स

बरेच दिवस गाजत राहिलेल्या त्याच्या लग्नाचा बोवाळ संपला होता. त्यानंतर, निसर्गरम्य काश्मीरमधला, आठदहा दिवसांचा रोमहर्षक ' हनीमून'हि झाला होता. असे कांहींसे एकांगी आनंदांतले, आळस, निरुद्योगीपणांतले–पण एकूण गतिमान्, नाविन्याचे, ते पंधरावीस दिवस त्याच्या अंगावरून अगदीं भरारून गेले होते.

आनंदाचीहि एक प्रकारची धुंदी असते. पण धीर करून, त्या गोड गोड कैफांतून, आज अखेर त्यानं स्वतःला जागं केलं होतं; नव्या नवाईच्या गृहापासून नि मनाला सारखी ओढ लावणाऱ्या गोड गृहिणीपासून, त्यानं स्वतःला प्रयासानं दूर लोटलं होतं.

" मी येऊं का गडेऽ, स्टुडिओंत ? " एक गोड गोड स्मित करून, शुभदेनं त्याला निघतांना लडिवाळपणं विचारलं; तेव्हां, आपल्या छोट्या ऑस्टिन गाडींत बसतांबसतां, तो कांहींशा त्राग्या-अजीजीनंच तिला म्हणाला होता, " अग ऽ , ' शुभदा ' ठेवलंय् तुझं नांव मी !.... असल्या या तुझ्या विचित्र लाडांनीं,...' श्रीयुत-चित्र ' नि ' श्रीयुत ' यांचा नवा ग्रंथ इथंच आटोपेल, बरंऽ !.... बये मोहिनीऽ, मायाविनी ! जा ! आधीं घरांत जा कशी !"

ताडदेवच्या त्या प्रशस्त आवारांत गाडी शिरतांच, लपेटींत काढलेल्या ' श्रीयुत-चित्र ' या हिरव्या अक्षरांच्या मोठ्या पाटीखालींच, त्यानं खर्रकन् ब्रेक लावले नि बाहेर उडी झोकली; उत्साहानं भरभर पायऱ्या चढून, तोंडानं शीळ घालत, तो आपल्या स्टुडिओंतल्या स्टडीकडे वळला.

तिकडे जातां जातां, त्याच्या सहकाऱ्यांच्या नि नोकरांच्या आस्थेवाईक, हास्यमुख अभिनंदनांचा, चारी बाजूंनीं त्याच्यावर मुग्ध वा बोलका वर्षाव होत होता. बऱ्याच दिवसांनीं व लग्नानंतर तसं त्याला प्रथमच स्टुडिओंत पाहिल्यावर, आर्चहि तें साहजिकच होतं. तरी पण, स्मितहास्य, एखाद–दुसरं आस्थेवाईक खेळकर वाक्य, खांद्यावर थाप,...अशा प्रकारें प्रत्येकाची बोळवण करीत, अखेर, तो आपल्या खाजगी खोलींत शिरला. टेबलाजवळच्या आपल्या गरगरणाऱ्या, गादीच्या फिरत्या खुर्चीवर, त्यानं खेळकरपणं सपूकन् बसकण घेतली. एक आनंदी गिरकी मारून, झोके घेत घेत, अखेर, मागं रेलून, आपल्या प्रशस्त टेबलावर त्यानं ऐसपैस पाय पसरले.

एकदम एक सुगंधी मधुर भपकारा त्याच्या नाकांत शिरला नि आपल्याच मनांत धुंदपणं चूर असलेलं त्याचं लक्ष्य, समोरच्या टेबलावर ठेवलेल्या ग्लासाकडे वळलं...

सोनटक्क्याचीं पांचपंचवीस ताजीं टवटवींत फुलं, त्या ग्लासाचं तोंड दाटीदाटीनें आच्छादून, त्याच्याकडे पाहत हंसत होतीं. त्यांचे ते लांब लांब सुकुमार देठ ! आंतल्या निर्मळ पाण्यांत ते डुंबत होते. धुंद होऊन, आपल्या आवडीचा तो सुगंध हुंगत, तो आपल्याशींच हळूच हंसला; त्या फुलांना एकदां हळूच हळुवार स्पर्श केला त्यानं. आपल्या असल्या लहानसहान आवडीनिवडींकडे सदैव जागरूक लक्ष्य ठेवणाऱ्या, आपल्या चुणचुणीत ' ऑफीस बॉय' चं मनांतल्या मनांत कौतुक करीत, दोन्ही हातांच्या बोटांनीं टेबलावर स्वैर मनानं हळूच तबला वाजवीत, त्यानं आवतींभंवतीं दृष्टि फिरवली.

उजव्या हाताला, टेबलावर, त्याच्या भगतगणांच्या पत्रांची–मधल्या पंधरवड्यांत तुंबलेली–भली मोठी उंचच उंच रास पडली होती. ती पाहून, दडपल्या मनानंच, तो स्वतःशीं पुटपुटला, " बा ऽ परे ऽ ! काय वेडे लोक हे !! हद्द आहे बुवा ! "

*

त्या राशींतलं एक एक पाकीट यांत्रिकपणं हातीं घेऊन, प्लास्टिकच्या चाकूनं तें फोडून, त्यावर ओझरती नजर फिरवीत, तो तें डाव्या हाताला सारीत होता.

मजकुरांत सर्व प्रकार होते. 'श्रीयुत' बोलपटाच्या ठिकठिकाणच्या महोत्सवांनीं व कलात्मक परीक्षणांनीं पानंच्या पानं भरलेलीं नियतकालिकं; त्याच्यावर 'प्रेम करणाऱ्या' प्रेक्षक तरुण-तरुणींचीं कौतुकानं नि उल्लूपणानं भरलेलीं लहानमोठीं पत्रं; रजतपटावर उडी मारून, क्षणार्धांत, एकदम चौफेर झळकूं इच्छिणाऱ्या, कोवळ्या-उतावळ्या कॉलेज-कुमारींचे आपापल्या फोटोंसह आलेले अर्ज...

फारशा तपशीलांत न शिरतांच, त्यानं त्यांतला बराचसा ढीग डाव्या हाताला सारला होता.

मात्र, जातां जातां, त्याची खूपच करमणूक होत होती. त्यांतल्या कांहीं त्यांच्या प्रश्नांवर हंसून, त्यांना मनांतल्या मनांत तो उत्तरं ठरवीत होता; त्यांतलीं कांहीं तर, चटचट कागदाच्या चिटोऱ्यांवर खरडूनहि, तो मोकळा होत होता.

*

'श्रीयुत, श्रीमंत झाल्यावर आपल्याला मनांत कसं वाटतं हो ?–'

—'श्रीमंत झाल्यावरच तें समजायचं ! शब्दांत दुसऱ्याला कसं काय सांगतां येणार ?–पुन्हां, माझा तर तो अनुभव अनपेक्षित व नवीनच आहे !'

'तुम्ही आज 'प्रकाशांतील व्यक्ति' आंहां !...अशा व्यक्तीच्या भोंवतीं व मनांत काय असतं ?'

—'प्रकाशांतील व्यक्तीच्या भोंवतीं कॅमेरामनच्या फ्लॅशचे 'चक्‌चक्'– चकाट व हजारों कॅंडल पॉवरच्या दिव्यांचे, उसन्या उजेडाचे झगझगाट असतात; पण, त्या व्यक्तीच्या मनांत प्रामाणिकपणाच्या स्निग्धतेची पणतीच तेवत असली, तर तिथं सदैव दाटणारा काळोख, प्रतिदिन, अधिकाधिक गडदच होत जातो !–'

'तुमच्या पहिल्या वहिल्या 'श्रीयुत' बोलपटांतला नायक 'श्रीयुत'; तो तर अखेर, एका श्रीमंत नटीशीं लग्न करून, भिक्षाधीशाचा लक्षाधीश



होतो !.... मग तुम्ही नुकतंच स्वतः लग्न केलंत, तें एखाद्या नटीशीं कां नाहीं केलं ?...लोकांना दाखवायचं एक नि आपण प्रत्यक्ष करायचं भलतंच ! हें काय तरी बाई ?'

—'बाई ग ! त्याला कारण आहे. मला खराखुरा संसार करायचाय् ! तुम्ही पाहूं इच्छितां तो पडद्यावरला नव्हे !... माझ्या आयुष्याचा सिनेमा करावंसं मला वाटत नाहीं. स्वतःच्या मनगटांत भरपूर जोर आहे, अशी मला आतां थोडी खात्रीहि वाटत आहे !'

'तुमच्या नूतन पत्नीचं नांव म्हणे 'शुभदा' आहे ?... खरंच, ती तुम्हांला काय काय शुभ देणार आहे हो ?...जरा सांगाल का आम्हांला ?...'

—'हो !...सिनेमा, सिनेमाचं जीवन नि सिनेमाचा पैसा,...जें जें देत नाहीं, तें तें सर्व देणार आहे !! पण, तुम्ही जरा फारच खाजगी प्रांतांत नाक खुपसलंत बुवा. तथापि, आतां एकदां विचारलंतच, तेव्हां प्रामाणिकपणं सारं सांगूनच टाकतों, झालं !... 'नूतन पत्नी' ... म्हणजे ??... माझी 'शुभदा' तर एकमेवच पत्नी आहे कीं !.... ती तशीच राहावी व राहीलसं वाटतं. नि ती देणार काय ?... उबदार घर, सोज्वळ संसार, प्रेमळ पाठिंबा, खेळकर स्फूर्ति, उत्तेजक सहानुभूति,... सारं सारं, शुभ तेंच, ती मला देणार आहे !...माझ्या ग्रहिणीमुळं माझं ग्रहोद्यानहि फुलणार आहे !....पण याहून आधींच अधिक वाच्यता नको; इडा पिडा टळो;....नि तुमची नष्ट टकरी 'दृष्ट' न लागो !! —'

असल्या या अनेक उत्तरांमधें, थोडा जादा दांभिक शिष्टपणा, नि सवंग नाटकीपणा निश्चित आहे, याची त्याला, लिहितां लिहितां मधूनच, जाणीव खास होत होती. तो हळूंच गालांतल्या गालांत हंसतहि होता. पण मग, एखाद्या प्रकाशांतील व्यक्तीला तेवढी मुभा असतेच;... जगांत, धंद्यांत, प्रकाशांत, सारखं टिकून राहायला, तें सारं जरूरच असतं; तसले विनयाचे नि औचित्याचे हजार खून त्याला माफच असतात; अशीहि तो मनाची समजूत करून घेत होता.

*

पण त्यानंतर समोर आलेल्या पुढल्या दोन पत्रांमधील प्रश्नांनीं मात्र तो एकदम दचकला; खूप गोंधळला; अस्वस्थ–बेचैनच झाला...

प्रश्न साधेच असूनहि, त्याला ते अतिशय चमत्कारिकच वाटले.

‘ तुमचं खरं नांव म्हणे आनंद सदावर्ते !...मग, तुम्हांला ‘ श्रीयुत ’ कां म्हणतात ?—’

“ श्रीयुत-चित्र ’ कंपनीच्या पहिल्या ‘ श्रीयुत ’ बोलपटानं आतां ज्युबिलीहि गाजवली. पण पुढल्या चित्रपटाच्या जाहिरातीमध्यें, नांवाच्या ठिकाणीं तुम्ही नुसतं मोठं प्रश्नचिन्ह टाकतां, तें कां ? श्रीयुत, आतां तरी सांगा—नव्या बोलपटाचं नांव काय ? कथानक कोणतं ? कोणाचं ?—’

खरं म्हणजे, भांडवल तयार होतं; निम्मा शिम्मा नटसंचहि जमला होता. चित्रपट लौकर काढायलाहि हवा होता. तरी, त्याचं त्यालाच नीट सांगतां येत नव्हतं—‘ नांव काय ? ’ ‘ कथानक कोणतं ? ’...

प्रश्न डोकं उठवणाराच होता !

पहिल्या प्रश्नानं आनंद चमकला—गोंधळला होता,... तो त्या प्रश्नाच्या प्रतिध्वनीनं एकदम जाग्या झालेल्या मनांतल्या असंख्य गतस्मृतींमुळंच !

*

शाळेंत, गुणाजीसर त्याला सौम्य टोमणा देण्यासाठीं, नेहमींच जरा थट्टेच्या स्वरांत त्याला विचारीत, “ हं ! काय ? आज आमचे श्रीयुत काय म्हणतात ? ”

आनंद सदावर्तेला आतां ‘ श्रीयुत ’ कां म्हणतात, या प्रश्नाचं उत्तर-देखील त्यांतच दडलं होतं, असं त्याला त्या क्षणीं एकदम वाटलं.

मॅट्रिक झाल्यावर, इकडच्या तिकडच्या टेंपरवारी नोकऱ्या त्याच्या नशिबीं आल्या; त्या वेळीं, फावल्या वेळांत, हौशी नटसंचांत आपल्या आवडीचा ‘ नाटकीपणा ’ तो करी. त्यांतूनच, अखेर योगायोगानं रजतपटावर प्रथमच अवतरतांना, त्याच्या दिग्दर्शकानं त्याला विचारलं होतं,—“ तुमचं नांव कसं घालायचं, सदावर्ते ? ”

त्यावर, एकदम अभावित स्फूर्ति आल्यासारखं, आनंद म्हणाला होता,—“ अंऽ ! माझं नांऽव ? अंऽ—नुसतं ‘ श्रीयुत ’ असंच घाला ! ”

त्या वेळीं तें तसं झालं. त्यानंतर तो वाढला; त्याची नट म्हणून ख्याति वाढली; त्यांतूनच, अखेर, तो स्वतंत्र निर्माता होण्याइतकी मजल जाऊन, त्याची कंपनीहि ‘ श्रीयुत-चित्र ’ झाली. एवढंच नव्हे, तर—



“ पहिलं वहिलं ‘ श्रीयुत-चित्र ’—‘श्रीयुत’मधें....तुमचा लाडका ‘श्रीयुत” असा त्याचा जाहिरातबाजीचा स्टंटहि आकर्षक व फलदायी झाला होता !

त्या साऱ्या साऱ्या स्मृतींमुळं आजहि खुदकन् हंसत तो पुटपुटला, “ त्या प्रश्नाला हेंच उत्तर, हेंच स्पष्टीकरण द्यावं ! ”...

पण पुन्हां दुसऱ्या विचारानं तो चमकला;— अस्वस्थ झाला—

‘ असल्या गोष्टींची नसती वाच्यता केलेली गुणाजीसरना आवडणार नाहीं !’

कारण, ज्युबिली पूर्वीच्या कुठल्याशा मुलाखतींत, त्यानं त्यांच्या आठवणीचा कुठलासा ओझरता उल्लेख केला होता; तर गुणाजीसरांचं तत्काळ त्याला कार्ड आलं होतं,—‘ श्रीयुत, माझ्यावर फिरून असा कधीं अत्याचार करीत जाऊं नका, ही हात जोडून विनंती तुम्हांला ! अहो, जिने सारेच चढून जातात. पण वर गेल्यावर, पायऱ्यांचा कोणी कोणाकडे आजवर कधीं उल्लेख केला आहे का ?—’

बोलपटाच्या ज्युबिली समारंभाच्या वेळींहि तसंच. तार पाठवूनहि ते आले नव्हते. त्यांचा एक छोटा सत्कार योजला होता; पण, तो आयत्या वेळीं रद्दच करावा लागला होता.

परवां आनंदच्या लग्नावेळींदेखील, स्वतः न येतां, त्यांनीं पत्रच पाठवलं होतं,—‘ तुम्हां दोघांनाहि माझे मनापासूनचे शुभाशीर्वाद. पण तुमच्या नवजीवनारंभीं, जातां जातां, फिरून एकदां आज एक गोष्ट सुचवावीशी वाटते. रागावूं नका. आतां यापुढं तुम्हीं आम्हांला विसरायचं !...तुमच्या प्रत्यक्ष आयुष्याच्या चढत्या कमानींत, आतां आम्हांला मुळींच स्थान नाहीं. तसे अप्रत्यक्ष आम्हीं आहोंच...असणारच; तुम्हींहि ठेवा. आणखी एक मला, या मंगल प्रसंगीं, तुम्हांला सुचवायचंय्—तुमच्या जीवनांत सिनेमा आलाच आहे; तो राहाणारच. पण, जीवनाचाच सवंग सिनेमा करूं नका. शक्य तर, सिनेमांतच जीवन आणा. तेंच तर तुमचं ( नि अप्रत्यक्ष आमचंहि ) शंभर टक्के यश !—तें साधा... सोनटक्के गुणाजीचे शुभाशीर्वाद. ’

त्या वेळीं, तें पत्र वाचतांना, आनंदचं हृदय त्यांच्याबद्दलच्या आदरानं भरून आलं होतं.

*

त्यावरूनच, शेवटच्या वर्षी, शाळेंत झालेल्या संमेलनांतलं 'एकच प्याला' नाटक त्याला आठवलं. त्यांतल्या त्याच्या सुधाकराच्या कामाबद्दल त्याला पहिलं बक्षिस मिळालं होतं. विसांपैकीं सोळा मार्क मिळाले होते.

त्या वेळीं, धोंडे, फडके आणि गुणाजीसर, असे तिघे परीक्षक होते. स्पर्धेच्या निकालाबद्दल बोलतांना, गुणाजीसर म्हणाले होते, "आज आपल्या गुणांमुळं पहिला आलेला हा आनंद सदावर्ते; तो तोतरा आहे !—नव्हे होता ! पण आपल्यापैकीं किती जणांना हें ठाऊक आहे ?—म्हणूनच, त्याच्या आजच्या सुंदर कामाबद्दल, मीं तरी त्याला विसांपैकीं वीस मार्क दिले. अखेरच्या निर्णयापूर्वी, आम्हां गुरुजनांमधें मतभेद झाला थोडा; पण, मी त्यांना म्हणालों, 'जोंपर्यंत कमी मार्क देऊन, शिल्लक वाचवलेल्या मार्कांचं आपल्या नांवाचं एखादं शिल्लकी खातं आपल्याला कुठल्या बँकेंत उघडतां येत नाहीं, तोंपर्यंत, पूर्ण समाधानाला मी पूर्ण मार्कच देणार !...नाहीं तरी, आम्हीं दरिद्रि शिक्षक,... आमच्या आयुष्यांत मुलांना दुसरं काय देऊं शकतों ?... वेळींच रसिकतेचं पुरेपूर माप तरी त्यांच्या पदरांत निरपेक्ष, निरहंकार बुद्धीनं टाकावं, असं मला वाटतं !—या कुमारनटाचा आज झाला तसाच जयजयकार सदैव असो !—हीच माझी तीव्र इच्छा !... "

आनंदच्या डोळ्यांतून, त्या वेळीं, घळघळा आसवं गळत होतीं. त्याचं अंगांग थरथरलं होतं.

कारण, त्या आपल्या अधून मधून जाग्या होणाऱ्या व्यंगाच्या दहशतीमुळंच, तो नाटकांत नांव देण्यास 'नाहीं' म्हणत असतांना, गुणाजीसरांनींच त्याला आग्रहानं त्या भरीला घातलं होतं. त्याच्या पाठीवर हात टाकून ते म्हणाले होते, "हाऽवेड्या, व्यंगं हीं मोठेपणाच्या शिडीसारखीं ! एकाच चाकाचा रथ, सात घोडे, लंगडा सारथी, सापाच्या लगामी, अधांतरी मार्ग...असं सारं असूनदेखील—रोजच्या रोज, ठरल्या वेळीं, सूर्य आपल्या मार्गानं जातो ! हा संस्कृत श्लोक घेतलाय् ना वर्गांत आपण ? तसं आहे हो !...अरे, क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोऽपकरणे !! "

त्या त्यांच्या विश्वास–उत्तेजनामुळंच, आनंदनं आपल्या जीवाचा आकांत नि प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती; तें श्रेष्ठ यश त्याचं झालं होतं.

*



नाट्य, गाणं, बांसरीवादन, तोंडबाजा, नकला इ. कलांमध्येदेखील, त्यावेळीं तो न लाजतां राजरोस प्रगति करूं लागला होता; ती अशी !

सहावीच्या सहामाहींत, गणित–विज्ञान दोन्ही विषयांत, तो पुराच गचकला; म्हणून त्याचे संसारी वडील त्याच्यावर खूप संतापले होते. अखेर, कशीबशी त्यांची सही मिळवून, तें प्रगतिपुस्तक त्यानं हिरमुसल्या चेहऱ्यानंच, गुणाजीसरांच्या हातीं नेऊन दिलं होतं.

तेव्हां सौम्य हंसून, ते त्याला खेळकरपणें म्हणाले होते, "काय, श्रीयुत ? पाहिलंत त्या आरशांत आपलं तोंड नीट ? आतां विचारहि करा नीट ! प्रयत्न झाल्यावर, मग अपयशानं नामोहरम नसतं व्हायचं ! एक पार्ट नीट नाहीं जमला; म्हणून, सगळंच जमणार नाहीं, असं थोडंच आहे ? हें बघ, तुझ्या त्या कला-नकला मात्र तूं सोडूं नकोस हो कधीं. अरे वेड्या, जीवनांत 'तिळा उघड'चा मंत्र, कोणाला कुठं सांपडेल, सांगतां नाहीं यायचं कोणाला ! आपल्या धनुष्याला, सतरा बाण असावेत; नेहमीं ते जय्यत तयार असावेत, हें बरं ! ! "

त्या क्षणच्या आनंदच्या खचलेल्या बालमनाला मोठा धीर आला होता. अंगावर मूठभर मांस चढलं होतं. आपल्या उणीवांप्रमाणंच आपले गुणहि गुणाजीसर जाणत होते, हेंच त्याला खूप वाटलं होतं.

*

पण आधल्या वर्षी, पांचवींत, नेहमीं टंगळमंगळ करणारा सदावर्ते, त्या शेवटच्या दोन वर्षीं अभ्यासू झाला होता; तो सुद्धां असल्याच एका गंमतीच्या प्रसंगामुळें—

गुणाजीसर त्यांना संस्कृत-गणित शिकवीत. मुलांना रागावणं, मारणं, त्यांना कधींच जमत नसे. त्यांची मोठ्यांत मोठी शिक्षा, म्हणजे बांकावर उभं करणं !.. वर्गाबाहेर काढणंहि त्यांच्या जिवावर येई. तेव्हां, दिलेलं होमवर्क वगैरे करण्याबाबत, अनेकांची बेफिकीर चालढकल तर सदाच व्हायची.

त्या दिवशीं मात्र, त्यांनीं साऱ्यांच्या वह्या पहायचं अगदीं मनावरच घेतलं होतं; ... एका पाठोपाठ सातआठ वह्या कोऱ्या पाहून, अखेर, ते सर्वांना उद्देशून म्हणाले होते,.... "ज्यांनीं ज्यांनीं होमवर्क आणलं नाहीं ते बांकावर उभे राहा.... "

तिथे चौथे सोडून, साराच्या सारा वर्गच बांकावर उभा राहिला. लष्करच्या लष्कर सारं तसं खडं !—

वर्गातल्या साऱ्या डोक्यांची बौद्धिक पातळी, क्षणार्धात, पांच फूट उंच झाली होती ! त्या साऱ्याच ‘ प्रकाशांतील व्यक्ति ’ झाल्या होत्या.

तें पाहून, सारेच एकमेकांकडे पाहात खुसुंखुसुं हंसले होते...

स्टेजकडे जाऊन, वर उभे राहून, गुणाजीसरहि साऱ्यांकडे पाहात गालांतल्या गालांत हंसले होते;...पण अगदीं खिन्न चेहऱ्यानं !....

नि मग, क्षणभरानं, थोड्या गंभीरपणं, गंभीर शब्दांत, ते म्हणाले होते,—

“ असं म्हणतात—‘ टु अर इझ् ह्यूमन ’ !—पण आजचं हें मात्र, मानवी प्रमाणांत बसत नाहीं; चौघांनीं तेवढं बसायचं;...नि साऱ्या वर्गानं असं ताडमाड उंच उभं राहायचं;...म्हणजे कोणा माणसाला दिसेल कसं ?—वाटेल कसं ?...समजा, हेडमास्तर येऊन गेले वर्गावरून, तर ते काय म्हणतील ? ”

क्षणभरच ते थांबले; नि अधिकच दाटलेल्या शांततेंत, ते पुढं म्हणाले—

“ म्हणून....मला वाटतं, आज आपण असं करूं...ज्यांनीं होमवर्क करून आणलंय ते नि मी स्वतः,....आम्हीच तेवढे चार-पांचजण वर्गात उभे राहणार ! बाकी, म्हणजे....आतां उभे आहेत,...त्यांनीं खालीं बसावं; वाटलं, तर होमवर्क, इथंच, आत्तांच, पुरं करावं !...तोंपर्यंत, उभं राहून, आम्ही मनोभावें प्रार्थना करतों— ‘ देवा... ते काय करतात नि काय करीत नाहींत, तें त्यांना नीट समजत नाहीं; आतां यापुढं त्या साऱ्यांना चांगली बुद्धि दे !—’ दरम्यान, कोणाचं काम इथल्या इथं झटपट पुरं झालं, तर त्यानं मात्र, मला तें इथं येऊन आणून दाखवावं; मग, आपणहि तासभर उंच उभे राहण्याचा नि इतरांसाठीं देवाची प्रार्थना करण्याचा आजचा हा मोठा मान, त्यालाहि निश्चित मिळवतां येईल !—हं...चला पाहूं—उभे आहेत, ते खालीं बसा !... नि बसलेले आहेत, ते पटकन् बांकावर उभे राहा ! !— ”

साऱ्यांना बसतांना नि बसल्यावर, अंगाला अगदीं कांटे टोंचल्यासारखंच वाटलं होतं. बहुतेक, जण बारा ओळींचं तें संस्कृत भाषांतर भरभर लिहून पुरं करण्याची अगदीं कोशीस करीत होते.

अखेर, पंधरा मिनिटांत तें संपवून, प्रथम आनंदच धांवत-पळत स्टेजकडे गेला होता. त्यानं वही गुणाजीसरांना दाखवली होती.



“ वा: ! छान !...हं—जा आतां जाऊन, खुशाल बांकावर उभा राहा ! ”.... असं ते हळूच त्याच्या खांद्यावर थोपटून, हंसत म्हणाले होते.

ते उद्गार ऐकतांना, बांकावर चढून, उंच उभं राहून, अजून खालीं बसलेल्या वर्गाकडे उंचावरून चौफेर दृष्टि फिरवतांना, मनांत दाटून आलेल्या स्वाभिमानामुळं, त्या दिवशीं आनंदला कोण आनंद वाटला होता !—

*

म्हणूनच, त्या दिवशीं लिहिलेल्यांपैकीं त्या चार ओळी, त्याच्या हृदयांत कायमच्या कोरल्यासारख्या झाल्या होत्या ! कोणत्या बरं त्या ओळी ?—हो... ‘ वितर, वारिद, वारि दवातुरे ! चिरपिपासितचातकपोतके ! प्रचलिते मरुति क्षणमन्यथा ! क्व च भवान्, क्व पयः, क्व च चातकः ! ”

आनंदला त्यावेळीं वर्गात वाटलं होतं नि आजहि तसं अधिकच वाटत होतं— ‘स्वतःला वारा दूरदूर वाहून नेण्यापूर्वी, गुणाजी सरांच्या हृदयमेघानं-देखील, आम्हां कित्येक चातक-पोतकांच्या त्या आसुसलेल्या चोचींमध्यें, रसरसल्या जिवंत जीवननिर्झराचे किती अद्‌भुत अमृतबिंदु टाकले होते ! ’

त्या तसल्या प्रत्येक प्रसंगीं, गुणाजीसर आनंदच्या हृदयालाच जाऊन भिडले होते. कशाबशा टोटलनं मॅट्रिक पसार होऊन शाळेबाहेर पडतांना, त्यांचा निरोप घेतांना, तेहि गद्‌गद होऊन आनंदला म्हणाले होते—“ हॅं, शाळेची लढाई तर जिंकलीत अखेर !...श्रीयुत, काय म्हणतात आतां ?—”

त्याच्या डोळ्यांत पाणी चमकलेलं पाहून, त्याच्या खांद्यावर हळुवारपणें थोपटत, रुद्ध स्वरांत ते म्हणाले होते— “ हें पहा.... कांहींहि करा ! पण ...पण मग, आमचा आनंद मात्र कधीं गमावून बसूं नका, बरं का श्रीयुत ? आनंद कायम ठेवा ! ”

त्यापुढलीं त्याचीं तीं बारा धामधुमीचीं वर्षं; बेकारी, टेंपरवारी फिरती नोकरी, वारा येईल तशी पाठ फिरवणं, घरांतले एका पाठोपाठचे दुर्धर दुःखद प्रसंग !... पण त्यानंतर अकस्मात सुरू झालेली अद्‌भुत यशाची लांबच लांब प्रसंगपरंपरा !... चार्ली चापलीनच्या नाकेल्या मिशा लावून तो प्रेक्षकांचा लाडका ‘ श्रीयुत ’ झाला होता. एका फायनान्सरच्या मदतीनें ‘ श्रीयुत चित्र ’ कंपनी, तिचं पहिलं चित्र ‘ श्रीयुत ’, त्याची बघतां बघतां अनपेक्षित गाजलेली ज्युबिली; मग साध्यासुध्या शुभदेशीं लग्न....

असल्या सर्व गोड गोड घटनांनंतर, नव्या उत्साहानें आनंद आज कामाला लागला होता. त्याच वेळीं, त्या प्रश्नामुळेंच एकदम डिंवचला जाऊन, आपल्या पुढल्या चित्रपटाबद्दलचं त्याचं मनांतलं प्रश्नचिन्ह विराट स्वरूप धारण करून त्यांच्यापुढं उभं राहिलं होतं.

त्यामुळंच, तो आज गडबडला–बावरला होता. त्यावरूनच, कसं कोण जाणे, त्याला गुणाजी सरांच्या गेल्या पत्रांतील सूचक शब्द आठवले—'जीवनाचा सवंग सिनेमा करूं नका!... शक्य तर सिनेमांतच जीवन आणा! तेंच तुमचं १०० टक्के यश!!—'

एकदम त्याच्या मनांत एक कल्पना विजेसारखी चकाकली, चमकून गेली—"सिनेमांत जीवन आणायचं?...जीवन?...माझं... गुणाजीसरचं ...आमचंच जीवन आणलं तर?... या, याच मालमसाल्याला अधिक उजाळा दिला, कीं झालं?.... बस्स, ठरलं!... बहार, बहार होईल अगदीं!!...मी गुणाजी सरची भूमिका जिवंत उभी करणार!... नव-भारताच्या वाढत्या नागरिकांसाठीं हाच माझा नवा बोलपट!...."

त्या नव्या कल्पनेनेंच आनंद अगदीं खूष झाला. समोरचा एक कागदाचा तुकडा ओढून, त्यानं आपल्याच धुंदींत पार्कर पेन सरसावलं; नि कसं कोण जाणें, त्याच्या हातून त्या कागदावर शब्द उमटले—"रिकामा ग्लास—"

आपल्या मनाच्या ह्या अद्भुत खेळानें आनंद क्षणभरच आश्चर्यानें दचकला....पण मग; सारा उलगडा झाल्यासारखं त्यानं स्वतःशींच एक समाधानी स्मितहि केलं....

त्याचा हात नकळत पुढं गेला....टेबलावरचा सोनटक्क्याच्या फुलांचा ग्लास हळुवारपणें जवळ ओढून, हातांत उचलून घेत, त्यांचा दीर्घ श्वासानें वास घेत घेत, तो स्वतःशीं पुटपुटला—"हो, ठरलं!....हेंच नांव—'रिकामा ग्लास'....हो....श्रीयुत, हा संस्मरणीय असा रिकामा ग्लास.... त्याची लाखानेंहि किंमत भरेल! पैशांत नाहीं झाली तरी समाज–संस्कृतीच्या मोलानें तरी खासच भरेल!!—"

रिकामा ग्लास....नि संस्मरणीय?—हो—सात–आठ महिन्यापूर्वीचा तो प्रसंग त्याच्या डोळ्यासमोर प्रत्यक्ष बघत असल्यासारखा उभा राहात होता.

*



त्याच्या कंपनीच्या 'श्री–युत' चित्रपटाचं अखेरचं काम जोरांत चाललं होतं. औटडोअरसाठीं घाटांतल्या स्टॉपवर सारी मंडळी पोचली होती. मुंबईतलं काम संपवून आपल्या शॉट्‌स्साठीं आनंद दुसऱ्या दिवशीं आपल्या मोटारींतून पोचायचा होता.

भर दुपार तापलेली, त्यांत पुन्हां घाटचढणीनें मोटारहि तापलेली; इंजिनमधून वाफ नि धग निघत होती. आनंद स्वतःहि तलखीनें तहानेलेला होता....

त्या रस्त्यावरचं पहिलंच एक छोटसं हॉटेल पाहून, त्यानें खर्रकन् ब्रेक दाबले, नेकटाय सैल करून, शर्टचीं बटनं उघडून टाकून, त्यानें आपले दमले-अवघडलेले हात-पाय लांब पसरले. बसल्याजागींच 'हुऽश्श्' करीत मागल्या मऊ गादीवर मान टाकून ऐसपैस रेलत, तो हॉटेलकडे पाहून ललकारला—"अरे भाय....कोईऽ हय?....एंजिनमें पानी डालो!....और गलास् भरके पीनेका थंडा पानी भी लाओ..."

"जी हां!...." हॉटेलच्या जाळीदार दारांतून अदबशीर आवाज आला; उजव्या हातांतला ग्लास आनंदच्या हातीं देऊन, डाव्या हातांतल्या बादलीसह एक काटकोळा वृद्ध, एंजिनपुढें गेला. फडक्यानें झांकण काढून त्यानें अर्धी बालदी पाणी काळजीपूर्वक एंजिनमध्यें घातलं....वाफा फस् फस् फुर....फुरफुरल्या....

रिकामी बालदी दारापाशीं ठेवून, तो खाकी हाफ पँट हाफ शर्ट मधला चष्मेवाला वृद्ध रिकामा ग्लास घ्यायला आनंदकडे गेला.

आपल्याच तंद्रींत, घाम पुसत पुसत, आनंदनें पायाजवळचा ग्लास उचलला. रुमाल मानेवर टाकून, वरल्या खिशांतली एक अधेली काढून, तोहि ग्लासबरोबर पुढें करीत तो म्हणाला, "लो...."

"पण खाकी पोषाखांतला तो किंचित मागे सरला. कांहींसें गोंधळूनच आनंद पुन्हां अजीजीनेंच म्हणाला....लोऽ ना, जीऽ!"

"काय के लिये?...." वृद्ध खिन्न स्मित करून म्हणाला—"नो.... थँक्स!....वी डोन्ट् सेल् वॉटर, हिअर....स्टिल्!!...."

*

केवढ्यानें दचकला होता आनंद, त्याच्या ह्या सूचक इंग्रजी उद्गारांनीं! तें अनपेक्षितच होतं; ताडकन् जागचं उठून आनंद हातांतल्या रिकाम्या ग्लासासह रस्त्यावर उभा राहिला.

काहींशा हिरमुसल्या अदबशीर स्वरांत त्यानं विचारलं–" माफ कीजिएगा ! ....आप कोन हैं ?....यहां के मानीजर ? "

" हो....मालकच !....पण त्या शब्दाला कांहीं अर्थ नाहीं, इथं....! हें म्हणजे कांहीं ' हॉटेल ॲस्टोरिआ ' नव्हे !.... माझ्यासकट साऱ्या ' साडेतीन ' नोकरींचं छोटंसं हॉटेल आहे हें...." आणि हंसत हंसत आपला कृश हात पुढें करून तो म्हणाला–" हं द्या तो रिकामा ग्लास माझ्याकडे...."

त्या क्षणीं, आनंदच्या साऱ्या अंगांगांतून झिणझिण्या गेल्या होत्या.

क्षणापूर्वींच्या आपल्या स्वयंकेंद्रित धुंद हालचालींच्या जाणीवेनें तो मनांत खूप खूप वरमलाहि होता.

अपराधी मनानें; हातांतल्या रिकाम्या ग्लासासह, त्या वृद्धाबरोबर हॉटेलांत शिरत त्यानें विचारलं..." क्षमा करा, हं !...कुठं ठेवूं रिकामा ग्लास ?"

" ठेवा ना तिथं, टेबलावर..." वृद्ध हॉटेल मालक हंसून म्हणाला—" बसा जरा क्षणभर, खुर्चीवर– "

मनांतल्या मनांत डसणाऱ्या सहस्र इंगळ्या दडपत, खुर्चीवर बसून, त्या झाल्या प्रकाराची भरपाई करण्यासाठीं आनंद म्हणाला–" स्पेशल चहा हवाय्–दोन कप— "

" काय ? दोन कप ?? " रिकाम्या मोटारीकडे वळून पाहात, तो वृद्ध आश्चर्यानें म्हणाला.

" हो ! एक तुमच्यासाठीं नि एक माझ्यासाठीं ! " आनंद दिलजमाई स्मित करून म्हणाला–" चहा तरी विकतात ना, या हॉटेलांत ? "

दोघेहि त्यावर हंसले.

तेवढ्यांत, रिकाम्या कपबशा घेऊन बाहेरून हॉटेलचा पोऱ्या आला; आर्डर ऐकून चहा करूं लागला.

*

त्या वृद्धाकडे पाहतांना, आनंदला कांहीं तरी चुकल्यासारखंच वाटत होतं. ' आपण पूर्वी कुठें तरी नक्की भेटलों आहों ! ' असं सारखं सारखं वाटत होतं.

अखेर, चहा घेतां घेतां, त्यानें विचारलं–" कसं काय चालतं, हें ? किती वर्षं आहां इथं ?.... नांव काय आपलं ?? "



तो हॉटेल मालक हसून म्हणाला—" होते नव्हतं तें खर्चून, हें छोटंसं घर विकत घेतल्याला, झालीं कीं आतां, तीन एक वर्षं ! रिटायर झाल्यावर, बसल्या बसल्या, बसलोंय् हा छोटासा धंदा-उद्योग आरंभून ! वयांवरची कार्यक्षमता, उपयुक्तता ठरवणाऱ्या या जमान्यांतदेखील, वृद्ध माणूस कामाबाबत वाळींत पडून उपयोगी नाहीं ! अहोऽ, किमान लोकांची सेवा तर होते आपल्या हातून ? कसंबसं भागतंहि ! नसलंच काम, नाहींच कांहीं नसलं, तर बसायचं, आपल्या आवडीचं कांहीं तरी वाचीत, लिहीत—"

तें ऐकतां ऐकतां, मनांत खूपच संशय दाटत जाऊन, आनंदानें उतावळ्या स्वरांत विचारलं–" नांव नाहीं सांगितलंत् अजून आपलं आपण ?..."

वृद्ध हळूच स्मित करून म्हणाला–"मी ? गुणाजी सोनटक्के माझं नांव..."

" स ऽ ऽ र ! " केवढ्यानें दचकला आनंद. तो ताडकन् जागचा उठला. एका झेपेंत चार पावलं टाकून पुढं होत, त्यानें त्यांचे हात आवेगानं हातीं घेतले.

क्षणभर सुन्न होऊन मग अखेर तो चिरक्या स्वरांत म्हणाला–" काय... काय ही दशा तुमची, सर ? किती किती हो ऽ बदललांत तुम्ही, दहा बारा वर्षांत ? त्या तुमच्या घोसदार मिशा नाहींत; गाल असे आंत गेले; कवळी आली; तोंडवळाच बदलला; खूप खूपच बारीकहि झालांत; आणि पुन्हां या पेहरावांत ! या पेशांत ! कसं, कसं ओळखणार ?... माय् गॉड !"

" आणि तुझंहि सारं बदललंय ! थेट माझ्या उलट झालंय् !.... छान छान ! " त्याच्या खांद्यावर थोपटून, ते पुढं म्हणाले–" आनंद ! आनंद ! आहे आनंद आहे...; पण मी मात्र तुला मघांच ओळखलं होतं बरं, आनंद रिकामा ग्लास हातांत घेऊन, अखेर स्वतः खालीं उतरलास ना, तेव्हां !..."

ओशाळल्या आनंदाची त्या वेळीं जणूं अगदीं दांतखिळीच बसली होती. तो हळूच साश्चर्य म्हणाला, " म्हणजे ?...."

पूर्वीसारखाच स्नेहाळ हात त्याच्या खांद्यावर टाकून, गुणाजीसर स्मितपूर्वक म्हणाले, " मघा तूं आणून ठेवलेल्या त्या रिकाम्या ग्लासांत...मला माझी-आपली परिचित संस्कृति तुडुंब भरलेली दिसली बरं....आनंद ? अरेऽ, जमाता, आपण माणसं– म्हणजे नुसतीं रिकामीं ग्लासं !... त्यांतून व्यर्थ

किणकिणाट तेवढा ऐकूं यायचा !... जीवनानं कमी अधिक भरलीं, तरच त्यांच्यात सप्त स्वर यायचे !– तरच आपण उपयोगी !!..."

*

गुणाजी सरांच्या त्या सहजस्फूर्त शब्दांनीं, आनंदच्या अगदीं हृदयाचाच ठाव घेतला होता. तिघांचा तो रिकामा ग्लास अजूनहि टेबलावरच होता. तो पटकन् उचलून, गप्पागोष्टी झाल्यावर, आनंद उठला व उठतां उठतां म्हणाला–

"हा ग्लास नेऊं मी, सर ?... आजची ही तुमची छोटीशी आठवण म्हणून ?"

"काऽ रे ऽ ?.... काय दिसलं तुला एवढं त्यांत ?" गुणाजी थोड्या आश्चर्यानें त्याच्याकडे पाहत हसून म्हणाले.

"तेंच, सर !... लहानपणीं आम्हीं तुमच्याकडून थेंबाथेंबानं मिळवलेलं जीवन !..." आनंद ग्लास खिशांत घालीत म्हणाला—

"असं ?....बरं बरं...ने कीं !—" तसेच त्याच्या मोटारीपर्यंत चालत जात, गुणाजी म्हणाले,– "मात्र तुझ्या टेबलावर ठेवशील, तो सदैव तुडुंब भरलेला ठेव. तो ! त्यांत सुगंधी टवटवीत फुलं तरंगूं दे !... त्यांचा चौफेर वास दरवळूं दे !...सुगंध-धुंदींतच राहा सदैव !"

"सोनटक्क्यांचीं फुलं ! —" मीटर सुरू करतां करतां आनंद हळुवार हसून म्हणाला होता–"तींच ठेवणार आहे टवटवीत त्यांत मी !!".

*

तेव्हांपासून तो रिकामा ग्लास, त्याच्या टेबलावर, जीवनानें सदैव भरलेला; फुललेला होता.

त्यावरूनच, आज त्याचं नवं कथानक, चित्रपटाचं नवं नांव अकल्पितपणं निश्चित झालं—"रिकामा ग्लास !"

त्या साऱ्या जाणीवेनं, समाधान-आनंदांत धुंद असतांनाच आनंदच्या नाकांत तो सुगंधी भपकारा शिरला व आनंदानं त्याला शहारल्यासारखं झालं !

त्याच्या मनांत आलं, "आज जीवनानं तुडुंब भरलेला, सुगंधी फुलं फुललेला हा रिकामा ग्लास !!—"

● ● ●

 

● ● ●

# निमकहराम

गाडी थांबतांच, शेठजी फर्स्टक्लासांतून उतरतात काय, नि लांब लांब टांगा टाकून, हा झटकन् पुढें होतो काय——

वर्षभरानें अगदीं बेडरपणें तो समोर तसा अचानक उभा दिसतांच, विंचू डसल्याप्रमाणें शेठजींनीं झटकन् एक पाय मागें घेतला होता. चेहऱ्यावर बळेंच स्मित आणण्याचा प्रयत्न केला होता....

विस्मयानें विस्फुरलेले सहस्त्र डोळे चारी बाजूंनीं पाहात होते तिकडे——

तेवढ्यांत तो खदखदला; पानानें रंगलेले दांत क्षणकाळ भिखाऱ्याप्रमाणें झळाळले; नि इथूनच उपहासाचे जळजळते शब्दहि उफळले, "आवो ऽ... आवो... मेरे...आवो !...देखोऽ...ये लखपति नगरशेठजीको देखो !... बोलो, देशभक्त दानशूर उमरशेठजी की जय !–"

त्या शब्दाबरोबरच बघतां बघतां शेठजींची गोंड्याची उंच फेस, खसकन् खालीं उतरली नि त्याच्या पठाणी वहाणाखालीं पडली. अंगांत जणूं वारं संचारल्याप्रमाणें मोठमोठ्यानें खदखदत तिच्यावर तो मनमुराद नाचला !

तसं खालींवर होतां होतां, शेठजींच्या रेशमी शेरवानीवर तो एकदां पिचिकरून थुंकला. आपल्या डाव्या पायांतली जीर्ण वहाण त्यानें चपळाईनें काढून उजव्या हातांत घेतली, ती एकदम वर उंचावली. भयाण हंसत, तुच्छतेच्या औपचारिक स्वरांत तो ओरडला–"लीजिये जनाब ! ये अपने बंदेका, आप खावंदको, ये छोटासा मामुली नजराना !—"

तें सारंच, एकामागून एक अगदीं अनपेक्षित घडत गेलं. आधींच गुबगुबीत लालबुंद असं शेठजींचं श्रीमुख ! बघतां बघतां तें अधिकच लाल लाल झालं.

आतांपर्यंत, सुन्न मनानें व थिजल्या डोळ्यांनीं पाहात असलेल्या आसपासच्या लोकांच्या डोक्यांत, आतां कुठं, पहिले एकदोन प्रकाश झोत पडत होते—

एका दोघांनीं दबा दबा धांवत जाऊन शेठजींना त्याच्या कक्षेंतून मागें ओढलं; दुसऱ्या कांहींनीं त्याचे दंड-पाय धरले नि त्यांच्यापासून बळजबरीनें दूर खेचलं; त्याला एक दोन फटकेहि लगावले.

*

पण शेठजींच्या गालावर बसलेले ते वहाणेचे फटकारे ! कांहींसे जोरदार असले तरी त्यांना जखमी करणारे खासच नव्हते ते—

—पण मग तो अगदीं चव्हाटा,....तालुक्याचं गजबजलेलं स्टेशन... त्याचं स्वतःचंच गांव...शेठजी तर तिथले नगरशेठ होते ! !—

म्हणूनच—त्या फटक्यांचे सहस्रपट आघात, आंत त्यांच्या हृदयाला जाऊन भिडले होते !...

तो पिसाट हल्लेखोर–जलाल ड्रायव्हर ?

तो तर तिथल्या सर्वांच्याच परिचयाचा. नाहीं नाहीं तरी, तो तर शेठजींचा अठरा वीस वर्षांचा जुना नोकर ! अगदीं उजव्या हातासारखा ! शेठजींना जपत आलेला नि त्यांनीं जपत आणलेला ! किंवा त्यांच्या तळ-हातावरचा फोडच जणूं म्हणा ना !...

पण तसं म्हटलं, तर अडवेरे, त्यांच्या पायांतलं वहानच तें ! नि तेंच आज असं आलं अदबी सोडून, जमीन सोडून, वरवर त्यांच्या उत्तम भागापर्यंत चढलं होतं अनपेक्षितपणें...

जलालची आजची ती भयंकर आगळीक ! तिचं सव्याज उट्टं फेडणं—पायताणाला फिरून जमीनदोस्त करणं–शेठजींच्या हातचा तो तर अगदीं मळ होता.

किंबहुना बॅगमधल्या आपल्या ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर तितक्याच गोळ्या जलालच्या छातीच्या फासळ्यांतून आरपार घुसवून...आपल्या डोक्यावर चढणाऱ्या त्या वहाणेच्या तात्काळ चिंधड्या उडवणं नि, तें आपलं कृत्य,



अखेर....‘स्वसंरक्षणार्थ’ ‘सकारण’ ठरवणं, हें हि उमरशेठजींना अगदीं करतलामलकवत् असंच होतं !....

—पण तरी देखील, कोणीतरी उचलून झाडून झटकून दिलेली, आपली जमिनीवर लोळलेली फॅज कॅप, त्यांनीं जरा ओशाळपणेंच पुन्हां डोक्यावर चढवली; खिशांतल्या रेशमी रुमालानें झटापट आपलं अंग झटकलं; क्षणभरच आपली दाढी हातांनीं गोंजारून दाबली नि मग अगदीं निमूटपणें, खालीं मान घालून भरभर पावलं टाकीत, स्टेशनच्या फाटकांतून ते तरतर करीत बाहेर पडले.

*

बसक्या गालावरची चार दिवसांची दाढी खाजवत झपझप दूर निघून जाणाऱ्या उमरशेटजीकडे जलालनें एक धिक्कारपूर्वक कटाक्ष टाकला. आपल्या रंगलेल्या तोंडांतील मुखरस, ते बसले होते त्या फर्स्टक्लासच्या डब्याखालीं, रुळांवर पिचकारला; नि पिसाटासारखं पुन्हां मोठ्यानें खदखदत तो ओरडला “ हे ऽ लखपति ऽ वा ऽ रे दानशूर ! सैतान... हैवान–”

आपल्या विस्कटलेल्या झिंज्यांतून आपला उजवा हात ओढून, तो पुढें गेला; अजूनहि त्याला दडपून धरणाऱ्या लोकांच्या हातांच्या पकडी पुन्हां एकदम घट्ट झाल्या; त्यांतला एकदम ओरडलाहि– ‘नादान ! ये तूं क्या कर बैठा ? अब क्या कर बैठा ? अब क्या कर रहा है ? ”

पण तो उलट शांतपणें त्यांना म्हणाला, “ सबूर, सबूऽर ! अरे ऽ खेल तो अब सब खतम् हो चुका ! मैं नहीं किधर भाग जाऊंगा... ”

आपला उजवा हात सोडवून घेऊन, आपल्या कपाळावर विस्कटून आलेले केस त्यानें सावरले. फाटक्या कोटाची डावी बाही खालीं उतरली होती; ती ओशाळल्या मनानें वर ओढली. मघाच्या खेचाखेचींत, उभाच्या उभा फाटलेला त्याचा मळकट लेंगा; खालीं वाकून त्यानें आपल्या घोट्याभोंवतीं गुंडाळला, अजून त्याला दडपून धरणाऱ्या चौघांनीं, जवळच्या फलाटावरच्या बाकाकडे संथपणें ओढून नेलें, त्यानें तिथं बसकल घेतली; नि निमूटपणें बसल्या बसल्या लेंग्याला ठिकठिकाणीं गाठी मारायला सुरुवात केली.

चहा चिवड्यासाठीं गाडींतून उतरलेले परीटघडीचे पांढरपेशे, त्याच्याभोंवतीं गर्दी करून, अजूनहि तमासगिरींत रंगले होते.

त्यांच्याकडे सरकन् डोळे वळवून, जलाल करड्या स्वरांत ओरडला—
" ओऽ बम्बईवाले ज्या ज्यांनीं ! ज्याऽवांनीं ! राणीचा बाग नाहीं आहे हा जंगलचा खेळ आहे आतांचा ! पेलनार नाहीं तो तुम्हांला; जा... पळा ! तो पहा....गिरणीचा भोंगा झाला; ऑफिसचा टाइम झाला; गाडीची घंटा झाली. पळा ऽ पळा ऽ म्हणतों ना ! ! "

त्याच्या त्या आकस्मिक शब्दांनीं नि तऱ्हेवाईक हालचालींनी साहेब चमकले. तेवढ्यांत, खरोखरच गार्डची शिटी फुरफुरली; घंटा घणघणली; इंजनहि घोगरं ओरडलं; तेव्हां आपापल्या डब्यांकडे, नकळतच, सारे दबदबा धांवत सुटले; गर्दी ओसरली; नि गाडीहि हलली तितक्यांतच...

कांहीं स्थानिक लोक मात्र अजून भोंवतीं रेंगाळत होते. आणि चेकर, पोर्टर, मास्तर, एक रेल्वे पोलीस...

तरी जलाल स्तब्ध होता; क्षणिक गांभीर्य, क्षणिक मिस्किल हास्य, आलटून पालटून त्याच्या चेहऱ्यावर उमटून जात होतं. पण पांच मिनिटांपूर्वीच्या आपल्या बेडर कृत्याबद्दलची कसली खंत वा मानसिक, पश्चात्ताप, त्याच्या चेहऱ्यावर एकदांहि तरळत नव्हता.

जलालला ऐकूं नव्हतं जात तें. पण आसपास, दूरवर, ग्रामस्थांचे तुरळक घोळके, आपसांत कुजबुजत होते, झाल्याबद्दलची विचारपूस नि त्यावरल्या अभिप्रायांची दे–घे करीत होते...

ठिकठिकाणीं न्यायकोर्टं होतीं—

" वाटलंच होतं. असं कांहीं तरी होईल ! अखेर हा ज्वालामुखी असा उफाळला. "

" एकेकाळचा त्यांचाच प्यारा...मारेकरी...आज अखेर त्यांच्यावरच..."

" होतं कुठं नाहींतरी त्याचं सूत...हल्लीं ? "

" तीन चारदां खडी फोडूनहि आलाय् ना, दोनतीन वर्षांत...म्हणे ? "

" आश्चर्य कसलं पण त्यांत ? तुरुंगाच्या किल्लयाच हल्लीं शेठजींच्या हातीं—"




" मग त्यांनीं काय त्याची गय करावी म्हणतां, होय ? मोठे शहाणे ! ...कां म्हणून ! शेठजींच्या लक्ष्मीघराला, यानेंच ना....आंतून उडवायला ...सुरुंग ठासले ? त्यांतूनहि उमरशेठ शीरसलामत राहिले, ही आपली त्यांची मखलाशी !....त्यांची चलाखी ! "

" पण म्हणजे केलंन् काय त्यांचं यानें ? चोऱ्या ? "

" चोऱ्या ! त्या परवडल्या !...हो, काय करायचं ठेवलंन् यानें ? खंड न पाळण्याचा त्यांच्या कुळवाड्यांना कानमंत्र कोणी दिला ? त्यांच्या गिरणीचे नि होजेरीचे मजूर, पगाराचें भांडण उकरून, गतसालीं संपावर गेले; त्यांतला म्होरक्या कोण त्यांचा ? पुढें मग, वारल्या-काथोड्यांना उठवलन् लेकानं ! कोळसा पिचवलान् ; हजारांच्या भट्ट्या विझवल्यान्, नासवल्यान् !...आणि डोंगरचे जंगलकुपं तोडणारे मजूर ? त्यांच्या तर एकेकाच्या अंगावर शेंकडों रुपये शेठजींचे ! पण मखलाशी करून, नव्या वर्षाची खर्ची सर्वांच्या आधीं हातीं सुरक्षित पाहून...यानेंच ना मग, त्या काथोडी कातकऱ्यांचे ताफेच्या ताफे, रात्रींच्या पोटांत, शेटजींना सोडून पळवून लावलेन् ? ?...

" अस्सं–नाहीं ? भले ऽ ! छान ! इतक्या वर्षांचा नोकर त्यांचा. तेव्हां चोरांच्या वाटा चोरांला... "

" तें वाटेल तें म्हणा !–पण म्हणून त्यामुळें शेठजींचं काय वांकडं झालं ? तो संप मोडला दोन दिवसांत; यानें मात्र खडी फोडली सहा महिने !– शेठजी तर हल्लीं काँग्रेसवाले; एक एक नवा डाव टाकून, हां हां म्हणतां त्यांनीं उलट जलालवरच शेतकऱ्यांना उलटवलें ! अखेर ते अशिक्षित कुळवाडी –' भेदी मुसंडा ' म्हणत, याच्याच मागें लागले; मग तोंड लपवतां लपवतां याच्याच नाकीं नऊ आले ? साहेऽब ! राजकारण आहे हें...राजकारण ! ! हें...हें...लेच्यापेच्याचं काम नाहीं इथं !... "

" पण जलालनें वारल्या–काथोड्याचं मध्यें रान उठवलंन् , तेव्हां.... ही ऽ ?..."

" साळी कीं पळो केलं हं बाकी कांहीं दिवस साऱ्यांनीं सरकारला नि जंगलकुपवाल्या शेठलोकांना !–मला तरी वाटतं...जलाल कम्युनिस्ट आहे.–"

" अरे जा–ही नुसती फॅशन आहे बोलण्याची ! कम्युनिस्ट असो [illegible] असो –मिळवलंय् काय ? तें सांगा ! पांच पन्नास वारली

काथोडी गोळ्यांना बळी पडले; कातकऱ्यांनीं पांच पंचवीस हजारांच्या बाक्या बुडवल्या शेठजींच्या, कबूल ! पण, त्या कुबेराला तेवढ्यानें भीक का लागणार आहे. अहो ऽ मी सांगतो ना ?...जंगल धंद्यांत नव्या व्यापाऱ्यांना शिरूं द्यायचं नाहीं, शिरतील त्यांना धंद्यांतूनच उठवायचं, एवढं नुसतं शेठजींनीं ठरवलं;... तर; भरमसाट आंतबट्ट्याचीं सरकारी टेंडरं त्यांनीं भरलीं; घेतलीं, पदरमोडीनें वल्हकलीं–चालवलीं ! त्यामुळें उलट शेटजींचं आतां वर्षानुवर्ष सरकारी वजन वाढलंय; एका हाताला असा तोटा, तर तिकडे दुसऱ्या हाताला तसे हजार फायदेच उठवले त्यांनीं ! घ्या ऽ !.... मग त्यांच्या पुढें तर हा जलाल म्हणजे किस झाडका पाला–"

" काय पण जोर चढला होता हो मवा त्याला ? जातीचा मुसलमान खरा ! पण धार्मिक पिसाटपणा नाहीं हं त्याच्याकडे ! उलट शेठजींना मारतांना त्याच्या डोक्यांत धर्म नव्हता;... नोकरी नव्हती;...स्वार्थ नव्हता... "

" कम्युनिस्ट म्हणा कीं कांही म्हणा पण एक पक्का इरसाल माणूस आहे जलाल म्हणजे— हें तर नक्की ? "

" हो हो तर !... एक मुख्य माणूस आहे खरा ! मारे ऽ गत सालीं हुल्लड उठवलीन् !...म्हणे ऽ ' मुद्देमाल–पुराव्यानिशीं शेठजींच्या देशद्रोही कारवाया चव्हाट्यावर मांडतो; नि त्यांना तुरूंगांत डांबतो ' म्हणून ! पण अखेर काय ? हड्डी नरम होऊन तो, स्वतःच मार खाऊन, हॉस्पिटलांत पडला; कागदपत्रांच्या बॅगमध्ये निघाले शेठजींच्या घरचेच, चोरून आणलेले शंभर तोळ्याचे दागिने ! नि ' विश्वासघातकी चोरटा नोकर ' म्हणून, हाच शेवटीं पडला तुरुंगांत जाऊन... "

" पण यांत तो कसा मूर्ख ठरतो ? स्वतःच्याच तोंडाला काळोखी फांसून येतोय् , महाराज ! तुमच्याच नव्या राज्यकारभारावर हा विदारक प्रकाश पडतोय यांतून. शेठजीऐवजी हा मार खातो; हा चोर ठरतो; हाच चक्की पिसायला जातो !! हाच ना तुमच्या शेठजींचा नि तुमच्या स्वतंत्र सरकारचा तुम्ही करताहां तो गौरव ?? वा ऽ रे वा ! जिभेला थोडं हाड ? मनाची



[illegible] हवी सद्गुरू ! पैशानें अशीं वारंवार माणसं विकत घेतां येत असतील आजून !! पण जगांतला खरा न्याय नाहीं विकत घेतां येत, म्हटलं. "

" आणि का ऽ हो ?....मी विचारतों...इतकी धुतल्या तांदळाचीं होती तुमच्या उमरशेटजींची बाजू...तर मग, आज आतां तरी इतके धिंडवडे निघाल्यावर, खालीं मान घालून हो का गेले ते ? सांगा ना ?–"

" अलबत् !! मग ? एवढा मोठा प्रतिष्ठित दानशूर नागरिक तो ! तो काय नालायक चोराच्या नादीं लागणार ? आणि ते तसेच निघून गेले, म्हणून, आतां यानंतर हा–थोडाच सुखासुखी सुटणार आहे, तुम्हाला वाटतं ? ...याचा मुडदा पडायचा राहणार आहे थोडाच आजच्या आज,...तुम्हांला वाटतं ? चार दिवसांपूर्वी तो तुरुंगांतूनच सुटला ! आतां संध्याकाळपर्यंत अगदीं जगांतूनच..."

" म्हणजे आलांतच कीं तुम्ही मूळपदावर !! वारे तुमचा न्यारा न्याय ?–वाऽ रे तुमचं स्वतंत्र राज्य ...."

तेवढ्यांत, खाड् खाड् बूट वाजले. फौजदार, जमादार, बंदुकवाले, तीन शिपाई अशी एक पोलिसपार्टी जलालच्या बांकाकडे वळली.

चौफेर पांगलेली गर्दीहि नव्या उत्सुकतेनें त्या बाजूला वळली.

बातमी ऐकून, शेठजींचा तरुण मुलगा मुजावरहि फौजदाराबरोबर रागारागानें तिथें आला होता. जलाल समोर दिसतांच, धांवत जाऊन, त्यानें त्याची मान पकडली.

संतापातिशयानें थरथरत नि जलालच्या थोबाडावर एकामागून एक दोनतीन ठोसे लगावत तो ओरडला, " सुव्वर का बच्चा ! मेरे दादाको तूने ये क्या किया ? निमकहराम अवलाद !! "

जलालनें मात्र प्रतिकारासाठीं एकदांहि वर हात केला नाहीं; ते ठोसे तो निमूट सोसत होता.

त्याच्या जिवणींतून रक्ताचा ओघळ घळघळूं लागला होता. एकदां हात वर करून, तें रक्त तेवढं, आपल्या कोटाच्या बाहीनें जलालनें पुसलं नि मुजावरकडे, एकदोनदां, निमूटपणें, सस्मित चेहऱ्यानें पाहिलं.

माणसाच्या मनस्वी रागासमोर, निर्भेळ शांतपणा–संथपणा आला–त्याला कसला प्रतिकारच झाला नाहीं, कीं, प्रथम क्षणभर त्याचा चिडखोरपणा वाढतोहि. पण मग मात्र, हळूहळू अगतिकपणांतच त्याचा शेवट होतो.

मुजावरचंहि तसंच झालं.

विशेषतः अगदीं बाळपणापासून, जलाल बरोबरचं त्याचं तासन् तास मोटारींतून भटकणं, हंसणं–खेळणं, खाणं–पिणं !... त्या साऱ्या जुन्या आठवणी नि 'जलाल च्याच्या', बद्दलचा त्याच्या मनांतील प्रथमपासूनचा नैसर्गिक लळाच आतांहि पुन्हां एकदम जागा झाला. पहिल्या रागांत त्यानें त्याला मारलं खरं; पण पुन्हां मारायला उगारलेला त्याचा हात, (त्याच नेहमींच्या वत्सल सस्मित चेहऱ्यानें, त्या क्षणींहि, शांतपणेंच आपल्याकडे जलाल बघत असलेला पाहून) अखेर जणूं गळल्यासारखाच खालीं पडला.

तेवढ्यांत, आपलं रक्तबंबाळ तोंड पुन्हां पुसत त्याच स्निग्ध दृष्टीनें मुजावरकडे संथपणें पाहात, जलाल म्हणाला–"मुजोरभाईजान! बचपनामधें तुम्ही कितीदां तरी मला ठोसे लगावायचात् रागानें ! आतांहि चार मारा हवे तर ! ... मारा ! मारा ना ! थांबतां का ?"

मुजोरभाई कांहींसा शरमिंदा झाला होता. तेवढ्यांत जलाल गंभीरपणें पुढें म्हणाला– "खरं सांगूं ? तुम्ही आमच्यांत अगदीं न पडलेलं बरं... दादाजींची लाखाची संपत्ति तुमची असेल,... पण त्यांचीं पापं, त्यांचीं त्यांनाच !... त्यांत माझीहि थोडी भागिदारी आहे ! !... याच आयुष्यांत तीं पापं, त्यांचीं त्यांना नि माझीं मला जरा फेडूं द्या ना—"

मुजावर क्षणभरच जागच्या जागीं घुटमळला. अखेर, अगदीं नामोहरम झाल्यासारखा होऊन, त्यानें निमूट मान फिरवली व तो बाजूस जाऊन उभा राहिला.

*

नव्या मारामारीच्या अपेक्षेनें–तयारीनें व त्यावेळच्या बंदोबस्तासाठीं केवळ आलेले ते हत्यारबंद पोलिस !– अजूनही, तिथं नवीन कांहींच विपरीत घडून न आल्यामुळें—, गौरीच्या आरासांत जेठा मारून बसणाऱ्या —चिकण मातीच्या निश्चल पोलिसासारखेच, जागच्या जागीं खिळले होते.



कायदा, संरक्षण, बंदोबस्त, सत्ता, स्वार्थ, सारं आपल्या एकाच पोलादी हातांत केंद्रित करून उभे असलेले फौजदारसाहेबहि, समोरच्या त्या 'मुजावर ट्रॅन्सफर सीन' नें पार अगतिक झाले होते—

पण मग,—मुजावरबरोबर, एखाद्या पढीक धर्मोपदेशकासारखा, जलाल संथपणें बोलत असलेला पाहून मात्र, त्यांचा पारा अखेर, हळूं हळूं चढतच गेला.

एकदम चवताळून, आपल्या नैसर्गिक उद्धटपणानें व अंगीं मुरलेल्या सत्ताधीश अरेरावीनें, ते जलालवर धांवून गेले; नि त्याच्या कानशिलांत फडा-फड दोन भडकावून ते ओरडले, "निमकहराम–बदमाष ! मोठा साळसूद-पणाचा आव आणतो आहेस रे ? ही काय कम्युनिस्टांची सवंग व्याख्यान-बाजीची सभा समजलास ? बेशरम ! !"

त्याच आवेशांत त्यांनीं जलालवर फिरून एकदां हात उगारलाहि; पण, तो मात्र वरच्यावर दडपून धरत, जलाल त्यांच्यावर त्वेषानें ओरडला–"हं ऽ खबरदार !...सुभेदार ! ! माझ्यापुढं कशाला कम्युनिस्टांच्या नांवाचं तें कळ-कळ कीर्तन ? असं बेइन्साफ मला मारण्याचं काम नाहीं तुमचं ! हं !आधींच सांगतोंय् ! मला माझा आजचा बेकायदा गुन्हा सही सही कबूल ! मला आतां कुठं नेतां ? बोला ? चला ! विश्वास नसला, तर मुसक्या बांधा हव्या तर ! अंमलदार असाल; तरी पण पोलिस नोकराच्या हातचा मार नाहीं खाणार मी ! याद राखा ! आधीं कोठडीचीं कुलुपं लावा; नि 'पोलिसी समज' द्यायचाच, तर मग...चार भिंतींत गपचूप चोरून मारून. रस्त्यावर, असा चार चौघांत नाहीं ! सांगून ठेवतों !"

*

मग, पोलिसांकडून गपचूप मुसक्या बांधून घेत, क्षणभरानें जलाल त्याच तीनतेनं पुढें म्हणाला, "आणि काय हो ? मी निमकहराम ?...उगाच बोलून अपलक्षण केलंत, फौजदारसाहेब ! एकमेकांना तर आपण खूप खूप ओळखतोंय्. मग ? कोण अधिक निमकहराम ? कोण अधिक बदमाश ? माझी निमक-हरामी असली, तर एकाशींच...त्या नालायक उमरखानाशींच ! तुम्हीं तर काल वेळा आपल्या देशाशीं, आपल्या लोकांशीं, निमकहराम झाला आहां !... तुमच्या सारख्यानींच मला–"

पुन्हां एक खाडकन् आवाज झाला नि त्याचबरोबर फौजदार जलालवर कडाडले–"चूप! एकदम चूप!! बत्तिशी उतरवून टाकीन्! चोर, दरोडेखोर! वर्षभर खडी फोडत होतास तोच बरा होतास.... "

"नि आतांहि तुम्ही पुन्हा मला तुरुंगांत टाकणारच; आहे ठाऊक मला! पण तें देशाच्या नव्हे; माझ्या नव्हे; तुमच्या नि शेठजींच्याच हितासाठीं!" नाकांतून येणारं रक्त, मान दुमडून खांद्यानें पुसत, जलाल ओरडला. "म्हणूनच तर माझा कुणाला कुठं वास लागण्यापूर्वी, नि तुमच्या पित्त्यांचीं जाळीं माझ्या भोंवतीं गुरफटण्यापूर्वी.... आजच्या आजच, हें सारं थंड डोक्यानं मी उरकून घेतलंय्! समजलांत? जातां जातां, चांभाराच्या देवाची खेटरानें पूजा नको करायला? तुम्हां साऱ्या चोरांची प्रतिष्ठा मला या माझ्या गांवच्या तरी वेशीवर टांगायचीय्...परत भिंतीआड जाण्यापूर्वी–भिंतींत चिणून मरण्यापूर्वी!... आलं ध्यानीं, फौजदारजी?"

जलाल उपहासानें हंसला. त्याचवेळीं, जमावातलेहि एकदोन नकळत खुदकन हंसले.

त्यामुळें एकदम चिडून जाऊन, त्या बाजूस पाऊल आपटत, त्यांच्यावर फौजदार खेंकसले, "काय रे ए ऽ? पळा...पळा म्हणतों ना इथून! काय तमाशा आहे का चाललेला इथं?"

बरेच दचकून जागचे पांगले.

जलाल मात्र अधिकच उपहासाने नि बेदरकारपणें हंसून म्हणाला, "त्यांच्यावर कां आतां हा राग, फौजदारसाहेब? त्यांनीं असला न्यारा तमाशा कधीं पाहिलाच नसेल!...नि असल्या रस्त्यावरच्या तमाशांत, माझ्यासारखा अवलिया नाच्या पोऱ्या, तुम्ही तरी पाहिला होता का हयातींत? माझ्यामुळेंच हा तमाशा उभा राहिलाय् रस्त्यांत आज इथं!... पण तेंहि बरोबर! तुम्हीं चवल्या पावल्या लावणारीं साधींसुधीं माणसं आहां थोडीच? तुम्ही तर स्वतःच हजारों रुपये खाणारीं नि हजम करणारीं सरकारी माणसं!! मग, असल्या बिचाऱ्या साध्या तमासगिरांवर चिडून, धांवणार–ओरडणार नाहीं तुम्हीं, तर मग करणार काय दुसरं? हॅः हॅः ..."

मुसक्या धरलेल्या पोलिसांनीं, त्याच वेळीं, जलालला एक दोन जोराचे हिसके नि गचांड्या दिल्या व स्टेशनाच्या फाटकाकडे खेंचलं.



फाटकाबाहेर पडतांच, जलालबरोबर चालणारी गर्दी अधिकच वाढली; गांवातल्या हजारांच्या तो माहितीचा; झाल्या प्रकाराचं कसलं कोडं पडून नव्हे–आजच्या त्याच्या त्या साहसी वागणुकीनें अत्यंत स्तंभित होऊनच, सारे त्याच्याकडे टकमका पाहातच चालले होते. नेहमींचा जलाल त्यांना आज साफ निराळाच दिसत होता–भासत होता.

अगदीं भकास नि भयंकर! अंगावरच्या कपड्यांचीं आतांपर्यंत लक्तरंच झालेलीं; केसांच्या झिंज्या, डोळ्या-तोंडावर आलेल्या; तोंडावर, कपाळावर नि अंगावर त्याचंच रक्त ओघळून ठिकठिकाणीं सांकळलेलं... !

तरी, त्या परिस्थितींतहि, जलालच्या चेहऱ्यावर, एक प्रकारचं उपहास–तुच्छतेचं, पण स्वाभिमान दर्शविणारं, एकच एक स्मित सारखं झळकत होतं. आपल्या ओढलेल्या पण चमकत्या डोळ्यांनीं बेदरकारपणें सभोंवार पहातच तो रस्त्यांतून संथ चालला होता.

रस्त्यांतही गर्दी फुलली होती. समोरून येणारी एक मोटार मध्यावरून हळूहळू सरपटत होती!

जलालजवळ ती येतांच, त्याचे डोळे एकदम चपापले नि तो खदखदा हंसला– "ओऽहोऽ डॉक्टर-साब?"

त्या आरोळीनें दचकून, खिडकीतून बाहेर पहाणाऱ्या डॉक्टरांना, तो पुढें म्हणाला, "कुठें निघालां? शेटजींचे फॅमिली डॉक्टर ना तुम्ही? मग पळा की आधीं बंगल्यावर! गाल खूप सुजले असतील आतांपर्यंत... शेटजींचे हो हो ऽ! मी ना ऽ, पायतणांनीं मारलं मघा त्यांना स्टेशनवर...."

गर्दीमुळें मोटार तर क्षणभरहि पुढें जाऊं शकत नव्हती.–

तीच, हंसत हंसत, जलाल पुढेंहि मोठ्यानें म्हणाला, "बघतां काय असं वळकावून माझ्याकडे? म्हणजे असं–त्यांना आजपर्यंत पैसा खूप मिळाला; त्या जोरावर मोठेपणा नि नांवहिं मिळालं! पण आयुष्यांत खेटरं मात्र आजच नि मीच दिलीं बरं का त्यांना, पहिल्याप्रथम! जुना नोकर ना मी त्यांचा? करणार काय? माझं अखेरचं काम एकदां उरकून घेतलं मी! जा .... आतां तुमचं काम तुम्हीं सारं करा! नीट तपासा बरं त्यांना;

मला पुन्हां एकदां तुरुंगांत घालायला, तुमच्याहि सर्टिफिकेटचा उपयोग होईल त्यांना. ... ”

*

शेवटीं, गोंधळल्या नजरेनं बाहेर डोकावत, डॉक्टर फौजदारांनाच म्हणाले —“ अरे ऽ अरे ऽ कसली धमाल ही, फौजदारसाहेब ? नि हा कसा इथं पुन्हां... ? असा ... ”

फौजदार पुढें होत, शहाजोगपणानें, तुच्छ स्वरांत पण हळूंच म्हणाले, “ कुछ नहीं डॉक्टर ! शेठजींच्या दागिन्यांची चोरी करून गेल्या वर्षी तुरुंगांत गेला होता ना हा पाजी जलाल ? आतां बदमाष—चार दिवसांपूर्वीच सुटलाय् तुरुंगांतून ! त्यांत पुन्हां डोकं झालंय् हलकं त्याचं ! दुसरं काय ? तें सोडा; कुठं....घराकडे ? जरा मी येतोंय त्या बाजूला. अं ऽ ? अच्छा... हें पहा जमादार, फरासखान्याकडे न्या या चोराला सांभाळून ! हा आलोंच मी पांच मिनिटांत... ”

फौजदारांनीं डोळे मिचकावलेले पाहून जमादारानें “ अच्छा ऽ साब ऽ ” म्हणून सलामी दिली.

डॉक्टरनीं उघडलेल्या दारांतून फौजदार आंत शिरले.

इतक्यांत, जलाल मागून अगदीं चिडून चिडून ओरडला—“ खबरदार—मला चोर म्हणून स्वतः चोरासारखं येथून पळालांत तर ! मुद्देमालासकट उमरखानाला तुरुंगांत नाहीं तर पाकिस्तानांत पाठवायची मीच कोशीस केली. या देशाचा खराखुरा, जागा, स्वतंत्र नागरीक मीच ! पण दागिन्यांच्या खोट्या मुद्देमालानें तुम्ही साऱ्यांनीं मलाच तुरुंगांत पाठवलं; आपल्या तुंबड्या भरून, देशद्रोही बदमाष बाहेर ठेवलेत ! मग मोठे बदमाष, मोठे दरोडेखोर जास्त निमकहराम, कोण ? सांगा ? मी कीं तुम्ही सारे ? माझं डोकं हलकं होणारच त्यामुळें ! पण तुमच्यासारखं माझं दिल मात्र हलकं नाहीं झालेलं अजून ! ! वा ऽ रे आमचं स्वराज्य; म्हणे गांधींचं रामराज्य ! तिकडे आंधळे श्रम करून दळताहेत; हीं असलीं कुत्रीं इकडे सगळंच्या सगळं पीठ खाताहेत ! ! ”

तोंवर, मोटार सुरू झाली होती !



जलाल अधिकच चवताळून ओरडला— “ आतां कां जातां पळून ? उत्तरा आधीं. सबू ऽ र ! सबू ऽ र. म्हणतों ना ? नाहीं ऐकत ? नाहीं थांबत ? थांबलंच पाहिजे तुम्हाला ! मी म्हणतोंय्, म्हणून. ”

आणि त्याच तीव्र भावनांच्या आवेशांत, हलूं लागणाऱ्या डॉक्टरांच्या त्या मोटारसमोर, बघतां बघतां, आपलं अंग जलालनें भिरकावलं एकदम.

“ मेला ! ” “ मेला ! ! ” कित्येकांनीं मोठ्यानें ओरड मारली.

तें निमिषार्धांत घडलेलं ड्रायव्हरच्या लक्षांत येई तोंपर्यंत, जलालच्या डोक्याला मडगार्डचा एक फटका बसला होता. पुढलीं दोन चाकं त्याच्या अंगावर गचका घेऊन अर्धीं अधिक चढलीं होतीं. पडल्या पडल्या ‘ आऽह् ’ असं तो एकदां विव्हळलाहि; तरी दडपल्या आवाजांत अस्पष्ट ओरडलाच— “ मी इथं मेलों तरी बेहत्तर ! पण असे पळून जातील कीं काय फौजदार ? उतरा म्हणावं आधीं त्या गादीवरून खालीं ! जनता हुकूम करतेय् तुम्हांला.”

ड्रायव्हरनें एकदम ब्रेक दाबले; प्रसंगावधानी चलाखीनें गाडी मागें घेतली; जमादार, पोलिसांनीं आपला गेलेला तोल सांवरून जलालला झटपट मागें ओढलं; पुन्हां उभं केलं.

तेवढ्यांत, डॉक्टर नि त्याच्यामागून फौजदारहि लगबगीनें खालीं उतरले.

गोंधळून—चिडून, जलालकडे धांवतच जात, फौजदार त्राग्यानें त्याच्यावर ओरडले— “ अरे ए ऽ सैतान ! हें काय, चालवलंय्स काय, तूं आज ? मरायचंय का ? ”

बसलेल्या मारानें, कपाळावर दोनतीन ठिकाणीं रक्त घळघळत होतं; बरगड्यांनाहि मुका मार बसला होता. त्या वेदना तो सहन करीत होता.

तरी देखील, जलाल पुन्हां फौजदारावर उसळला—“ मरायचंय् ? मला ? ? तुम्हांला मारायचंय् आहे ना मला, म्हणून विचारतांहां होय ? म्हणजे- आत्महत्याच ना ? मी हो कशाला करूं ? आतांपर्यंत तुम्हींच सर्वांनीं करत आणलीय् कीं, माझी,... ‘ आत्महत्या ’ ! तुमच्या हिशेबी तर मी केव्हांच मेलोय् ! माझं सरकारी, संरक्षण करतां करतां, गतसालीं माझ्यावर मारेकरी घातलेत,.... आज कायदा-बंदोबस्त म्हणत, एवढं रक्त सांडलंत माझं ! तुमच्या दुर्दैवानें, पुरता मेलों नाहीं अजून मी, एवढंच ! तरी पण, याद राखा, फौजदारसाहेब ! तसा सुखासुखी मरणार नाहीं आहे मी ! ! माझ्या-

वरच्या तुमच्या प्रत्येक वारागणिक, तुम्हीच सारे मरणार आहां! मला तुरुंगांत टाकूनहि, तुम्हीच, अखेर जिंद्गीभर खडी फोडणार! कुठंहि पळायला पहा—मी मेरेपर्यंत तरी तुम्हांला नि साऱ्यांना हेंच ओरडून ओरडून सांगणार..." हे पहा! हे तुमच्या देशांतले निमकहराम! हे बदमाश... हे दरोडेखोर! मी नव्हे!! मेल्यावरसुद्धां भूत होऊन मानगुटीवर बसेन तुमच्या."

*

जमादाराच्या हातून जलालला बाजूला करीत, मग डॉ. त्याला समजावीत म्हणाले, "ऐक-ऐक! वेडेपणा रे काय चालवला आहेस हा आज, जलाल? उमरशेठजींचा एकेकाळचा कर्तबगार नोकर तूं..."

त्यांच्या ड्रायव्हरनें तेवढ्यांत दिलेली फर्स्ट एड बॅग उघडत डॉ. पुढें म्हणाले, "थांब!.... रक्त सांडतंय् अजून तुझं; बॅंडेज बांधतों..."

"माझं रक्त! म्हणजे रस्त्यांतल्या एका साध्या...दरिद्रि माणसाचंच ना रक्त?" डॉक्टरना आपल्या दुखावलेल्या हातानें बाजूला करत, जलाल खिन्न स्वरांत म्हणाला– "छेः छेः! माझ्यासाठीं कशाला तुमचं एवढं महाग सरकारी बॅंडेज नासवतां, डॉक्टर? अहो ऽ ... कोणाचंहि राज्य येवो; ... हें सामान्य माणसाचं रक्त, रात्रंदिवस, असंच घळघळत राहणार! श्रीमंतांच्या डॉक्टरांनीं नाहीं कधीं थांबणार तें! 'जनतेचं राज्य' हें नुसतं नाटकी बोलणं असतं, सभा जिंकायला .."

तरीहि, डॉक्टरांनीं मलमपट्टी सुरूं केली; तेव्हां जलालचा नाइलाज झाला.

मग, हळूं हळूं, त्यांना तो म्हणाला– "मीं वेडा, डॉक्टर? हो कृतकर्माचा पश्चात्ताप नि नवा नवा अनुभव यांनीं मीं बदललों. भोंवतालचं सारं जग तसंच बदलेल, असंहि वाटलं मला! तेव्हां, एक वेडाच मी! 'छू' म्हणतांच, शेठजींसाठीं वाटेल तें करायला, पूर्वी मी धांवलों; ती तेवढी माझी कर्तबगारी! नाहीं, डॉक्टर? नीच स्वार्थानें नि दहशत बसवायला, शेठजींनीं केलेल्या निरपराध्यांच्या छळणुकी नि बेछूट खून—त्यांतली मुडदेफराशी मी केली! या फौजदारसाहेबांसारख्या अंमलदारांच्या मदतीनें वर्षानुवर्षे खोटे नाटे मुद्देमाल—पुरावे उभे केले! तीही कर्तबगारीच माझी! त्यावेळीं, प्रतिष्ठित शेठजींचा नोकर मी...! पण आतां? त्याच या कुत्र्याला



पिसाळलेला ठरवून, ... त्यांच्या दृष्टीनें तो निकामी ठरतोय म्हणून, गोळी घालून ठार मारायलाहि टपले आहेत हे सारे....! कां?... त्यांची निमकहरामी, बदमाषी....दरोडेखोरी, जगांत उघडी पडेल, म्हणून! वा ऽ रे! साळसूद चोर...सभ्य मवाली! हे स्वातंत्र्याचे अधिकारी कीं मारेकरी? सांगा डॉक्टर?"

"बंद कर बकवा, बेवकूफ!..." जमादारानें गर्जना केली नि जलालच्या पाठीवर जोरानें एक थाप मारली.

"अरे ऽ अरे ऽ! मारूं नका त्याला असं...." बॅंडेज बांधून संपवतां संपवतां, डॉक्टर गोंधळून म्हणाले, "तूं आधीं गप्प बस पाहूं. जलाल! हं...ड्रायव्हर, चल. याला आधीं हॉस्पिटलकडे घे....नि असिस्टंट डॉक्टरना सगळं नीट तपासायला सांग."

"अंहं; शुक्रिया-डॉक्टरसाब!..." जलाल विनम्र स्वरांत म्हणाला— "तुम्ही आपले जा आतां निश्चिंत;... फौजदारसाहेबांना घेऊन...! हॉस्पिटलकडे जायलाहि तुमची मोटार नाहीं परवडायची मला. मी काय उमरखान आहे? फौजदार आहे? मोटारींत बसून असं पळून जायला! माझे गरीबाचे पाय अजून चांगले उभे आहेत. बदमाष म्हणून मुसक्या बांधून जेलयात्रा तर काढली आहे ना यांनीं माझी? मग चालवेल तसं चालेन; नाहीं तर मरून पडेन, वाटेंत! चालेन तोंवर, रस्त्यांतली हीं चालतीं बोलतीं माणसें तरी दिसतील मला! मग आहेच या साऱ्या मारेकऱ्यांची मरेपर्यंत संगत! तरीपण, आज पक्का अंदेशा आहे मला, डॉक्टर! आजची ही माझी नुसती जेल—यात्रा नाहीं;.... अल्लाकडली, अखेरची यात्रा आहे ही! म्हणूनच तर अखेरपर्यंत दिल चाहेल तें ओरडून घेणार आहे मी!... नमस्ते! जा तुम्ही—डॉक्टरसाहब, कमसे कम हा जलाल एक सच्चा....पाक मुसलमान तरी आहे! नुसता पाकिस्तानी नाहीं उमरखानसारखा;...भोंदू हिंदु नाहीं या फौजदारासारखा; हम् हैं एक अस्सल इन्सान!"

क्षणभर विसांवून, मग लंगडत—विव्हळत पहिलीं पावलं टाकत जमादाराला म्हणाला,—" चला...कुठं नेतां मला? —"

*

फौजदार गाडींतून अदृश्य होतांच, गर्दी पूर्वींहून अधिकच दाटली; शेंकडों लोक जलालच्या भोंवताल्नून चालले होते.

त्यामुळें संतापून, जमादार एकदोनदां ओरडलाहि-" हटो बाजू—"

पण तेवढ्यापुरतं थोडं पांगून, सारे पुन्हां जलाल बरोबर बरोबरच चालू लागले.

" सलाम, जलालच्याच्या ऽ..." दोन तीन वारली-काथोडी, चालतां, चालतां जलालजवळ सरकून चालत म्हणाले.

एकानें कुडत्यांतून विडी काढली. दुसऱ्यानें चकमक पेटवली.

हात पुढें करून, चालतां चालतां विडी शिलगावीत, त्यांच्याकडे वळून स्निग्ध स्वरांत, घरगुती पद्धतीनें हसून, जलाल म्हणाला, " आवारं कुटं ऽ तुमी ऽ? जकलीं पोरामानसां...बरीं हातना घरीं, जंगलांत?— "

" हां दादा ऽ तुमच्या कुरपेन्... " पहिला म्हणाला.

" आज ब्येस केलां बरीक, च्याऱ्या, तुमी." पलीकडल्या म्हाताऱ्याचे डोळे, बोलतां, बोलतां चमकले, " शेठ तू आज ठेशनांत सफ्फा मेला! आतां कदा बी डोई नाय काडनार वर, बगा... "

उमरशेठजींच्या जंगलकूप—कोळशांचीं मजुर माणसंच होतीं तीं; सारीं कृतज्ञपणें त्याच्याकडे पाहत होतीं.

तसं ऐकतां-बोलतांना, जलालपुढं मागलीं सारीं चित्रं दिसूं लागलीं. " बेस केलां—" म्हणणाऱ्या नौश्याकडे पाहतां पाहतां, त्याला दचकल्या-सारखं झालं.

*

सात आठ वर्षांपूर्वींचा तो प्रसंग—

" हे बदमाष भट्टया मुद्दाम रेंगाळत हळूहळू लावतात; माझ्या धंद्याचं जाणूनबुजून नुकसान करतात; सारखं;...हरामखोर नुसते माजले आहेत. फार—" असा उमरशेठजींचा शिवीगाळीसकट मजूरांना तासभर दम चालला होता.

त्यांचा जलाल ड्रायव्हर जवळच होता. तो निमूट उभा होता.

बघतां बघतां, अखेर, भयंकर रागानें शेठजींनीं याच नौश्याचं लहान पोर एकदम भट्टीकडे फेंकलं होतं;... केवळ तोंडाच्या दादागिरींत नेहमीं मस्तपणें वागणाऱ्या जलालचं मन, तें साक्षात् क्रौर्य पाहून एकदम कळवळलं होतं.



तिकडे धांवतच जाऊन, भाजणाऱ्या त्या पोराला त्यानें मागें खेंचलं होतं;....वारा घालून,...तेल लावून, त्याला आराम आणण्यांत, पुढला अर्धा तास जलाल गुंतला होता.

तेवढ्यांत दूर अंतरावरल्या मोटरीजवळून शेठजी त्याच्यावर खेंकसले होते...

" बस्स कर तेरी मलमपट्टी, जलाल! पहले अपनी गाडी का ध्यान..."

इतक्या वर्षांनीं, त्याच निर्दय, उन्मत्त शेठजींना, केवळ चार चपला मारल्या गेल्या चव्हाट्यावर; पण त्यांत त्या मागल्या त्यांच्या जुलमी अन्यायाचें उट्टं फेडल्याचं केवढं समाधान नौश्याला लाभलं होतं! तरी पण किती दुबळं होतं तें!

परिस्थितीनें माणसं किती दुबळीं, अल्पसंतुष्ट होतात!—

त्या आठवणीनें, जाणीवेनें, जलालच्या डोळ्यांत, चालतां चालतां टचकन् पाणी उभं राहिलं.

एकदम एक हुंदका फुटून तो मोठ्यानें पुटपुटला—" या अल्लाऽ...मैं कुत्ता हूं! मैं कुत्ता हूं!! मैं इसी गरीबको सताता था!.... मुझे माफ करना... परवर दिगर!!..."

पोलिसांनीं त्याचवेळीं त्याच्या मुसक्या ओढल्या. पण जलालचं तिकडे लक्षहि नव्हतं.

तीन वर्षांपूर्वींच्या, जंगलाजंगलांतल्या त्याच्या धांवपळींत त्या क्षणीं त्याचं मन भटकत होतं; लपत छपत धांवत होतं. त्या प्रसंगपरंपरेशीं एकरूप झालं होतं!—

त्या वारल्यांच्याच उठावांत, त्यावेळीं तो एकदम जो सामील झाला होता, तो कम्युनिस्टांनीं त्याला कांहीं सांगितलं होतं, म्हणून नव्हे; असलंच सर्व इतकीं वर्षं स्वतः पाहून, स्वतःहि त्यांच्यावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष लहान मोठा जुलूम करून, अगर अन्याय करण्यास शेटजींना तटस्थ मदत करून, अखेर त्याच्या पश्चात्तप्त मनानेंच त्याला तो तसला प्रखर आदेश दिला होता.

हो, म्हणूनच मग त्यानंतरची ती नासधूस, धांवपळ, लपालपी, गोळीबार साऱ्यामध्यें तो स्वतः सामील होता. तो दलितांचा उठाव प्रखर होता. जलाल त्यांचा एक आधारस्तंभ होता.

पलीकडल्या त्या म्हाताऱ्या धावज्याचा तरणाबांड पोर...धाकल्या.... अशाच एका चकमकींत पोलिसांच्या गोळीला बळी पडला होता. त्यावेळीं म्हाताऱ्यानें ऊर बडवून घेतला होता.

ते बंड अखेर सरकारनें मोडलें. पुढारी कम्युनिस्टांबरोबरच जलालहि आठनऊ महिने तुरुंगांत राहून आला होता.

परतल्यावर या मजुरांची स्थिति चिमुटभर सुधारली असेल–नसेल;... शेठजींचे उद्योग मात्र तसेच पूर्ववत् नि जोरांत चालू होते. तें पाहून जलालनें आजच्यासारखाच एक दीर्घ निश्वास टाकला होता.

*

आज निघालेली जलालची ती जेलयात्रा! तोंपर्यंत ती खूप दूरवर येऊन रस्त्याच्या एका मोठ्या वळणावर फिरली होती. भोंवतीं गर्दी अजून तशीच होती नि आज ही जलालची भली मोठी 'वरात' रस्त्यानें चालली होती—

कोपऱ्यावरल्या एका हॉटेलमध्ये ग्रामोफोनचा लाऊडस्पीकर मोठमोठ्यानें बोंबलत होता.

जलालला दचकून क्षणभर भानावर आणणारे ते कानांवर आदळणारे दणदणीत शब्द–" दूर हटो ऽ, दूर हटो ऽ, ए दुनिया ऽ वालो, हिंदुस्थान हमा ऽ रा है! हिंदुस्थान हमा ऽ रा है!"

ते शब्द त्याच्या कानावर आदळले; आंत, मनांत शिरले. त्याचं अंग क्षणभर शहारलं. "हिंदुस्थान हमारा है!"

मग तो बाह्य भान विसरून, अकस्मात् अंतर्मुख झाला. " कोणाचा? .... माझा?....उमरशेठजीचा?... त्या फौजदाराचा?... या मजुरांचा? वारल्या काथोड्यांचा??..."

मागलं एक एक आठवून, त्या निर्जीव शब्दांना तो उपहासानें हंसलाच अखेर...

त्या मागल्या वेळीं तो तुरुंगांतून सुटला, तो आजारी होऊन. परत नोकरीवर जाणार नव्हता तो; पण धोरणी शेठजींनींच त्याला बोलावून घेतलं होतं.



"नोकरी सोडूं नकोस. हवा तर बरा होईपर्यंत घरींच रजेवर पडून रहा. पण माझ्याकडून जाऊं नकोस..." त्यांनींच त्याला फार आग्रह केला होता.

मधल्या साऱ्या प्रसंगामुळें ते त्याच्यावर मनांत तसे चिडले होते; पण लागलीच जलालला उघड दुखवणं,... त्याला कामावरून काढून टाकणं, तेंहि त्यांना परवडण्यासारखं नव्हतं. त्यांचीं हजारों अंडींपिल्लीं, इतक्या वर्षांच्या सहवासामुळें, जलाल तपशीलवार जाणत होता.

शिवाय, शेठजींना अखेरची एक आशाहि होती. " कांहीं झालं तरी जलाल एक मुसलमान आहे!..."

जलालहि तें सर्व मनांत ओळखून होता; ...म्हणूनच तर त्यांच्या आग्रहाप्रमाणें तो तिथंच त्यांना चिकटून राहिला होता.

दोघेहि एकाच धर्माचे; दोघांनाहि आशा होती; पण त्यांच्या आपापल्या आशेच्या व्याख्या निराळ्या होत्या.

तसं निरुद्योगी बसल्या बसल्या, जलालला शेठजींच्या नव्या जुन्या हजारों लटपटीहि रोज दिसायच्या...

रोज निरनिराळ्या ठिकाणाहून निरनिराळे झकपक मुसलमान, शेठजींच्या बंगल्यावर उतरायचे. कांहीं जलालच्या जुन्या माहितीचे; कांहीं अगदीं नवीनच चेहरे! त्यांच्या हालचाली नि कानावर पडणारे संवादांतले उडते शब्द! तास तास चालणारीं त्यांचीं तीं खलबतं! जातांना कोणी कोणी नोटा नि थैल्या मोटारींतून घेऊन यायचे–कोणी घेऊन जायचे–

हळू हळू जलालनें त्यावरून एक कयास बांधला होता–तिथं रोज कांहीं तरी वाटाघाटी-कारस्थानं...कांहीं काळंबेरं चालू होतं. आपापली कातडी बचावून, त्या सर्वांना कांहींतरी गुप्तपणें घडवून आणायचं होतं! तो एकदोन रुपयांचा नव्हे...लाखांचा प्रश्न होता! तो एकदोन व्यक्तींची नव्हे... कोटींची बाब होती.

पण स्वतःचा त्यांत कसलाहि प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळें, जलाल मात्र आतां तटस्थ असायचा, निमूट ऐकायचा; आजाराचं अधिकच सोंग करायचा.

*



जि. झ. ४....

—आणि अखेर, एक दिवस तर जलाल भयंकर चपापला. रात्रीं अकरा वाजतां, जलाल रहायचा त्या औट हाऊसमधें, दबकत दबकत स्वतः उमर-शेठजीच आले.

धाबऱ्या धाबऱ्या आंत शिरून, त्यांनीं आपल्यामागें दार बंद केलं. नि मग, मोठं अवसान आणून, ते जलालला भराभर म्हणाले—"उद्यांच्या उद्यां तुला निघालंच पाहिजे, जलाल! माझं एक अगदीं जोखमीचं नि गुप्त काम आहे....तुला तडक पाकिस्तानपर्यंत पाठवायचंय्...उद्यांच्या उद्यां!"

आश्चर्यानें जलाल पाहातच राहिला; तोंच शेठजी पुढें म्हणाले—"हे बहा...मी घातलंय् हें चामड्याचं जाकीट! तें तूं घालायचं नि वर हा लांब कोट...हातांत ही चामड्यांच्या बह्या-कागदपत्रांची बॅग! काय समजलं? प्रथम जायचं, आपल्या 'नबाब बँक मधें मुंबईला!....तिथं दोघे गांधी टोपीवाले भेटतील; ते 'पाक' असा शब्द म्हणतील; त्यांच्याबरोबर पुढें जायचं. ते सूचना देतील तसं मग सारं करायचं! पुढें, उद्यांच्या उद्यां, विमानानें कराचीला तूं निघालास, कीं, तार येईलच मला."

अजूनहि आपल्यावर शेठजी तसा वेडा विश्वास टाकतांना पाहून, जलाल अभावितपणें भयंकर दचकला होता; त्यामुळें शेठजीहि क्षणकाल गोंधळले होते! बोलायचं पुढें एकदम थांबले होते.

जलालला जाणूनबुजून शेठजींशीं कसली दगेबाजी करायची नव्हती; म्हणूनच तो अखेर अजीजीनें अडखळत अडखळत म्हणाला होता—"नाहीं शेठजी, नाहीं! माझ्यानें नाहीं होणार हें! नका टाकूं माझ्यावर असा विश्वास; नका नेमूं असली कामागिरी मला! कुठंच जायचं नाहीं आहे मला!! पाकिस्तानांत तर नाहींच नाहीं!!"

पण त्यावर, शेठजीच उलट त्याच्यावर चिडून ओरडले होते—"बस्स हो गयी तेरी निमक हरामी, जलाल! तें कांही नाहीं! गेलंच पाहिजे तुला; मी सांगतों म्हणून; सांगतो तिथं; सांगतों तेव्हां! आतां तुझ्याशिवाय कोणाला करतां येणार नाहीं,....सांगतां येणार नाहीं...हें काम!....तूं पाक मुस्लिम आहेस ना?"



"हो पाक आहे! म्हणूनच नको, शेठजी!" जलाल त्यावर अगतिकपणें पुटपुटला होता—"मला इथंच रहायचंय...नि इथं राहिलों, तरी पाकच राहीन मी!"

"चूप...पागल!" शेठजी उलटून त्याच्यावर पुन्हां खेंकसले होते—"मी सांगतों म्हणून,....मी सांगतों तसं कर आतां, गुपचूप सारं! नाहीं तर बघ!...आतां माझी...तुझीहि धडगत नाहीं! कुत्र्याच्या मोलानं मरावं लागेल तुला! याद राख....नि सावध रहा....सकाळीं...पहांटेच्या गाडीला निघायचं तुला...जा नीज तिथं!....अजून एक पत्र लिहायचंय् मला...इथंच बसून..."

खिशांतून पारकर पेन काढून शेठजी तिथंच खुर्चीवर बसून रात्रभर, कांहींतरी लिहीत, जणूं जलालवर जागता पहारा करीत राहिले होते.

*

रात्रभर जलालचींहि बिछान्यावर पडल्या पडल्या विचार चालला होता.

—पोरपणापासून याच भागांत हयात गेलेली;....किंबहुना, त्याची भाषाहि मराठीच झालेली;....पुन्हां त्याला आगा ना पीछा! तारुण्यांतल्या क्वचित् आचरटपणाशिवाय त्याला कसला संसारहि नव्हता.

धर्म त्याला कळे; पण तो कडवा नव्हता कधींच....त्यामुळें धार्मिक पिसाटपणा त्याच्या अंगांत कधींच घर करूं शकला नाहीं. पण त्यावरच आधारलेलं तें डायरेक्ट ॲक्शनचं माथेफिरू भयानक तांडव! त्याच्या मनाला तेंहि झेंपलं नव्हतं.

इथल्या बचकभर जमातींत, त्यावेळीं, मुंबईच्या कांहीं पिसाटांनीं वीष नि ठिणग्या टाकण्याचा...आग भडकवण्याचा जो मुत्सद्दी प्रयत्न केला, त्याचाहि जलालवर कांहींच परिणाम झाला नव्हता; किंबहुना, आपली एक छोटी जूट तयार करून, त्या चळवळीला उलट दोन हात देतांना, शेठजींसकट साऱ्यांचा त्यानें रागच ओढवून घेतला होता, आपल्या शिरावर!

त्यामुळेंच, प्रतिष्ठितांची इच्छा असूनहि त्या तालुक्यांत तें परस्पर विद्वेषाचं वीष पसरण्याचं टळलं होतं; त्यामुळेंच जलालची तिथल्या हिंदूमधली दोस्ती पूर्वीसारखीच राहिली होती. एवढंच नव्हे, तर ती जास्तच वाढली होती! तसल्या उदार संस्कारामुळेंच, जलालच्या मनाची त्या महात्म्याच्या

विचारप्रणालीनें त्या दिवसांत फार पकड घेतली होती. इतकंच नव्हे तर, "लबाड्या, बदमाश्या, धंद्यांत चालायच्याच..." या जलालच्याच पूर्वायुष्यांतील दंडकालाहि, संथ विचारांच्या त्या धरणीकंपाचा धक्का बसून; दुमड पडली होती. त्याच्या वागणुकींत आमूलाग्र बदल होत, तो हळूहळू अधिकाधिक दलितांकडे खेचला गेला होता.

अर्थात् त्यामुळेंच—शेटजींच्या मात्र हिशेबी, नोकर या दृष्टीची त्याची कार्यक्षमता नि किंमत साफ उतरत गेली होती.

*

पुढें आला तो विसाव्या शतकांतला अद्भुत चमत्कार —जगांतलं पहिलं वहिलं 'पाकिस्तान !' त्याच्या जन्मानंतरच्या त्या चौफेर झालेल्या अमानुष कत्तली;....त्यांची जलालच्या ओळखीच्या इथल्या नि मुंबईतल्या-हिंदु नि मुसलमान—कित्येकांना लागलेली प्राणघातक झळ;....त्यानें तर त्याचं मन फार व्याकुळलं होतं; आंतल्या आंत त्याला कुरतडूं लागलं होतं....

इथल्या...मागें उरलेल्या मुसलमानांची त्यावेळची तीं टाळाटाळीची भाषणं नि वागणूक वर वर संधिसाधु टोप्या फिरवत, अंतस्थपणें चाललेल्य त्यांच्या त्या हिंदु-द्वेषमूलक नि पाकिस्तान धार्जिण्या कारवाया; त्यांच्यांत राहून, तें सारं अगदीं जवळून पाहून, जलालला दिवसें दिवस अधिक किळस येत गेली होती !

राजकारण त्याला तसं फारसं समजत नव्हतं. पण नेहमीं त्यांच्यांतच वाव रून त्याला एक मात्र दिसूं लागलं होतं...साहेब लोकांमागें, इस्लामी पाकि स्तानाबरोबरच जन्मून सुरूं झालेल्या इथल्या नव्या निधर्मी राष्ट्राला नि राज वटीला, आंतून भयानक सुरुंग लावून, तें अधिकाधिक नबळं कसं करायच याच्याच इथल्या श्रीमान नि सामान्य मुसलमानांच्या अहोरात्र चाललेल्य त्या साऱ्या छुप्या लटपटी-खटपटी होत्या. त्या त्याला त्यांच्यांत राहून जव ळून दिसत; त्यांचा त्याला मनस्वी संताप नि तिटकारा येई. पण मग, जलाल बिचारा एक सामान्य माणूसच होता; कालगति त्याला फरफटत पुढें ने होती, इतकंच !!

मनाचा असला हा चमत्कारिक कोंडमारा;.... नि पुन्हां घरचे कस खाजगी वैयक्तिक पाशहि नाहींत; त्यामुळें, त्यांतूनच, जलालच्या मनाची





सहानुभूति त्या मजूर-शेतकऱ्यांच्या सुख-दुःखांत नि त्यांच्या प्रत्यक्ष लढ्यांत हळूहळू प्रत्यक्षा-प्रत्यक्ष जुळत गेली होती. स्वतःला न कळतच, पूर्वीं एकदां त्यांच्यावरच्या जुलमांना त्यानें प्रत्यक्षा-प्रत्यक्ष हातभार लावला होता; पण त्याच मजूर कामकऱ्यांचा आंता तो पुढारी बनला होता.

काश्मीरबद्दल जलालला मोठा अभिमान; ती त्याच्या बापजाद्यांची मूळ जन्मभूमि; त्या मातीचंच जलालच्या देहांत रक्त- मांस झालेलं ! तिच्यावरच झालेले ते पाकिस्तानी पळपुटे हल्ले; तें निर्लज्ज उद्धट राजकारण ! पुढली त्यांचींच उडवाउडवीचीं बदमाशीचीं निर्लज्ज समर्थनं ! चोरांच्याच त्या उलट्या बोंबा...!

इतर राष्ट्रांचा त्या प्रकरणांतील पक्षपाती चोंबडेपणा नि त्यांनीं मुत्सद्दी लबाडीनें कायमचं टाकून ठेवलेलं काश्मीरचं भिजत घोंगडं ! शांत भारताबरोबर अव्याहत चालूं असलेल्या त्या सरकारचं त्याबाबतचं सारं नागमोडी राजकारण ! 'जीहाद'च्या मवाली धमक्या देऊनहि स्वतःला पाक म्हणविणारे मुसलमान नि शांततेच्या ललकाऱ्या मारीत, त्यांना छुपा पाठिंबा देत देत 'शांततेसाठीं तळमळणारे' गोरे ! तेच तीं सूत्रें हलवीत असलेले पाहून, किमान एक मुसलमान या नात्यानेंहि त्याला भयंकर शिसारी येई.

मग त्यानंतर, अखेर, एका हिंदूनेंच गांधींच्या छातीवर भेकडपणें सोडलेली ती गोळी ! आपल्याच छातींत ती आरपार घुसून गेल्यासारखं त्यावेळीं जलालला त्या मनःस्थितींत सारखं वाटून तो अधिकच विद्ध, व्याकुळ झाला होता.

"जग चाललंय् तरी कुठं...नि कसं ? या साऱ्याना हवंय् तरी काय व्हायला ?" असल्या निराश विचारांनीं तो अगदीं सर्व दृष्टीनेंच भग्नहृदय होत गेला होता.

असल्याच साऱ्या पूर्व पार्श्वभूमिवर नि याच त्याच्या कायम मनःस्थितीतहि, पाकिस्तानच्या गुप्त कामागिरीवर त्याला पाठवण्याचा शेठजींचा तो आजचा निर्णय नि राक्षसी आग्रह !

जलाल जाणून होता—"उमरशेठजींना नाहीं म्हणावं, हेंहि जिवावरचंच आहे आतां आपल्या...." तरी त्यानें प्रथम तो प्रयत्न करून पाहिला होता.

जिवाला घाबरणं निराळं नि हकनाक जीव गमावण्यास तयार न होणं, निराळं !—त्यानें तात्काळ हेरून ताडलं, "हा शेठजींचा खाजगी प्रश्न नव्हे; यांत कसलातरी मोठा राजकारणी कट...हेरगिरी, लबाडी, नक्की आहे ! तेव्हां हातांत मिळत असलेल्या सर्व मुद्देमाल वस्तूंसह प्रथम शेठजींच्या धरून तरी सकाळीं ठरल्याप्रमाणें शिरसलामत निघायचंच ! पुढचं पुढं..."

अशा तऱ्हेनें विचार करीत, जागा असूनहि, अखेर, जणूं शेठजींच्या हाकांनींच जलाल पहाटें उठला.

ठरल्याप्रमाणें तें जॅकेट चढवून, त्यावर त्यानें शेठजींचा लांब कोट घातला. त्यांनीं रात्रभर लिहून तयार केलेलें नवं सीलबंद पाकीट खिशांत घातलं; हातांत बॅग घेतली नि तो निमूट निघाला. स्वतः शेठजींनींच त्याला पहाटेंच्या गाडींत फर्स्टक्लासमध्यें बसवून दिलं.

गाडी सुटून वेगांत येतांच, त्यानें सुटकेचा एक निश्वास सोडला. क्षणाचाहि विलंब न लावतां, लघुशंकेचं निमित्त काढून एकांत मिळवला... सीलबंद पाकीट फोडून वाचलं. उर्दूत अनेक भानगडी व माहित्या लिहिल्या होत्या, त्यामध्यें.

पण अखेरचा अधोरेखित मजकूर वाचतां वाचतां तर, त्याच्या डोळ्यापुढें क्षणभर काजवेच चमकून गेले. तिथं लिहिलं होतं——

या नाजुक कामासाठीं नेमलेला आजचा हा जासूद मुस्लिम आहे; पण पाक नाहीं ! तो तसा धोकेबाजच आहे. पण दुसरा सुलभ मार्ग नसल्यामुळें इलाज नव्हता; तेव्हां आपलें हें कार्य उरकलें, कीं मग मात्र सावध ! ! कोणत्याहि सबबीवर याच्यावर विसंबून न राहतां, याची योग्य तीच व्यवस्था करावी. कांहीं झालं तरी, याला कोणत्याहि सबबीवर पुन्हां हिंदुस्थानांत मात्र मोकळं सोडूं नये. नाहीं तर आमचे जीव-वित्त धोक्यांत पडतील ! तरी बचके रहना ! खबरदार !! —"

स्वतःला 'पाक' म्हणवणाऱ्या नि जलालला त्याच्या 'पाक' पणाची आठवण करून देणाऱ्या पाकिस्तानी शेठजींची, ती स्वार्थी दगेबाज बदमाशी ध्यानांत येतांच, त्याच्या पायाची तिडीक मस्तकाला गेली. जाकिटांत नोटा व आणखी कागदपत्रं होतीं. बॅग हिशोबाच्या वह्यांनीं खच्चून भरली होती...



जलालनें तात्काळ निर्णय घेऊन गाडी उभ्या राहण्याच्या पहिल्या स्टेशनाची वाट पाहिली होती. काळोखांतच तिथं तो दुसऱ्या बाजूनें लाईनवर उतरला होता...

*

दोन तीन मैलांवरच्या एका बाजूच्या खोपटांत राहणाऱ्या आपल्या एका म्हाताऱ्या गरीब हिंदु कामगार मित्राकडे तो लगबगीनें पोंचला होता.

तिथं जाकीट-बॅग सुरक्षित ठेवून, तो लागलीच जवळच्या पोलिस स्टेशनावर स्वतःच दाखल झाला होता.

"भारत सरकाराविरुद्ध एक मोठा भयंकर कट चालू आहे. कागदपत्र पुरावा... सारा मुद्देमाल मी पुरवतो. पण आधीं माझी एखाद्या मोठ्या अधिकाऱ्याशीं भेट घडवून आणा..." असं त्यानें पुन्हां पुन्हा सांगितलं; तरी देखील, तेथील अधिकाऱ्यांची ती आळशी बेफिकीरी नि घातकी चालढकल त्याला संतापजनक वाटली. कारण तो प्रत्येक क्षण मोलाचा होता. त्यामुळें चिडून तो एकदां म्हणालाहि "ये सब हिंदू हैं या हैवान ? ...नेकजात अफसर हैं या सोनेवाले हरामी कुत्ते ? ?"

*

इकडे, दुपारपर्यंत अपेक्षित तार मुंबईहून नाहीं असं पाहतांच, शेठजींनीं आपल्या घरच्या दागिन्याच्या चोरीची नि जलाल पहाटे पळून गेल्याची तत्काळ हूल उठवून पोलिसांत फिर्यादहि नोंदवली होती, उलट !—

मग स्थानिक फौजदारांनीं मुंबईस फोन तारा केल्या होत्या. जलाल असलेल्या पोलिस स्टेशनलाहि फोन पोंचून त्यांचा होकारार्थी जबाब आला होता. इथले फौजदार तत्काळ तिथें गेले होते. त्यांनीं जलालचा ताबा घेतला होता.

मग जलाल म्हणत होता त्या शिजणाऱ्या कटाच्या भाषा सगळ्या थापा ठरल्या होत्या.

शेठजींच्या चोरीबाबत, पण वरकरणीं जलालच्या कल्पनेपुरतं 'सुरक्षिततेसाठींच' फौजदारांनीं त्याला तें तसं ताब्यांत घेतलं होतं. कारण, अजून सर्व मुद्देमाल जलालनें गुप्त ठिकाणीं ठेवला होता. तो हातीं यायचा होता—

प्रथम दोन दिवस जलाल मुग्धच राहिला होता. पण सरकारला मदत करणाऱ्याच्या बाबतींतहि पोलिसांकडूनच असली दगेबाज ओलीसुकी होईल अशी अंधुकहि कल्पना त्याच्या मनाला शिवली नव्हती. तेव्हां अखेर, मुद्देमालासह गुप्त जागीं जाण्याचं ठरलं होतं. शेठजींच्या हस्तकापासून सावध राहण्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीनें एक तपशीलवार बेतहि ठरला होता त्याचा.—

पण मग, – आधीं ठरल्याप्रमाणें, सकाळीं प्रत्यक्ष कामगिरी पार पडतांना, एक एक चमत्कारच घडत गेले होते.....कारण, जलालनें एकटंच जाऊन साऱ्या वस्तू त्या गुप्त ठिकाणाहून परत आणायच्या होत्या. पण तो परत येत असतांना त्याच्यावर अनोळखी मवाल्यांची एक अचानक धाड पडली होती. त्यांत जलाल भयंकर जखमी होऊन हॉस्पिटलमध्यें पोंचता झाला होता.

फौजदार ठरल्याप्रमाणें मागोमाग येण्याऐवजीं ठिकाणावर जरा उशीरा पोंचले होते...पोलिस संरक्षण मिळूं शकलं नव्हतं.

आणि मग झालेल्या पंचनाम्यांत तर बॅगमध्यें शेठजींच्या घरचे हजारों रुपयांचे चोरीला गेलेले दागिने व रोकड पैसे तेवढेच सांपडले होते. जलालची आधींची कटाची फिर्याद नि त्यानं दिलेलं आव्हान हां हां म्हणतां हवेंत विरलं होतं.

"ती एक त्याच्या क्षणिक वेडाची लहर !" असंच कोर्टांत ठरलं होतं. जलाल निमकहराम दरोडेखोर ठरला होता.

कारण, दागिन्यांचा मुद्देमाल तेवढाच पुढें आला होता. "त्या चोरीच्या भागिदारांनींच आपल्या वाटणीसाठीं केलेल्या हल्ल्यामधें जलाल जखमी झाला. वेळींच फौजदार ठिकाणावर आले म्हणून तो उलट जिवंत तरी सुटला !" असल्या अनुमानांचा न्यायाधीशांनीं कयास बांधला होता.

तेव्हां अखेर, इतर कटवाल्यांना पाठीशीं घालण्यासाठींच केवळ मुग्ध राहणारा एक सामान्य, दागिने चोर दरोडेखोर म्हणूनच त्या नात्यानें, जलाल तुरुंगात खडी फोडायला पाठवला गेला होता.

*



तुरुंगांत पडल्या पडल्या तर जलालच्या मनाला रोज सहस्र इंगळ्या डसायच्या. उमरखानाची सारी बदमाशी तर अध्यायाअध्यायानें साग्रसंगीत त्याच्या समोर होती.—

पण मग, एका हिंदु फौजदाराचीसुद्धां, केवळ हजारों रुपयांच्या आमिषासाठीं,...एका व्यक्तीविरुद्ध, जिवंत न्यायाविरुद्ध, आपल्या नव्यानें झालेल्या स्वतंत्र देशाविरुद्ध...झालेली ती काळीकाभिन्न अमानुष दगलबाजी ! ती नुसती कल्पनाच असह्य होऊन त्याला आतिशय बेचैन करीत होती.

—एकटं पडल्या पडल्या, जलालला कित्येकदां रडूंहि कोसळायचं;.... दिवसें दिवस, साऱ्या धर्मांचा, साऱ्या मानवी व्यवहारांचाच त्याला भयंकर तिटकारा येऊं लागला होता. जों जों तो अधिक विचार करीं, तों तों तो अधिकच हतबल, अगतिक, निराश होत गेला होता–"आपण एकटे काय करूं शकणार !...काय बदलूं शकणार ! !"

तरी तुरुंगांतून सुटतांच, पहिले दोन तीन दिवस तो गुपचूप दबा धरून बसला. अखेर विचार कर कर करून त्यानं ठरवलं...."नाहीं ! यापुढं हे सारे आपल्याला बाहेर जगूं तर देणार नाहींतच ! मग निदान, काय वाटेल तें झालं तरी, पुन्हां तुरुंगांत पडण्यापूर्वीं, या सर्वांच्या सर्व पापांना वाचा फोडण्याचा आपण अखेरचा जोरकस प्रयत्न तरी कां करूं नये ?"

हो, त्याच प्रखर विचारानें, अटळ कृतनिश्चयानें, तो पाळत ठेवून स्टेशनवर आज उभा राहिला होता. नि त्यापुढलं तें सारं तिथं करायची त्याला प्रेरणा झाली होती.

*

असल्या त्या गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीमुळेंच जलालच्या अंगांत आज असामान्य जोष व डोळ्यांत जळती चमक प्रकट झाली होती.

जलाल एकटा झुंजत होता. पण ती त्याची एकट्याची झुंज नव्हती. शेठजींचं तोंड फोडण्यापेक्षा त्याला आज साऱ्याच सामाजिक अन्यायाला तोंड फोडायची खुमखुमी वाटत होती.

आज जलाल त्या क्षणीं तिथें एकटा दिसत होता खरा; पण त्याच्या दुबळ्या शरीरांत समाजाचं कोंडलेलं, गाडलेलं भूत नि उसळणारं भविष्यच संचरलं होतं !.... त्याच्या त्या तीव्र जळजळीत भावना, त्याचे त्या क्षणचे

ते प्रकट अप्रकट ज्वलंत विचार ते कांही त्याचे एकट्याचे नव्हते. त्याच्या एकट्याच्या त्या इवल्याशा मनाला साऱ्या समष्टीचं रसरशीत विशाल जीवन-तत्त्व निमिषार्धात व्यापूं लागलं होतं.

होय–तें चिमुकलें धडधडतं हृदय, सारी सृष्टि आंत व्यापेल इतकं विशाल झालं होतं. आणि आपल्यापरीनें अखेरचा आकांतपूर्ण प्रयत्न करीत... अखिल मानवसमाजाच्या भवितव्याचं विराट कार्य साधूं पहात होतं!... वरवर पाहाणाऱ्याला जलालची ती एकट्याचीच झुंज होती. पण त्यामागें भावी पिढ्यान् पिढ्यांचा खराखुरा रसरसता जोर होता; म्हणूनच, बघतां बघतां, तिला अखिल मानवतेचें प्रातिनिधिक विराट स्वरूप लाभलं होतं.

मानवानें केलेल्या पण माणुसकी नि सत्त्व सोडलेल्या निर्जीव कायद्याच्या कृत्रिम चौकटींत जलाल त्या क्षणीं एक अपराधी, भयंकर गुन्हेगार म्हणून बसवला जात होता खरा; पण पण उमरखानशीं तसें झगडतांना तो त्याचा इस्लाम धर्म साफ विसरला होता; आपला सेवाधर्म विसरला होता. त्या फौजदाराशीं झगडतांना त्याच्यासमोर कोणी हिंदु नव्हता; त्यावेळीं तो स्वतः इस्लामी नव्हता. त्या क्षणीं, जलाल हा केवळ खराखुरा, पुरापुरा, स्वतंत्र, जिवंत, दिलसाफ माणूस होता! त्यावेळचा त्याचा धर्म एकच होता-केवळ मानवधर्म!

हो, त्या व्यापक विराट विश्वव्यापी धर्माविरुद्ध जे जे अमानुष गुन्हे करीत आले होते, करीत होते, त्यांच्याविरुद्ध–लौकिक गुन्हेगारीचा शिक्का मारलेल्या एकट्या जलालची ती प्राणपणाची प्रचंड झटापट होती! समाजातर्फे ती त्याची एकट्याची झुंज होती! भोंवतालच्या अन्यायी–न्यायीपणाच्या बेगडी आवरणावर त्यानें मारलेली ती एकाकी वज्रमूठ होती. मानवाच्या हृदयाच्या गाभ्यातलें तें एक विराट आव्हान होतें! त्यांत चराचर व्यापणारा ईश्वर असा होता.

*

हीच सारी जाणीव जलालच्या मनाला आंतल्या आंत निःशब्दपणें प्रतीत होत होती!–

म्हणूनच कीं काय, चालतां चालतां भावनावेगानें व त्वेषानें ओरडून तो म्हणाला, "जुलम्यांच्या राज्याचा नायनाट होईल! बदमाष...निमकहराम ....नापाक....बेमान...तेवढे तेवढे सारे झान्नममध्यें जातील! हीच मार्श तमन्ना! हेच माझे मनचे शब्द!! ते केव्हां तरी खरे झालेच पाहिजेत. भाईऽ ओ! मैं हूं एक पाक मुसलमान! लेकिन् नहीं हमारा पाकिस्तान! हां हां, नहीं हमारा पाकिस्तान...या तो नहीं हमारा हिंदुस्थान! अरे भाई हम तो दुनियाका इन्सान, दूंगा इन्सानी को मान!! दूंगा इन्सानी को मान!!–"

बऱ्याच वेळच्या शांततेनंतरच्या, जलालच्या त्या अकस्मात आवेगपूर्ण ललकाऱ्यांनीं, कित्येकांच्या अंगावर, चालतां चालतां एकदम शहारे फुलले; आणि त्यांनाहि नकळत, त्यांच्या ओठांवर, तेच जलालचे शब्द फुरफुरून, एकदम प्रतिध्वनित झाले–" हां हां–दूंगा इन्सानी को मान! नहीं हमारा पाकिस्तान...नहीं हमारा हिंदुस्थान! हम तो दुनियाका इन्सान–दूंगा इन्सानीको मान!!–"

आणि जलाल मूठ वर करून त्यांना फिराफिरून साथ देत होता.– " हरगिज, दूंगा इन्सानीको मान!"

जलालच्या बांधलेल्या मुसक्या धरलेल्या पोलिसांना तो शिस्तभंग अगदीं असह्य झाला. त्यांनीं त्याला शुद्धीवर आणण्यासाठीं एकदोनदां हिसकलं. "चूप!" असं ते एकदम खेंकसले. जमादारानेंहि चालतां चालतां, जलालला एक धक्का दिला.

पण तो जलालला मिळालेला जमादाराचा धक्का म्हणजे दारूच्या पोत्यांत पडलेली भयंकर ठिणगीच होती!–भोंवतालच्या साऱ्यांच्या त्या क्षणाच्या रसरसत्या तीव्र भावनांचा तो एक उघड उघड उद्धट अपमान होता!–

*

शेजारींच चालत असलेल्या नौश्याच्या पायाची तिडिक त्यामुळेंच एकदम मस्तकाला गेली, त्यानें जशास तसें पद्धतीनें जमादाराला एक जोराचा उलटा धक्का दिला.

चवताळून जमादारानें नौश्याला एक ठोसा लगावला; तत्काळ नौश्यानें व आणखी दोघां तिघांनीं उलटे फिरून जमादारावर तीनचार ठोसे चढवले–नि बघतां बघतां, तिथें मारामारी सुरुं झाली.

तें पाहतांच, हत्यारबंद पोलिसांनीं आपल्या बंदुका सरसावल्या.

तेवढ्यांत, दूरून कुठून तरी, पोलिसांच्या अंगावर दहाबारा दगड येऊन पडले. तत्काळ त्यांनीं एकामागून एक हवेंत तीनचार बार सोडले. पण त्या गडबडींत जलालच्या जखडलेल्या हातांतल्या मुसक्या सैल पडल्या.

मग हिसकाहिसकी, पळापळ, पांगापांग, धक्काधक्की, मारामारी! दगडांचा वर्षाव अधिकच वाढला...आणि त्या साऱ्या गोंधळांत, जलालच्या मुसक्या साफच सुट्या पडून रस्त्यावर लोळूं लागल्या होत्या.

*

वास्तविक जलाल मोकळा झाला होता; तरी पण तो पळत नव्हता.

उलट, जमादार मात्र डोक्यावर होणाऱ्या दगडांच्या वर्षावापासून स्वतःला बचावण्यासाठीं दूर पळत होता. तसं पळतां पळतां, खडीच्या एका ढिगाऱ्यावर तो अडखळून पडला. त्याच्यावर कोणी आणखी दगडांचा वर्षाव करीतच होतं. चेहऱ्यावर एकदोन जखमा होऊन त्यांतून रक्त ओघळत होतं.

जलालनें तें पाहिलं मात्र...वेगानें धांवतच जाऊन तो त्याच ढिगाऱ्यावर उभा राहिला.

जमादार तिथेंच खालीं पडला होता व त्याच्या रोखानें आलेले एक दोन दगड जलालच्याहि डोक्यावर आदळले होते.—

रक्त घळघळत होतं — तरी एक हात वर उंचावून, आवाज चढवून, जलाल संथपणें म्हणत होता—" देखिये...देखिये...भाईओ ऽ! ये क्या?...ये क्या?...क्या कर रहें हैं आप? नहीं... नहीं!... मैं साफ साफ कहता हूं. ये तो इन्सानी नहीं! ख्याल करो. शांत रहो! और फिर जोरसे पुकारो. बोलो, नहीं हमारा पाकिस्तान...नहीं हमारा हिंदुस्तान! हम तो दुनियाका इन्सान—दूंगा इन्सानीको मान! हरगिज इन्सानीको मान!!"

*

तरी पण एकदां तशा सुरू झालेल्या त्या गोंधळांत आतां कोणी कोणाचं ऐकायलाच तयार नव्हतं. धमाल तशीच पुढं चालू होती. — ज्याला जें वाटेल तें तो करीत होता, सारेच त्या क्षणीं आपापल्या परीनें आपापले पुढारी होते.



तथापि, जलाल मात्र, जागचा तसूभरहि न हालतां, अधून मधून, आपल्या कपाळाचं रक्त कोटाच्या बाहीनें पुसत, फिरफिरून ओरडत होता— " हरगिज, दूंगा इन्सानीको मान..."

*

बातमी वाऱ्यावरून गेली होती. हत्यारबंद पोलिसांची नवी तुकडी तिकडे येत होती. समोरचा सारा गोंधळ पाहून....आपल्या बंदुका सरसावीत ते धांवतच अंतर काटीत होते.

त्याचवेळीं, मोटार सायकलचा धडधडाट वेगानें जवळ धांवत येतांना ऐकूं आला. स्वतः फौजदारच परतून ठिकाणावर उतरत होते. तो जलालचा कांटा त्यांच्या हृदयांत केव्हां पासूनचा सलत होता!

समोरचा तो प्रक्षुब्ध जमाव — सुटा सुटलेला ' बदमाश ' जलाल — मधल्या खडीच्या ढिगाऱ्यावर जखमी होऊन पडलेला तो हिंदु जमादार — त्याच्याच जवळ उंच उभा राहून, हात वर करून, मोठमोठ्यानें जमावाला उद्देशून, अजूनहि तसंच ओरडणारा जलाल — ते संतापाने जळफळले.

तेवढ्यांत, जलालच्या ललकारींतले अर्धवट बाहेर पडलेले शब्द, फौजदारांच्या कानावर पडले— " नहीं हमारा हिंदुस्थान "... त्यांचं हिंदुत्व जागं झालं!

दुसऱ्याच क्षणीं, कमरेचा सुसज्ज रिव्हॉल्व्हर त्यांनीं सपकन् उपसला होता, एक बार हवेंत नि एक बार...

जलालचे पुढले शब्द तसेच तोंडात घुटमळले. त्या बेशुद्ध हिंदु जमादाराशेजारींच, तोहि धाडदिशीं कोसळून पडला—

जीव घेऊन सारा जमाव वाट फुटेल तिकडे धांवत सुटला होता. बघतां बघतां, चौफेर शुकशुकाट—स्मशान शांतता पसरली होती. जनतेचं संरक्षण साधलं गेलं होतं.

आणि खालीं कोसळून, भोंवतालच्या त्या अकस्मात झालेल्या शांततेंत, हळूंहळूं विलीन होत जात असलेल्या जलालउद्दिनच्या पाक छातींतून, गरम गरम रक्त व ओठांतून त्याच्या त्या चौफेर निनादणाऱ्या ललकारींतले उरलेले

पुढले शब्द ओघळून ठिबकत होते–“ भाईऽओ हम् तो...दुनियाका... इन्सान !...हरगीज, दूंगा इन्सानीको ... मान !... हरगिज इन्सानी इ...न्सा...नी...”

*

दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांतून त्या गडबडीची व जलालच्या मृत्यूची बातमी आली होती. मात्र, देशभक्त उमर शेठजींची बेइज्जत करणारा, धमाल उडवणारा, हिंदु जमादाराला जखमी करून, पाकिस्तानी ललकाऱ्या मारणारा जात्यंध बदमाश असा त्याचा उल्लेख होता.

 

# हपूसचा आंबा

पहिल्याच तान्ह्या छोकरीला नि तिच्या आईला बरोबर घेऊन, त्या दिवशीं, कित्येक वर्षांनी, आमच्या कांकूकडे गेलों होतों मी.

“ तूं पण अगदीं जित् असाच दिसायचास, बरं ऽ ! पितृमुखी भाग्यवान् आहे पोर ! ” असल्या म्हाताऱ्यांच्या ठरलेल्या उद्‌गारांसह, त्यांनीं माझ्या छोकरी बरोबर माझंहि किती तरी कौतुक केलं.

आम्हीं गप्पा चालवल्या असतांना, कांकूंनीं एकीकडे तिला हळुवार हातानें थोपटून झोपवलं; आपल्या ट्रंकेतली जुन्या ठेवणींतली नवी गोधडी काढायला लावली; तिच्या चौघडीवर खोलीच्या एका कोपऱ्यांत पोरीला झोंपवलं नि आपल्या इरकली लुगड्याची घडी करून तिच्यावर घालत, काकू वात्सल्यपूर्ण शब्दांत पुटपुटल्या– “हुं...हुं...हुं...कशी पटकन् हळूंच बघतां बघतां, झोंपली बघ ग ऽ लबाडी ऽ गुणाची आहे हो ऽ माझी पोर....”

माझा संथ चहा–फराळ चालला होता. नि भिंतीला टेकून लांब ऐस पैस मांडी सोडून-कांकूच्याहि एकेका विषयावरून निघणाऱ्या सांचलेल्या विविध विषयांच्या हें अघळपघळ गप्पा चालल्या होत्या.

*

इतक्यांत जिन्या खालून एक बायकी ललकारी कानावर आली— “ आहेत का ऽ हो ऽ काकूं घरांऽत...?”

त्या ललकारीसरशीच, कां कोण जाणें, काकू केवढ्यानें तरी दचकल्या !

" कोण हो ऽ काकू ? " असं मी खातां खातां विचारत आहे, तिकडे साफच दुर्लक्ष करून, काकू निमिषार्धांत पटकन् जागच्या उठल्या, कोंपऱ्याकडे वळल्या.

नि त्यांनी माझ्या स्वस्थ झोंपलेल्या छोकरीची, अंगाखालच्या गोधडींतच, लगबगा लगबगीनें, जणूं मोटलीच बांधून आपलीं म्हातारीं पावलें शक्य तितक्या त्वरेनें टाकलीं; नि त्या आंतल्या सामानाच्या अंधेऱ्या खोलींत शिरल्या.

गेल्या पावलांनींच त्या बाहेर आल्या, आपल्यामागें त्यांनीं त्या खोलीचं दार ओढून घेतलं.

अखेर–जसं कांहीं मधें कांहींच झालं नाहीं अशा प्रकारें जमिनीवर थपकल मारून काकू पाय पसरून बसल्या; नि आतां जवळून आलेल्या दुसऱ्या लल-कारीला त्या मोठ्यानें ओरडून उत्तरल्या–"होऽ होऽ – या होऽ या वर ! ऐकलंच नाहीं बघा बोलण्याच्या नादांत–अहो, आमचा पुतण्या नि सूनबाई आली आहेत ना ? बसलों आहोंत बोलत–" काकूंची ती लटपट.. तें नाटक.. तें धादांत खोटं बोलणं !..

मी तर विस्मित चेहऱ्यानें टकमका पहातच्च राहिलों त्यांच्याकडे.

क्षणकाल माझ्याकडे पाहून भांबावणें नि क्षणिक स्मितरेषा यांचा त्यांच्या वृद्ध चेहऱ्यावर निमिषमात्र नाच होऊन गेला; मिलाफ झाला.

तेवढ्यांतच मघां खालून पुकार करणाऱ्या त्या मध्यम वयाच्या बाईच, प्रत्यक्ष त्यांच्याकडे बसायला म्हणून समोर समक्ष प्रविष्ट झाल्या होत्या.

अर्थात् तिथून मी गपचुप उठलों नि आपला बाहेर गेलों.

" नातहि आलीय् ना हो तुमची ? आहे कुठं ती चिमुरडी ?–"काकूंच्या शेजारीं बसून, चौफेर दृष्टि फिरवून पाहुण्या म्हणाल्या–" बघूं तरी ! मोठी गोड गोड पोर आहे अगदीं म्हणे ती ! होऽ नाऽ ? "

" कसली हो गोड ? डोक्याचा हा मला मोठा कोबीचा कांदा ! फेफटं नकटं नाक;.. किलकिले कोंजे डोळे;.. बाळसं ऽ सुद्धां नाहीं घेतलंन् मेलीनं अजून, नीट ! अहो ऽ जशा हल्लींच्या या आया शिकलेल्लीं पाप्याचीं पितरं.. तशाच त्यांच्या पोरी ! दुसरं काय ? आल्यापासून आपली रडतेय सारखी; अगदीं घर घेतलंन् बघा डोक्यावर !... तेव्हा मग साबाजीलं



आमच्या गड्याला म्हटलं, " जाऽ बाबा जरा वाऱ्यावर फिरवून तरी गप रहात असेल तर पाहा.. " आतल्या खोलींतून काकूंच्या तोंडाचा तसला पट्टा सारखा अस्खलित ऐकूं येत होता मला बाहेर. नि आंतल्या आंत हसूंहि येत होतं, बसल्या जागीं.–

क्षणभरच्च माझ्या मनांत तरळून गेलं–" जर कां याच वेळीं त्या आंतल्या अंधाऱ्या खोलींतून, त्या पोरटीच्या ' कोबीच्या कांद्या 'नें हुंकार देऊन जणूं म्हटलं–' हें हो काय असं, आजीऽ ?....इथंच निमूट झोंपलेय कीं मी...' तर ?...."

तर...काकूंच्या घरीं पानपतच्च व्हायचं बायकाबायकांचं...

—–पण नशीब ! तसं कांहीं घडलं नाहीं...

कांहीं वेळानें त्या आलेल्या पाहुण्याहि निघून गेल्या.

*

त्या साऱ्या प्रकरणाचा रात्रीं जेवतांना मला खरा उलगडा झाला.

मी त्यावर खो खो हसलों; कांहीं कुत्सित बोललों, म्हणून मग काकू मला रागारागानें म्हणाल्या " नकाऽ रे सांगूं, तुम्ही शिकलेल्लीं हल्लींचीं धर्म-भ्रष्ट पोरं !– आमच्या कश्श्यावर म्हणून तुमचा विश्वासच नसायचा ! नसेना मेला ऽ !....पण, हें काय ?– म्हणे, खोटीं नाटकं केलीं !...कांऽ रे, करूं नको नाटकं ? नि कां बोलूं नको खोटं ? माझी नात मला काय वर नव्हती आली ! समजलास ? "

" अहो पण, काकू ऽ ..." जेवतां जेवतां, मी हळुच पुटपुटलों !...

" चूप ! बोलूं नकोस कांहीं ! आली होती त्या बयेची नुसती दृष्टि पडली असती तिच्यावर तरी कोणता मेला हाः हाःकार उडाला असता, कोण जाणें ! अरे–, निपुत्रिका ती ! आळीतल्या साऱ्या पोराबाळांच्या आयांना याचा आहे बरं चांगला अनुभव ! ! " काकू माझ्यावर मोठ्यानें कडाडल्या–" पण, मी म्हणत्यें तुम्हाला करायचंय् काय असल्या गोष्टींशीं ? हो हो ! आम्ही खोट्या ! आमचं खोट्याचं पाप जर कसल असलं तर तें आमच्या कपाळीं !–गप्प बसा तुम्ही आपले ! नाहीं ना तुमचा विश्वास ? नसूं दे....द्या सोडून !..."

" पण ती मोटली गुठली बांधली होती तुम्ही..."



जि. ह्म.५....

" हो हो, हो हो तर ! पोरीची गोंधडींत मोटली केली म्हणून याचा पोर अगदीं घुसमटलीच जशी काय ! आलारे मोठ्ठा ऽ काळजीचा ! पण शिकलेल्या गाढवा ऽ, मांजरीचे दांत तिच्या पिलांना नाहीं बरं कधीं बाधत, ...बाबा ऽ !"

सुशिक्षित असल्या तरी आज्ञाधारक सुनबाई काकूंच्याच जातीच्या नि बाजूच्या ! अर्थात् मी आपला अखेर गप्पच झालों. तें प्रकरण तिथंच माझ्यापुरतं मी निकालांत काढलं.

योगायोग मात्र असा कीं, तसल्या तद्भुत अनुभवाची चुणुक केवळ दोन अडीच वर्षांनींच मलाच प्रत्यक्ष यायची होती ! मोठंच चमत्कारिक तें सारं...

आतां आमची पोर चांगली उंच नि भरीव अंगाची झाली होती.

मानेवर सोडलेले पिंगे कुरळे केस, कपाळाला कुंकवाची बारीक टिकली, डोळ्यांतलं काजळ, कानांतले डूल, अंगांतला तांबड्या पांढऱ्या पट्ट्यांचा तंग गंजिफ्राक, पायांत रबरी बंदांची चड्डी, नि त्या खालीं घोट्यापाशीं छुमछुम वाजणारे वाळे...

तशा थाटांत ती दुडुदुडुं लागली, कीं, कोणाच्याही हृदयाला अगदीं वात्सल्याचं भरतंच यावं. कारण, त्याबरोबरच्याच स्पष्टोच्चारांतील तिच्या चौकस पृच्छा नि मोठ्या माणसांसारखं—एकांत एक गुंतवलेले हात पाठी-मागें ढुंगणावर ठेवून—अगदीं आपल्याच तोऱ्यातलं ठसक्यांत बोलणं-चालणं--वावरणं ! कोणालाहि तें मोहवण्यासारखंच असायचं ! वयाच्या मानानें तिची वाढ मोठाड नि वागणं थोराडच होतं...

त्या दिवशीं तर ती डोक्यावरून न्हाली होती. ते उन्हाळ्याचे दिवस ! नुसतीच चड्डी चढवून, अगदीं उघडी तंबच ती घरांत इकडे तिकडे दुडदुडत खुळखुळत होती.

कपाळाला एखाद्या मोठ्या मुलीसारखी कुंकवाची मोठी वाटोळी टिकली नि त्या खालीं काजळाचं बारीक टिंब;...तेल न लावल्यामुळें नुसतीच मागें फणी फिरवलेले भुरभुरणारे केस; कानांत लुडबुडणारे लांब लांब तांबडे डूल...

सकाळपासून तर तिच्या त्या साऱ्या मस्तीला अगदीं ऊतच आला होता, साऱ्या जगांतलं चैतन्य तिच्या अंगांत संचारलं होतं ! दुपारची दुसरी उन्हाळी अंघोळ करतांकरतां बाहेरचा दरवाजा वाजल्याचा, उघडल्याचा नि



तिची गडबड एकदम थांबल्याचा असा संमिश्र आवाज माझ्या कानीं पडला.

स्नान संपवून, क्षणभरानें टॉवेल गुंडाळत, मी बाहेर येतों, तों माझे स्नेही खुर्चीवर बसलेले नि त्यांच्या समोर, पाठीवर हात घेऊन, संथपणें, मोठ्या माणसाचा आव आणून, ती बोलण्यांत गढलेली.

" काय चाललंय् ? अं ? " धोतर नेसत, कपडे चढवीत एकदां बाहेर डोकावून मी पुकारलं; अर्थात्, मुख्यतः, तिलाच उद्देशून होतं तें...

" खमंग आहे, बरं का तुमची पोर—" माझे स्नेहीच हसत हसत मला स्पष्टीकरण करते झाले.

" अहो ऽ, आल्याबरोबर बसायला खुर्ची, वाऱ्याला पंखा, वाचायला मासिक, घरीं न्यायला तुमचं पुस्तक, बोलायला स्वतः,...माझी अगदीं सारी अगत्यपूर्ण व्यवस्था केलीन् हिनें तुमच्या गैरहजेरींत—"

तेवढ्यांत, तिच्या आईनें दोन चहाचे कप पुढें आणले.

" अरे ऽ वा हेंच आतां सांगणार होतों तुला मी. " हसत म्हणालों.

" पण, हें आहे ना घरातलं सर्वांत मोठं माणूस ! तिथूनच हुकूम सुटला, तुमच्या आधींच. " आई कौतुकली.

पण, त्याच वेळीं, आईच्या हातांतला एक कप घेऊन, ' काकां ' पुढें, करण्यासाठीं, जेव्हां दोन चिमुकले हातहि लुडबुड करूं लागले, तेव्हां, क्षणापूर्वी कौतुक करणाऱ्या तिच्या मातोश्री तिच्यावर ओरडल्या—

" अग्ग ऽ अग्ग ऽ ! थांब् म्हणते ना ?....थांब्—मोठी ऽ आली ऽ "

" सांडलं अंगावर तर भाजेल ना ? म्हणून म्हणाल्या हो ऽ त्या ऽ !" —तिचा क्षणकाळ हिरमुसला चेहरा पालटण्यासाठीं, कप हातीं घेतां घेतां आमच्या मित्रवर्यांनीं तिची समजूत काढली.

मग आमच्या गप्पा,...तिचं रिकामे कप आंत नेऊन ठेवणं, सुपारीचा करंडा बाहेर आणणं...

अखेर, तसल्या ' आंत बाहेर ' मधून ती पितळीं भांड्यांच्या तिच्या घरकुल संसारांत नि आम्ही आमच्या गप्पामध्यें, केव्हां दंग झालों, तें कोणाला समजलं सुद्धां नाहीं.

*

बऱ्याच वेळानें-मी कपडे चढवून बाहेर पडणारसं दिसतांच, तिनें मोठ्यानं हांक मारून, मला आंतूनच विचारलं—

"आज मला हपूसचे आंबे आणणार होतां ना तुम्ही ?"

मी हंसत परत आंत गेलों.

दिवसभराच्या त्याच अनादिसिद्ध पोषाखांत बसून कॉटच्या उंच दांडीवर आपले दोन्ही चिमणे पाय टाकल्या टाकल्या, ती मागें पुढें झोंके घेत होती. तिच्या मोकळ्या केसांच्या झिंज्या मानेवर लोंबत होत्या; वाऱ्यावर भुरभुरत होत्या.

खालीं डोकं करून माझ्याकडे आपल्या उलट्या चिमण्या डोळ्यांनीं तसंच रोखून पाहात, ती लडिवाळपणें एका ठेक्यांतच म्हणत होती–" आंबा आंबा! हपूसचा आंबा ! आंबा.... आंबा...."

जायला निघालेल्या माझ्या स्नेह्यांनीं तें बाहेरून ऐकलं नि आंत कुतुहलानें डोकावलं—

तिच्या गौर चेहऱ्यावर तसल्या दंगामस्तीनें गोड रक्तिमा आला होता. भाळींची कुंकवाची टिकली नि निळसर डोळे, प्रकाशांत चमचमत होते. नि पूर्वी सारख्याच खेळकर हालचाली करत, लाडिकपणें ती पुटपुटत होती– "आंबा...आंबा....! हपूसचा आंबा..."

पाहतां पाहतां, माझे मित्र क्षणकाळ चमकल्यासारखे झाले. पण मग, ते एकदम मनमुराद, मोठमोठ्यानें हसलेहि...

चटकन् पुढें होऊन, तिच्या गालाला हात लावीत, ते चिमटींत धरून कुरकरीत, ते सस्मित म्हणाले "अग पण हो ऽ ! तुला कशाला हवा आंबा ? स्वतः तूंच आहेस कीं एक हपूसचा आंबा !"

त्यावर प्रथम आम्ही तिघं नि त्यांच्या पाठोपाठ ती उनाड पोरहि मोठमोठ्यानें हसली नि लडिवाळ माना वेळवीत म्हणाली--" आंबा ऽ आंबा ऽ ! मी हपूसचा आंबा—"

आम्ही दोघे "बरं ...बरं..." म्हणत दारांतून बाहेर पडलों.

*

मग; ट्राम--बस--गाडी--टॅक्सी...तीन चार तास...तीनचार ठिकाणीं... सावकाशीनं फिरणं-गप्पाष्टकं करणं...



घरची जरा देखील आठवण नव्हती माझ्या स्वैर मनांत, मधला कांहीं काळ....अखेर बऱ्याच उशीरा घरीं परतलों.

दारांतून आंत शिरलों तों काय आश्चर्य !

घरांत अगदीं सामसूम होतेंच; पण कॉटवर बिछाना–बिछान्यावर–पोर–पट्टी तिच्या डोक्यावर...आई तिच्या शेजारीं–तिच्या चेहऱ्यावर काळजी चिंतेचीं अभ्रं...

ते सारं अनपेक्षित दृश्य पाहतांच, केवढ्यानें दचकलों मी ! चांचरत चाचकतच कॉट जवळ गेलों.

तिचा डोळा लागला होता–मंदश्वासोच्छ्वासानें अंगावरची चादर संथपणें वरखालीं होत होती—

"म्हणजे ? हें काय ?" अखेर तिच्या आ[illegible] मी डोळ्यांनीच विचारलं.

"काय की बाई ! उन्हाळा ना ? " ती चिंताक्रांत चेहऱ्यानें हळूच पुटपुटली– त्यांत पुन्हां आज न्हालीय् डोक्यावरनं ! दिवसभर, नको नको म्हटलं तरी नुस्ता धांगडधिंगा चालला होता सारखा ! तिन्हीसांजेला भरलाय आतां ४–४। आहे–"

ऐकून, माझ्या काळजांत चर्रर झालं....

तसाच उठलों नि आपल्या डॉक्टरांना टॅक्सींत टाकून आणलं–

कडक उन्हाळ्याचा तो परिणाम ठरला; नि गोळ्या, चाटण, डोस, सारं त्यांच्याबरोबर तसंच परत जाऊन, घेऊन आलों.

पण लागोपाठ चार दिवस, निरनिराळीं निदानं चिकित्सा नि औषधी-पर्याय होऊनहि, तिचा ताप कांहीं चाराखालीं उतरेना–

आम्ही दोघांनी, सारखं उशाशीं बसून, निश्वास टाकावेत; अर्धवट ग्लानींत नि अर्धवट शुद्धींत, तिनं कधीं कधीं असंबद्ध बोलावं; आम्ही तें ऐकावं; एकमेकाकडे घाबरल्या नजरेनं पाहावं; नि पुन्हां सचिंत निश्वास टाकावेत–

त्या दिवशीं तिनसांजेला मात्र, काय माझ्या मनांत एकाएकीं आलं कोण जाणें.

मी पटकन् उठलों. चपला पायांत चढवल्या नि दाराची कडी उघडूं लागलों.

माझ्या मागें लागलेल्या प्रश्नार्थक डोळ्यांना मी हळूच उत्तर दिलं—
" हा आलोंच बघ—नाक्यावरून. एकदम एक आठवण झालीय् ."

तिच्या बोलण्याची वाट न पाहतां, तसाच झपझप नाक्यावर पोंचलों.

फळवाल्यांच्या पाट्या दिव्यांच्या लख्ख उजेडांत प्रकाशत होत्या.

जरा चौफेर न्याहाळून अखेर एके ठिकाणीं थांबलों. एका आंब्याच्या टोपलीकडे वळलों.

जरा वरखालीं करून, त्यांतला मोठ्यांत मोठा एक उचलला.

कांहीं न बोलतांच खिशांतून एक रुपयाची नोट काढून, त्याच्यापुढें केली. नि त्यानें परत केलेले दोन आणे नि तो मोठा आंबा खिशांत कोंबून घरीं परतलों.

ती अजूनहि तशीच झांपडून झोंपली होती.

तिच्या शेजारीं उभा राहून, खिशांतला आंबा मी बाहेर काढला. तिच्या आईच्या हातीं दिला नि खुणेनेंच त्या पोरीच्या अंगावरून तो ओवाळायला तिला सांगितलं.

मी काय करत होतों, तें माझं मलाच नीट समजत नव्हतं.

आधीं थोडं चमकून पण मग, त्या मनःस्थितींतहि, किंचित् स्मित करून पत्नीनें तो हातीं घेतला. नि गंभीर मुद्रेनें, आपल्या लेकीच्या अंगावरून तो तीनदां ओवाळून, अगदीं अलगद हातानें तिनें माझ्या हातीं तो परत दिला.

मीहि कांहीं न बोलतांच, पुन्हां तसाच दारांतून बाहेर पडलों—

ट्राम फाट्यावर पोचलों. तिथं अंधुक अंधुक उजेड होता. चालतां चालत मध्येंच थबकून, हातांत तो हपूसचा आंबा धरला.

नि मग मनांत जें येत होतं, तें मनाशींच हळूच म्हणालों, " खरंच मोठा योगायोग आहे !— आजचा हा कसोटीचाच प्रसंग आहे. आमच्या काकूंचा तर फार विश्वास-आमचीहि उत्कट इच्छा !—माझे मित्र प्रेमळ आहेत; सद्हेतु-प्रेरित आहेत ! तरी पण, त्यांचीं आजारीं चिरचिरीं मुलं, दुबळं मानवी मन; नि त्यांतल्या नकळतच्या सुप्त इच्छा—आकांक्षा, असूया—मत्सर ! ज्याच्या त्यालाहि कळत नसतील त्या ! त्या दिवशींचा तो प्रसंग— ती घटना; त्यांचे ते कौतुकाचे भावपूर्ण उद्गार—' हपूसचा आंबा ! ' ती त्यावेळची त्यांची तीव्र आसुसलेली दृष्टि ! हो— कदाचित् त्यांची ती दृष्ट असेल कां ? असेल तर इडापिडा टळो...नि माझ्या बाळेचं नि साऱ्यांचंच चांगलं होवो. "



....असं म्हणून तो हपूसचा आंबा मी ट्रामफाट्यावर टाकला, मागच्या पावलींच गपचूप परतलों.

घरांत शिरलों, तेव्हां माझ्या दाराकडे दोन उत्सुक डोळे लागलेले होते.

आमची दोघांची अबोलपणें दृष्टादृष्ट झाली तेव्हां दोघांच्याहि मनाला हायसं...हलकं वाटत होतं !

अकस्मात् आजारी पडलेल्या पोरीच्या आईच्या, आजीच्या प्रतिनिधीचंच इमानेइतबारें काम केलं होतं मी ! त्यावेळीं मीहि हळवा—दुबळा झालों होतों.

*

पण पुढलं सारं सांगितलं तर कोणाला कपोलकल्पितच वाटेल तें !

अगदीं त्याच रात्रीं, तिला सडकून घाम आला; चार चादरी ओल्या चिंब झाल्या;— सकाळीं पांच दिवसांचा न हटणारा ताप साफ उतरला; दुपारीं ती हुशार झाली— संध्याकाळीं ऐसपैस गप्पा गोष्टीहि करूं लागली. हसतां खेळतां, बोलण्यावरून आमचं बोलणं निघालं असतां; ती खदखदून म्हणाली— " आईऽ आईऽ ! बघ हपूसचा आंबा !... कुठं ग आहे आई हपूसचा आंबा ? आंबा...आंबा !— हपूसचा आंबा !—"

ती पुन्हां तीन्हीसांजेची वेळ होती—चुलीजवळ तिची आई स्वयंपाक करत होती.

तिचे ते उद्गार कानांवर पडतांच, तिनें पटकन् समोरच्या बरणींतून दोनचार मिठाचे दाणे उचलले. लगबगीनें पुढें होऊन, आपल्या पोरीच्या अंगावरून तिनें ते ओवाळले नि तें चुलीत फेंकत ती ओरडलीच—" पुरे गऽ माझे आईऽ तुझा हपूसचा आंबा !—मिळाला तेवढा पुरला नाहीं वाटतं, सटवे ? "

त्यावरूनच, दोन वर्षांपूर्वींची ती आमच्या काकूंची धडपड, तें नाटक नि ती बडबड, सारं कांहीं मला पटकन् आठवलं.

तोंच, शेगडीचं काळं बोटानें काढून, आईनें आपल्या पोरीच्या कपाळावर एक मोठा थोरला फरफाटा ओढला.

त्यावेळीं, ती लाघवी पोर खुदकन् हंसली. अर्थात् तिची आईहि राग विसरून एकदम हंसली.

नि त्या दोघींकडे पाहात, मीहि अभावितपणें हसलों—

पण मग, हसतां हसतां गंभीरहि झालों.

कारण, तो अनुभव प्रत्यक्ष आला होता, तरीहि , माझ्या बुद्धीला तो कांही केल्या पेलतच नव्हता !—

त्यांत गुंग होऊनच, मी मनांतल्या मनांत पुटपुटलों—" हं... हपूसचा आंबा !—हपूसचा आंबा ! ! "

● ● ●



● ●

● ● ●

# जिवंत झरे

माझ्या नोकरीचा तो लांबलचक काळ; तरी त्यामध्ये, तसं अगदीं बहुतेक दरवर्षींच, मी 'नानाच्या पाडा'ला हवा-पालटासाठीं आठपंधरा दिवस तरी जात आलों आहें. आतां पूर्वीपेक्षां तें खूप मोठं झालंय्; तिथली ग्रामपंचायत आतां स्वतःला 'नारायण-वाडा पंचायत' म्हणते. पाटील तिथले सरपंच आहेत हल्लीं.

माझ्या पणजोबांचं नांव नारायणच, पण नुसता केवळ योगायोग, बादरायण संबंधच नव्हे तो ! पाऊणशें ऐंशी वर्षांपूर्वीं तर, त्या जवळजवळ साऱ्याच गांवाचे, आम्ही,—देशपांडेच, मालक होतों.—आज मात्र, तिथं तसं कोणी आमचं रक्ताचं उरलेलं नाहीं, कीं, टिचभर जागाहि नाहीं मालकीची आमच्या....

असल्या जाणीवेनें हृदय कुरतडतं; पण तरी देखील, तिथं माझं मन विरंगुळतंहि. माझ्या मनाची एक न्यारीच आपुलकी त्या परिसराभोंवतीं पिरट्या घालते.

इतक्या वर्षांच्या नोकरींत, माझी सांचलेली महिन्या दीड महिन्यांची प्रत्येक रजा, दरवेळीं, म्हणूनच मी तिथंच घालवीत आलों आहें, हें मात्र खरं,....अगदीं ठरूनच गेलंय् तें माझं !

तसे रेल्वेचे जांवईच आम्ही; हरद्वार-रामेश्वर, काशी—काश्मीर कुठलीहि पी. टी. ऑर्डर मिळते आम्हांला. पण प्रत्येक वेळीं, माझे पाय आपले 'नानाच्या पाडा ' कडेच वळतात.

वास्तविक, आमच्या देशपांडे कुटुंबानें तिथं, म्हणे, पूर्वी सोनं वेचलं; आतां तिथं गोवऱ्या वेचणंहि मला शक्य उरलेलं नाहीं !...पण तरीहि, तिथं जाऊन आल्यावर, प्रत्येक वेळीं माझ्या मनाला एक नवी टवटवीच लाभत आलेली आहे, हें खास !

*

उगीच मनाचे निष्क्रिय खेळ खेळून पूर्वजांच्या गतवैभव-थोरवींत निरर्थ रमणारे किंवा अहंपणाचा कल्पनावारू चौखूर सोडून, समाधान मानणारे-केवळ स्वप्नाळू इनामदार, जगांत असतील; पण निदान, मी तरी त्यांतला नव्हे.

मला 'नारायण वाड्या'ला आजवर अखंडपणें आकर्षित आलेलं जें वैभव आहे, तें मागलं नव्हे. तें आजचं आहे. तें माझं नसलं, तरी प्रत्यक्ष आहे; तें मला अखंड, अव्याहत दिसत आलेलं आहे; आनंदवीत आलेलं आहे.

याचं कारण सांगूं ? 'नानाच्या पाडां'त आमची एक लक्षुम् अक्का आहे ! तिचं तें आजचं खूप गजबजलेलं घर-आवार तिथं आहे. तिची ती विहीर आहे, थंड गोड असं तें तिचं भरपूर पाणी ! तें अगदीं अद्‌भुतच आहे. तें केवळ पहायला, घोटभर प्यायला, समाधानाचा पोटभर ढेंकर द्यायलाच, मी तिथं जात आलों आहे. आजवर, वर्षानुवर्षे, तें तसंच चाललंय् !

*

आम्हां देशपांड्यांच्याच, 'नानाच्या पाडां'त हे पाटील लोक प्रथम आले; ते आले ते आमचे नोकर म्हणून नसले, तरी नानाजींचे आश्रित म्हणूनच.

आमच्या वाड्या–शेती–बागायती–पासचं, पांचसहा एकराचा एक अर्धवट ओसाडीचा सरकारी तुकडा होता; तो बाबा पाटलांना मिळाला; तिथंच एक झोपडं उभारून, ते आमचे शेजारी झाले.

आमचे नानाजी देशपांडे, तेव्हां ऐंशी ब्यायंशीचे; बिछान्याला खिळलेलेच होते. पण त्यांनीं पाटलांच्या त्या नव्या, संगतीचं स्वागतच केलं;...शेजारधर्माचा आस्थापूर्वक प्रतिपाळ करून, पाटलांच्या अडी–नडींना हातभार लावला.

सारी पुंजी जमिनींतच ओतल्यामुळें, त्यांच्या त्या सुरवातीच्या प्रपंचांत, पाटील तर 'पाण्यालाहि महाग' होते. कोणाला कधीं नव्हती, ती प्यायचं पाणी आमच्या विहिरीवरून भरभरून नेण्याची...मुभा, नानाजींनीं, आपल्या आयुष्यांत, एकट्या पाटलांनाच दिली होती, म्हणे.



आमच्या कुंपणाला लागूनच्या दीड एक एकरांत पाटलांनीं आंब्या–चिकूंची लागवड केली. स्वतःच कावड्या भरून, ते पाटील जोडपं, तीं कलमं शिंपी; सारं आमच्याच विहिरीच्या पाण्यानें चाले. पाटलांच्या सोयीसाठीं दोघांमधल्या कुंपणांत, आमच्या नानाजींनीं, त्यावेळीं एक मधोमध फाटकहि पाडून दिला होता.

केवळ सात आठ वर्षांचाच पोर होतों मी, त्यावेळीं; पण त्या जोडप्या बरोबर, पाण्याच्या छोट्या कळशीसह, इकडून तिकडे, मधल्या फाटकांतून, दिवसांतून, सत्रांदा आल्यागेल्याचें आजहि आठवतंय् मला, हुबेहूब ! –

*

मात्र तो खेळीमेळीचा जमाना पुढल्या केवळ दोन–तीन वर्षांतच–नानाजींच्या पश्चात् साफ–पालटला, हेहि मला आठवतंय् !

कां, कोण जाणे ! आमच्या आजोबांनीं, एकदां एक एक मोठी थोरली ओरडाओरड केली नि मग, आम्हां दोघांमधलं तें फाटक, पाटलांना जें त्यांनीं बंद केलं, तें कायमचं !–

पुढले कित्येक महिने, स्वाभिमानी पाटील, घरांत प्यायचं पाणीसुद्धां दोन फर्लांगावरून आणून भरीत. नानाजींच्या तें मुलांपुढें वांकले नाहींत; स्वतः मोडले.

पुढें मग, तीं कुंपणामधल्या फाटकाचीं बिजागरं, केवळ एका पावसाळ्यांतच भरभर गंजत गेलीं होतीं. आडव्या उभ्या मारलेल्या लाकडी फळकटांतले–आमच्या आजोबांनीं चिडून चिडून ठोकलेले–ते मोठाले काळे लोखंडी खिळे ! ते देखील, आपल्या गंजलेल्या तांबड्या 'डोळ्यां'नीं, आतां राग-रागानें आमच्याकडे पाहूं लागले होते.

आम्हीं मुलांना, पलीकडील बाबा पाटलांची पाण्याशिवाय सुकलीं-कोमजलेलीं तीं कलमं पाहून, कसंसंच होई; वाईटहि वाटे. पण–घरांतलीं कर्तीं माणसं निराळीं ! मग आम्हांला विचारतो कोण ?

*

तरी पण, पुढल्या चारदोन महिन्यांतच, कुंपणापलीकडे, एका मागून एक, एकेक अकल्पित घटना घडल्या....

एकाएकीं, एका आठवड्यांत, लागोपाठ 'धुड्ड्धुम्' असे सुरुंगाचे वीस पंचवीस आवाज ऐकूं आले. जमिनीच्या पोटांत एक मोठं थोरलं वर्तुळ शिरलं होतं. पाटलांची नवी विहीर ती तीच !

तिच्यांत मनगटाएवढे दोनतीन जाड कातळ–झरे फुटले नि ती तुडुंब भरली; भरला ती कायमचीच ! घरांत कोणाला नकळत, तिथं जाऊन ती आम्ही पाहिली होती. तिचं गोड गोड पाणी पिऊन आम्हीं आनंदलोंहि होतों.

मग एकदोन महिन्यांतच, कुंपणापलीकडे चौघडा सनई वाजली. फेटा बांधलेले, कधी नाहीं ते, पाटील आमच्याघरीं सपत्नीक आले; आम्हां देशपांड्यांना, न चुकतां, दिलदार आमंत्रण देऊन गेले. पण 'त्या भिकारड्याकडे' आमच्यांतलीं 'मोठीं माणसं' कोणी गेलीं नाहींत. मुलांनाहि जायचा मज्जाव झाला.

मात्र दुसऱ्या दिवशीं, पाटलांच्या मुलाचं लग्न झाल्यावर, केसूकाकाची ती बायको–बारातेराची लक्षुमअक्का– अवघडलेली साडी नेसून, पाटलांच्या घरांत नव्यानेंच शिरतांना–वावरतांना तेवढी आम्ही कौतुकानें पाहिली. आम्हाला दुरून कां होईना गंमत वाटली खूप !

कधीं कधीं, नव्या विहिरीचं पाणी कलमांना घालतांना, लक्षुमअक्का आम्हांला कुंपणापलीकडे दिसे. मग प्रथम तिला 'हुऽऽक' करून घाबरवणं, मग हळूच हंसणं, चार दोन प्रश्नोत्तरं करणं, असा आमचा तिच्याशीं परिचयहि वाढला; मात्र अगदीं गपचूप गपचूप.

*

पाटलांच्या त्या नव्या विहिरीला केवढं मोठं सिमेंटचं वर्तुळाकार 'वकल' बांधलं होतं ! अर्ध्या विहिरीवर लोखंडी 'बांड्यां'ची बलसाडी चक्री; उरल्या तीन बाजूंना तीन हातरहाट उभे केलेले; त्यांना राजू-पोहरे, सांडपाण्या–धुण्याच्या फरशा; असं सारं सुसज्ज ठेवलेलं !

त्यांतला पाटलांच्या घराजवळचा रहाट त्यांनीं खास आपल्यासाठीं राखला होता; तरी पण ते दुसरे दोन, कोणालाहि, कधींहि मोकळे असत. आसपासच्या गोरगरिबांची छानच सोय झाली होती ती !...सकाळ–दुपार–संध्याकाळ, मडकीं–हंडे–घागरी भरून नेणाऱ्या, आसपासच्या झोपड्या–



खोपटांतल्या वारली–कातोडी–दुबळी–कोळ्यांच्या पोरींवाळी–बायांची, तिथं ही ऽऽ रीघ लागे, मोठी थोरली !—

त्यापूर्वीं, आमच्या आसपासहि कधीं दिसत नसे, तो गाडीवानांचा तळ, आतां पाटलांच्या फाटकाशींच, हम रस्त्यावर, रात्रीसाठीं पडलेला दिसे.

सोडलेल्या गाडी–बैलांची ही ऽऽ गर्दी होई. पाण्याच्या आधारावर त्यांच्या 'तीन दगडांच्या चुली' पेटत. ऊनऊन पिठलं–भात खाऊन, ढेकर देत देत, काळोखातच, पडल्या पडल्या हळूच कुजबुजून, ते गप्पा मारीत. पाटलांना, अनायासेंच, त्या गाडीवाल्यांची ती रात्रीची जागती सोबत होई ! त्यांचा आशिर्वादहि मिळेल !

दुपारीं, पाटलांसमोरच्या रस्त्याच्या कडेला, सावलींत, आसपासचीं गुरं रवंथ करीत बसत. एकदां माध्यान्हीं नि एकदां दिवस कासरा दीड कासरा उरला असतांना, पाटलांपैकीं कोणी तरी आवाराचं फाटक सताड उघडून ठेवी. त्यावेळीं, मागल्या कुंडीवर पाणी प्यायला जायची व प्यायची, त्या साऱ्यांची ही ऽऽ झुंबड उडे !

कुंडी अखण्ड तुडुंब भरलेली असावी, म्हणून....नि आपल्या कलमा–भाजीपाल्यालाहि पाणी फिरवायला म्हणून, पाटलांचा दोहोंपैकीं कोणता ना कोणता टोणगा, दिवसभर 'टोपेंड्या'नें बांधलेल्या डोळ्यांनीं, बुबळं लाल होईपर्यंत पाणरहाटाला घिरट्या घालीत राही.

*

कुंपणापलीकडले ते पाटलांकडले सारे बदललेले देखावे पाहून, माझे बालिश डोळे तर अगदीं चकितच होऊन जात.

अशा एखाद्या वेळीं, पाटलांच्या त्या आंबराईत, लक्षुमअक्काच कधीं कसलं काम करीत असतांना दिसली, तर तिच्याबरोबर, लपत लपत, चार इकडच्या तिकडच्या गप्पा उकरून काढल्यावांचून मला तरी चैन पडत नसे, अगदीं ! ('ही पाटलाच्या घरांत आली नि हें सारं आतां असं बदललं' असलं एक भोळं कोष्टक, माझ्या बालमनांत जणू आपोआपच जमून आलं होतं !)

एकदां कधीं, त्यावेळच्या पोरसवदा लक्षुमअक्काला मी म्हटलं, कीं, पाटलांनीं तिच्या लग्नावेळीं व विहिरी–कुंडीसाठीं खूपच खर्च केला.

तेव्हां, त्यावर नेहमींसारखं गोड हंसून अक्का म्हणाली होती–" अरे विसू ऽ–माझे वडील आहेत आपले तसे गरीबच !...पण त्यांनीं माझ्या-बरोबर मामंजीकडे पाठवलेला सारा पैसा ना ऽ...या विहिरींतच टाकलाय् पाटलांनीं !...आतां बघ....आमच्याकडे कुदळ–खोऱ्याशिवाय नि नांगर–कोळप्याशिवाय कांहींच उरलेले नाहीं हातांत ! माझ्या माहेरचं नि सासरचं,... दोघांचंहि...वैभव,...या आमच्या विहिरीच्या पाण्यांतच वितळून गेलंय् ! तेव्हां तें पाणीच आतां पोटभर प्यायचं नि काम करीत राहायचं आपण !! आहे कीं नाहीं गंमत ? तुम्ही काय बाबा ? इनामदार लोक ! "

बायकांना जन्मतःच अधिक अक्कल असते कीं काय, नकळे ! पण त्यावेळच्या तिच्या त्या सहजोद्गारांचा खरा अर्थ,...आतां आज माझ्या म्हातारपणींच मला नीट समजतोय् !...

आहे कीं नाहीं गंमत ? असे आम्ही 'नानाच्या पाडा'चे इनामदार लोक !

त्यावेळच्या त्या साऱ्याच घटना, इतक्या भरभर एकामागून एक घडल्या, कीं, अजूनहि मला दिसणाऱ्या कुठल्याहि बंद फाटकावरून उडणारे सुरुंग ऐकूं येतात; मुंबईत एखादा कलमी आंबा खातानाहि, बाबा पाटलांच्या खांद्यावरल्या त्या पहिल्या करकरणाऱ्या कावडी आठवतात; कुठें सनईचे स्वर कानीं पडले, कीं, लक्षुमअक्काचं त्या वेळचं तें खुदकन् हसणं नि मंजुळ बोलणं स्मरतं; तिची तशी आठवण झाली, कीं, ती पाटलांची भली मोठी गोल विहीर डोळ्यापुढें दिसूं लागते; त्यावेळीं मी प्रथमच चोरून मारून भुरकलेले, तिच्या पाण्याचे गोड गोड घोट आठवतात नि मनाला एकदम गारवा येतो !

खरंच !....त्या विहिरीचें पाणी !...तें आहेच तसं खोल,....आहेच तसं निर्मळ...नि गोड गोड !!—

*

माफ करा. मला इथं एक मागलं आठवतंय्, तें सांगायचंय्...

मला आठवतंय्, लहाणपणीं आमची मामी आम्हा भावंडांना सांगायची–

" बाळांनों ! अक्काबाईचाच फेरा येतो बरं, एकेकदां तुम्हां देशपांड्या-प्रमाणें ! अगदीं बघतांबघतां, एखाद्या कुटुंबाला पुरा झपाटतो तो ! माणसांना वैभवाची मस्ती येते,–ती त्यांना भावशून्य, बेदरकार, ऐदी बनविते; लक्ष्मी-



लाच पाठमोरं होणाऱ्या आळशांच्या नि उद्धटांच्या नशिबीं हेंच असायचं दुसरं काय...सोन्याचा धूर झाला, कीं, हिऱ्याच्या गारगोट्या व्हायच्या !

" अरे ऽ, त्या वर्षी, तुमच्या सगळ्या मस्तवाल चुलत्या, नरकचतुर्दशीलाहि ढारढूर झोपून राहिल्या. सदाचीच दिवाळी वाटत होती ना, त्यांना !.... एकही नानाजींची बायको–तुमची जख्ख म्हातारी पणजी– ती तेवढी माजघरांत उखळापाशीं हाडांची मुटकुळी करून पडून होती....

" पहिल्या कोंबड्याला, तिनें तिच्या विहिरीचा रहाट वाजलेला ऐकला. मग न्हाणी–घरांत पेटलेलं तें जळण; उटणं–अत्तरांचा वास; घंगाळांत वाजणारा तांब्या; तें सारं सारं तिनें मिचमिच्या डोळ्यांनींच पाहिलं, बहिऱ्या कानांनीं ऐकलं; दरवळलेला घमघमाट नाकांनीं हुंगला...

" तेवढ्यांत, एक छान छान पोषाख केलेली सवाष्ण तरुणी तिच्याजवळ आली; खालीं आदरानें वाकून म्हातारीला नमस्कार करून म्हणाली, " मोठ्या सासूबाई ऽ, जाते हं ! घरांत जाळ पेटलाय्;....दुसऱ्या साऱ्या अजूनहि झोपल्याच आहेत; तुमचं लक्ष असूं द्या हं जरा !..."

" आपली कोणती तरी नातसून शुचिर्भूत होऊन देवदर्शनाला निघालीय ..." असंच, त्या म्हातारीला वाटलं; पण मग, ती दुबळीपांगळी बापडी कशावर नि कसलं ठेवणार होती लक्ष ? दुसरी कोणीतरी तेवढ्यांत जागी होईल, अशी वाट पहात, अधूनमधून सर्वांना सादी घालीत, ती बिचारी तशीच, जागच्या जागीं, पडून राहिली, कोंबड्यामागून कोंबडे आरवतच होते.

" शेवटीं, दिशाहि साफ फटफटल्या; तेव्हां अखेर, खूप आरडाओरडा करूनच, म्हातारीनें साऱ्यांना उठवलं; प्रत्येकीच्या नांवानेंच मोठमोठ्यानें हांका घातल्या.—

" तेव्हां कुठें, डोळे चोळतचोळत, तणतणत, एकेक नातसून उठून आली. त्यांच्याकडे पहांटे देवदर्शनाला गेलेल्या सुनेची म्हातारीनें चौकशी केली. तेव्हां एकमेकींकडे पाहून, त्या पारोशा सुना मोठमोठ्यानें हंसूंच लागल्या. त्यांना वाटत होतं–' सासूबाई बोलल्या !...बडबडताहेत कांहींतरी; म्हणून त्या पुन्हां खुसखुसल्या....

" मग मात्र, सारं कांहीं ध्यानीं येऊन, म्हातारी चवताळून चवताळून ओरडली–' आतां अशा हंसताय् ! पण आपल्याच असल्या गुणांनीं, तुम्ही,

मेल्यानीं, रडणार आहां लौकरच! ती गेली!! आतां काय? मला चांगलं सांगून–सवरून, माझा निरोप घेऊन, ती गेली!! तुम्हांला मस्तीची काळ-झोप लागली होती,...तेव्हांच, तुमच्या भरल्या घरांतली ती लक्ष्मी, पाठमोरी होऊन निघून गेली!...तुमच्या घराला सोडून गेली!'

"त्या दिवाळीच्या दिवशीं, म्हातारी रडरड रडली; नि अखेर, तळमळून तळतळून, चारच दिवसांनीं मेली.

"त्यानंतरच्या त्या दोन वर्षांतलेच ते तुम्हां देशपांड्यांचे तंटे बखेडे, मृत्यु नि सारी वाताहत, बरं! !–"

*

आमची मामी जें आम्हांला म्हणाली होती, त्यांतलं खरं काय घडलं असेल, तें असो;...पण त्यानंतर आमच्या वाड्यांत, कधीं घडल्या नव्हत्या त्या भयंकर घटना घडल्या! चारी बाजूनाच जाळ पेटला, एवढं खरं!...

नि म्हणूनच, त्यानंतरच्या दहाबारा वर्षांत, पाटलाकडलं कांहीं पाहायला, मी किंवा आमच्या देशपांड्यामधलं कोणी, 'नानापाड्या'मध्यें उरलंच नव्हतं!....कारण, पुढल्या दोन अडीच वर्षांत, आम्हां देशपांड्यांच्याच घरांत एका पाठोपाठ, एक एक भयंकर प्रसंग घडत होते—

कांहींतरी चमत्कारिक घडतंय्, असं त्यावेळींहि मला बालमनांत वाटत गेलं होतं; म्हणूनच तर,...त्यांतलं कांहीं याक्षणीं आठवतंय्.

नेहमीं श्रीमंतीच्या तिव्या ताठ्यांत वागणारे माझे आजोबा! आपल्या दोघा भावांशीं देण्या–घेण्यावरून भयंकर भांडले नि आमचं एकत्र कुटुंब, आरडाओरडींत–रडारडींतच विभक्त झालं; तो दिवस चांगलाच आठवतोय्!

त्या परंपरेंतूनच शेतजमिनी–बागायतींच्या वाटण्यांसाठीं, अधूनमधून झालेली शिवीगाळी– तोंडातोंडीं; त्यांतून निघालेले दावे; दोन्ही वकिलांच्या भरीसाठीं, भरभर गहाण पडलेल्या देशपांड्यांच्या मोठ्यामोठ्या चांगल्या जमिनी; घरांतले आजार; कोर्टांत हार; कर्जाचे नवे डोंगर; हायकोर्ट–अपीलं! हेंहि सारं अंधुक आठवतंय्!

अशा दोन अडीच वर्षांच्या उलट सुलट घटनांच्या चरकामध्यें, आम्हां साऱ्याच देशपांड्यांचीं चिपाडं झालीं होतीं. त्या धक्क्यानें आधीं आजोबा गेले; त्यांच्या मागून एक चुलते; मग माझ्या वडिलांचीच एकाएकी पाळी आली.



तेव्हां अखेर, माझ्या मामांनीं, आम्हां तिघां मातृविहीन भावंडांना, केवळ निरुपाय म्हणून, तिथून उचलून आपल्याकडे नेलं होतं!

त्यानंतर नानाजींच्या 'नाना–पाडया'चा नि देशपांड्यांचा, माझ्याशीं केवळ नांवापुरताच संबंध उरला होता!

*

माझा–या विसू देशपांड्याचा–नि नानाजींच्या त्या वैभवाचा तर, त्यानंतर आजवर, कधींच संबंध आला नाहीं; आमचे सारे कोण कुठें परागंदा झाले, त्याचा मला तरी आतां मुळींच पत्ता नाहीं. तें समजण्यांत फायदाहि नाहीं.

कारण, गरीब बिचारी मामा–मामी होतीं; म्हणूनच केवळ, माझ्या दोघां मोठ्या बहिणींचीं लग्नं तरी झालीं. कसाबसा मॅट्रिकपर्यंत गेलों, तरी त्यांच्याच पदरीनें, मी रेल्वेंत तरी चिकटलों; माझं लग्न झालं; दोनतीन मुलांचा बाप झालों; तीं वाढलीं; संसारांत पडलीं.

आतां आठवड्यापूर्वींच, मी सेवानिवृत्तहि झालोंय्; स्वतःच्या साऱ्या एकमार्गी धडपडीचं लोणी–ती ग्रॅच्युइटी–माझ्या हातांत आली आहे; नि एका मुलाच्या वाढत्या संसाराची जबाबदारी तेवढी, म्हटलंच तर, माझ्या शिरावर उरली आहे.

'नानाच्या पाडां'तल्या नानाजी देशपांड्यांच्या [illegible]ल्या पिढीचं हें इति-कर्तव्य! असं माझ्या चाकोरी–निवृत्तीनें, बाहेरच्या बाहेर तें असं संपलंय, खरंच!–

—पण योगायोग मात्र किती अद्‌भुत पाहा–कोणाला हासभास कल्पनाहि नसतां, माझ्या जाणत्या आयुष्यांत, त्या भूमीशीं माझा फिरून संबंध आला; राहिला; तो अगदीं आजवर टिकलाय्!—

याला कारण? पाटलांची ती लक्षुमूअक्का! तिचं तें गजबजलेलं घर–आवार! ती तिची विहीर! त्या विहिरीचं पाणी!—.

*

बारा वर्षांनीं भेट झाली, तर देवळांत जाऊन, परातींतच एकमेकांचीं तोंडं पाहतात, म्हणतात. पण, अक्षुमूअक्का आपल्या वाढत्या परिवारासह पुन्हां प्रथम मला दादर स्टेशनावरच अकस्मात भेटली. कसं कोण जाणें, आम्ही एक-मेकांना ओळखलं नि पटकन् एकाच वेळीं हांकाहि मारल्या, एकमेकांना.

दीड दोन वर्षांच्या अंतरा-अंतराचीं, तिचीं गोटीसारखीं गोरीगोमटीं सहा मुलं होतीं. पहिली बारा तेरा वर्षांची मुलगी; लहानपणींच्या लक्ष्मूअक्कासारखीच जित दिसत होती; पुढले दोन मुलगे, पुन्हां दोन मुली नि शेवटचा वर्षभराच्या आंतला, झबल्या-टोपऱ्यांत सजवलेला तान्हा मुलगा! तो तिच्या हातांत होता त्यावेळीं.

बरोबर तिचा नवरा-केसूकाका-होता; मुंबईत सामान खरेदी करून, सारी मंडळी नारायण वाडयालाच परत चालली होती. दोन दिवसांनीं तिथं तिच्या दोघां मुलांच्या मुंजी होत्या.

मी आपला, पी. टी. आर्डर घेऊन, पुढें बडोद्यापर्यंत गंमतीनें आठ दिवस घालवायला निघालों होतों. पण अगदीं पूर्वीच्याच आस्था आपुलकीनें, लक्ष्मूअक्का नि केसूकाका...दोघांनींहि, गाडींत आग्रह करकरून, मला मुंजींना बोलावलं.

तिच्या त्या लाघवी पोरांनीं तर, अखेर, माझीहि बॅग आपल्या सामानांतून पळवली नि स्टेशनावर उड्या मारल्या.

तेव्हां, नाइलाजानें, 'ब्रेक जर्नी' करून मी त्यांच्या बरोबर उतरलों.

नानापाड्यांत माझं असं फिरून अकल्पितपणें पाऊल पडलं होतं, त्यावेळीं...

*

'नाना पाड्यां'त त्या दिवशीं फिरून पडलेलं माझं तें पाऊल, लक्ष्मूअक्कामुळेंच या ना त्या निमित्तानें, आजपर्यंत कायम पडत राहिलंय्!

पुढल्या बारा वर्षांत, अठरा वर्षांत, किंबहुना, दोन तपांत, झालेल्या माझ्याहि येण्याजाण्यांच्या आठवणींत, मला लक्ष्मूअक्काच्या संसाराचा नि माझ्याहि कारकुनी संसाराचा आराखडा सामावलेला दिसतो.

माझ्या सुखदुःखांच्या प्रसंगीं ती किंवा तिच्या कडलं कोणी ना कोणी, जसं न चुकतां आलं आहे, तसंच, तिच्या दोन मुलींचीं लग्नं, धाकट्याची मुंज, अगदीं त्या तिघांची लग्नंसुद्धां मला चुकलीं नाहींत. त्या सुखाच्या प्रसंगीं, लक्ष्मूअक्काचा फेसाळलेला आनंदसागर मला प्रत्यक्ष पाहायला मिळाला आहे!....



या साऱ्या सुखद घटनांप्रमाणेंच-बाबा पाटील, आजी, अक्कांच्या दोन तरण्याताठ्या मुली, स्वतः केसूकाका, यांचे अकस्मात् नि हृदयविदारक मृत्यु-अपमृत्युहि तिच्या शिरावर कोसळले होते; नि त्यावेळचे-पराकाष्ठेच्या दुःखाचे, क्षणभर हृदयच बंद पाडणारे, तिचे हंबरडेदेखील माझ्या कानांवर पडले आहेत!

या साऱ्या प्रसंगाचे व्रण, त्यांचीं लहानमोठीं अभ्रं, अक्काच्या चेहऱ्याला हळूहळू झाकळत आलीं असलीं, तरी त्यावरील सोज्ज्वलता नि खंबीरपणा कधीं ओसरल्याचें मला दिसलेलं नाहीं.

जीवनाच्या-असला चढउतार—वज्रघातांची तिला जणूं नैसर्गिकच जाणीव आहे; म्हणून असेल, त्या साऱ्या प्रसंगांतून, ती धैर्यानें पुढेंच गेलेली मी पाहिली आहे. जरादेखील नामोहरम न होतां तिनें संसार पुढें चालू ठेवला आहे!

कामसूपणा, अव्याहत श्रम करण्याची अमर्याद धमक, पुरुषासारखं शांतगंभीर दूरधोरण, नैसर्गिक प्रेमळपणा, पण साऱ्यांवर छाप पाडणारा दराराहि, हें लक्ष्मूअक्काचं सारंच असामान्य व अजिंक्यच आहे!

रोमारोमांत भिनलेल्या त्या साऱ्याच्या जोरावरच ती वाटचाल करीत आली आहे. मनांतल्या त्या अखंड झऱ्यावरच, त्या साऱ्या विविध चढउतारांतूनहि पाटलांच्या घरचीं नि दारचीं कलमं अव्याहत वाढत गेलीं आहेत; फुलत गेलीं आहेत; त्यांना नवनवीन रसभरीत फळं धरत गेलीं आहेत.

*

लक्ष्मूअक्काच्या या दूरदर्शी धोरण-दराऱ्यामुळेंच, तिचे सगळे मुलगे, योग्यवेळीं चांगले शिकून आपापल्या कामधंद्यांत, संसारांत पडले होते. मोठमोठ्यांच्या, शाळेंत शिकल्या सवरलेल्या मुलींचं तिनें सुना म्हणून आपल्या घरांत आतां स्वागत केलं होतं.

शाळा शिकून मोठा मुलगा लौकरच बापाबरोबर भावत-कोळसा-जंगलकूप धंद्यांत पडला होता. तो आतां त्यांत पुरा मुरला होता. दुसरा, शेतकी-पदवीधर होऊन, घरच्या शेतीबागायतीचा वाढता व्याप संभाळत होता. शेवटचा मुलगा डबल ग्रॅज्युएट होऊन नुकताच मुंबई कॉलेजांत लेक्चरर झाला होता. त्याच्या सारख्याच खूप शिकलेल्या एका मुलीशीं त्यानेंच जमवून लग्न केलं होतं.....

आणि काळाला धरून, लक्षुमूअक्का, आपलीं आपलीं मतं-मतभेद पोटांत ठेवून, कोणाच्या कधींच आड आली नव्हती.

म्हणूनच पाटलाचं सारं घर आजतागायत एक होतं! सणासुदी नि मोठ्या सुट्यांत तर तें सर्व लहानमोठ्या मंडळींनीं गजबजलेलं असे. आतां लक्षुमूअक्का दहाबारा वाढत्या नातवंडाची आजी झाली होती, नातवांच्या मुंजी झाल्या होत्या. नि दोन तीन नातींहि लग्नाच्याहि झाल्या होत्या.

पण घरांत कोणाची अक्काबाहेर वागण्याची प्राज्ञा नव्हती!

असा हा तिचा घरचा परिवार वाढला होता; पण त्याच्या दसपट दारचाच वाढला होता. हें तिचं विविध गृहवैभव वाढलं होतं, पण त्याच्या शतपट घराभोंवतालचं वाढलं होतं. ती स्वतः आतां वृद्धत्वांत गुडघाभर उतरली होती. पत्नी, गृहिणी, माता या घरांतल्या जबाबदाऱ्या, बाह्यतः तरी, दुसऱ्यांच्या पदरांत टाकून ती मोकळी झाली होती. तरी त्याहून शतपट जास्त बाहेरच्या जबाबदाऱ्याच, तिच्या अंगाला चिकटायला नि तिच्या मनाला व्यग्र करायला पुढें सरसावत राहिल्याच होत्या. पण त्यांतहि ती समाधान मानून होती.

*

किरकोळ सोडला तर तिला कसला आजार नव्हता; पण तोही कधीं तिच्या दैनंदिन कार्यक्रमाआड येत नसे. रात्र सोडली तर तिला कधीं झोंप ठाऊक नव्हती; तरी पण, मुलांसाठीं सुनासाठीं, नातवंडासाठीं, शेजारणी—पाजारणी साठीं, गडी—कामकऱ्यांच्या संसारी अडीअडचणीसाठीं, त्या नैसर्गिक विश्रांतीलाहि लक्षुमूअक्का हजारदां फाटा द्यायला तयार असे. अजूनहि ती सकाळीं पांचाच्या आंत उठे नि लौकर म्हणजे रात्रीं अकरा नंतरच आपल्या अंथरुणावर अंग टाकी.

तिच्या स्वभावाला नि गणितश्रेणीनें वाढत गेलेल्या तिच्या साऱ्या परिवाराला, तें सारं धरूनच होतं!...

कारण, वैभव पैशांतच मोजायचं नसलं किंवा त्याचा फक्त पैसाच करायचा नसला, कीं, तें हजारांना वाटून पुरूनहि मागें उरतं! केवळ 'मीं—



माझें, रक्तसंबंध नि स्वार्थी फायदा; यांच्याच गमकानें आपुलकी—आस्था मोजायची नसली, कीं, आपल्या त्या सदैव वाढत्या परिवाराला आपल्या ओळखीचं नि आपल्या आटोक्यांतलं सारं जगहि पुरत नाहीं.

आणि तसलं तें आपलं वैभव भोगायचं नि तसला तो परिवार संभाळायचा, म्हणजेहि, ऐदी गाद्यागिरद्यांतली सुखासीन झोप आपोआप वर्ज्यच ठरते! त्या सुदैवाचा, नुसता तितकाच प्रतिपाळ करण्यासाठीं देखील, तसल्या वैभव संपन्नांना आपल्या श्रमाचे प्रचंड सह्याद्रि उभारावेच लागतात!

*

घरामागल्या वाड्यांतला गुरांचा पसारा, सुपीक शेतजमिनींचे दूरचे-जवळचे अनेक तुकडे, तीनचार हिरव्यागार बागायती, गवता—जंगलांचे वाढते धंदे! ....या साऱ्या व्यापांसाठीं दारचे गडी 'वाढले' होते. त्यांच्या वाढत्या घरासंसारांचं पाटलांच्या घराभोंवतीं कडंच पडलं होतं.

धंद्यानिमित्त, डझनभर काबाडी गाड्या; कामांच्या—वसुलीच्या निरनिराळ्या फिरतीसाठीं, तीनचार स्वारीच्या गाड्या; अर्थात त्यांच्या निरनिराळ्या दहाबारा बैलजोड्या,....असं करत, बघतां बघतां, एवढ्या दोन तपांत, तिथें एक सारं नवं ब्रह्मांडच वाढून, उभं झालं होतं!...

आणि त्या साऱ्याचा मध्यबिंदू म्हणजे लक्षुमूअक्काच होती!....

—पण आश्चर्य मात्र एवढंच, कीं, तो मध्यबिंदूच, त्या ब्रह्मांडाभोंवतीं अहोरात्र अखंड भ्रमण करीत होता!...

बाबा पाटलांच्या हातचीं आंब्यांचीं नि केसूकाकांच्या हातचीं चिकू—सिताफळींचीं कलमं झाडं! दरवर्षीं, तिच्या दारीं, त्या फळांचा हा मोठा पाऊस पडे. तिच्या सासूबाईच्या हातचे दहाबार शेगट, शेंगांनीं लडबडून ओथंबून जात! अक्काच्या हातच्या पोफळी—नारळी उंचावून, पाटलांच्या घरावर चवऱ्या ढाळीत होत्या. कल्पवृक्षांच्या छायेंत, अमृतफलांना सदैव बहर येत राहिला होता!

अशा त्या पाटलांच्या दारच्या साऱ्या विविध वैभवांतलं सारं निवडकनिवडक, आधीं सर्वांना एकदां तरी घरपोंच जाई; नि तें सर्व झाल्यावर मगच, उरलेल्याचाच झाला तर व्यापार होई.

गोठ्यांतल्या दुभत्या जनावरांनीं दिलेल्या खर्वसकांजाळीपासून दूध दहीं ताक, इ. साऱ्या अमृतामध्यें, आसपासचे सारेच, हक्काचे सहभागी असत. दरवर्षी, नव्या धान्याचे मुठ्यांनीं कलगे भरून; त्यावेळीं, मणांनीं पोहे कांडत तेव्हां, केवळ कांडकारणींनाच नव्हे, सर्वांनाच, त्यांच्या लहानमोठ्या संसारानुसार, टिपऱ्या दोन टिपऱ्यांची वानगी, अगदीं घरपोंच, न चुकतां जाई; दिवाळींत फराळ-फटाक्यांचीं ताटं साऱ्यांकडे जात; होळीला पोळ्यांच्या चळतीमागून चळती उंच उभ्या राहात नि त्यांत आसपासच्या साऱ्यांचा वाटा दडलेला असे.

नेहमीं, कोणत्याहि दिवशीं, चारदोन पाहुण्यांची अगदीं आयत्या वेळच्या अगंतुकांची सुद्धां पंगत असे. मालकाप्रमाणेंच गड्यांच्या पंगतीलाहि एखादं दुसरं पाहुणं पान पडेच !...

घरच खूप मोठं होतं, तेव्हां पाटलाकडे अधून मधून नात्यागोत्याचा नि ओळखी पाळखीचा आठवड्या–पंधरवड्यासाठीं सहकुटुंबहि राबता होई. अशावेळीं साऱ्यांचं तिथें हंसतमुखानें स्वागत होई. घरांत गडी स्वयंपाकी असूनहि, आपल्या सुनानातींसह, त्यावेळीं, लक्षुमूअक्का स्वतःच पदर खोवून पुढें व्हायची... ! नि आपणच शिरावर ओढून घेतलेला तो ‘ रामरगाडा ’ आपल्याच श्रमांनीं व खर्चानें पार पाडायची ! त्यावेळीं मालक, नोकर, लहान मोठं हा भेद अळवावरल्या पाण्याप्रमाणें अंतर्धानच पावे !

असा तिथला तो साराच जगड्व्याळ, असामान्य व्याप पाहून, कोणाहि तिऱ्हाईताचे डोळे दिपावेत, नव्हे, ते विस्फारून फाटावेतच !

पण पाटलांकडच्या लहानमोठ्या साऱ्यांचीच दृष्टी, लक्षुमूअक्काच्या सहवास–संसर्गानें, कायमचीच विस्तारली होती. म्हणूनच, इतर कुठल्या ठिकाणच्या हिशेबांत, ‘ कुणाला जिथं छटाका दिसेल त्याठिकाणीं शेर, शेराठिकाणीं मण; मणाठिकाणीं खंडी नि खंडीठिकाणीं मुढे हे हिशेब त्यांना नैसर्गिकपणेंच दिसत असत. आणि त्या तसल्या जरूरीच्या साऱ्या वाळवण-टिपणांचे, मागल्या अंगणांतील ते सत्रा सोपस्कार ! सुनागड्यांची त्यांत मदत असली, तरी अजूनहि, अक्षुमूअक्काच्याच आविश्रांत श्रमांची मुख्य जबाबदारी असे ती !



तरी, त्याचा तिला कधीं राग नसे, कंटाळा नसे, ‘ आपलं ’ म्हटल्यावर सारं केलंच पाहिजे !

‘ आपलं ’ शब्दाची व्याख्या–व्याप्ति किती वाढवायची, हासुद्धां, अखेर, आपलाच प्रश्न असतो !

*

‘ नाना पाड्यां’तल्या लक्षुमूअक्काच्या, असल्या या वाढत्या वैभवांत व आपुलकीच्या वर्तुळांत, माझं दूर मुंबईला वास्तव्य असूनहि, जवळजवळ दोन अडीच तपं, मी अधून मधूनचा एक महत्त्वाचा वाटेकरी होतों.

तसा ना रक्ताचा ना जातीपातीचा माझा त्यांचा संबंध !–पण लक्षुमू-अक्काच्या पोराबाळांनीं मला ‘ विसू मामा ऽ’ म्हणून हांक मारली, कीं, माझं हृदय हळुवार भावनांनीं कालवून येई !

तिथला तो सारा, सारखा उत्तरोत्तर वाढता, पसारा नि देखावा पाहून, माझेहि डोळे दिपत, निवत ! पण माझं दुबळं मन जितकं एकेकदां उचंबळून येई, तितकंच, तें कित्येकदां झांकळूनहि जाई !

अशावेळीं माझ्या भयभीत मनाला वाटे, “ हें सारं दिसायला ठीक; इतरांना फुकट उपभोगायलाहि ठीक ! पण असली ही घोडदौड, हा आपुलकीचा अफाट वाढता पसारा ! तो कायम टिकेल ना पण ? नाहीं तर–तें जुनं आहेच, ‘ बा तुझा चालता काळ, खायला मेळती सकळ ! ”

पाहुणा म्हणून, अधून मधून, अक्काकडे गेल्यावर, असलेच उलटे सुलटे विचार करीत मी पाटलांच्या विहिरीवर एकटाच बसून राही.

आजहि माझं तेंच चाललं होतं...माझ्या मनांत भूतकाळच्या त्या अनेक निराळ्याच स्मृति फडफडून, मला संमिश्र गंमत वाटत होती.

बालपणीं ते सुरुंग फुटल्यानंतर, विहिरीला प्रथमच फुटलेले ते गोड पाण्याचे मनगटी झरे; ती कुंडीवरली पाण्यासाठीं होणारी गुरांची झुंबड; तें सारं सारं पूर्वीप्रमाणेंच, आजहि चालूं होतं. लक्षुमू अक्काचा संसार आतां कल्पनातीत अफाट विस्तारला होता. भोंवतालचा परिसरहि खूप गजबजला होता. तरी, अजूनहि, पाटलांची ती एकुलती एकच विहीर, घरच्या-दारच्या साऱ्यांची तहान भागवीतच होती ना ? कोणाला कधीं नाहीं न म्हणतां, कधींहि न आटतां, बारमहा पाणी पुरवून, साऱ्यांना ती एकटीच स्वतः पुरी पडत होती ना ?

नि म्हणूनच मग मला वाटलं—"या संसाराच्या कर्मभूमींत गोड स्वभावाची प्रेमळ लक्षुमूअक्का आहे नि ती गोड पाण्याची तुडुंब भरलेली विहीर आहे, तोंपर्यंत, कशालाच कधीं कसली कमतरता पडणार नाहीं !"

*

उलट, आम्हां देशपांड्यांचा शेजारचा तो मला मोठा वाडा हळूहळू ओस पडलेला, तो कोसळत गेलेला, त्याच गेल्या दोन तपांत, स्वतःच्या डोळ्यांनीं, व्यथित मनानें, मी पहात आलों होतों. कोर्टकचेऱ्यांत गहाण गेलेलं तें आमचं सारं उरलं सुरलं वैभव, कांहीं, झालं तरी बाबा पाटलांना मिळूं नये, म्हणून माझ्या आजोबांनीं, ते जिवन्त असेपर्यंत, कशा सत्राशें लटपटी केल्या होत्या, तें मी मागें केसूकाका कडूनच ऐकलं होतं.

ती जागा, अखेर, कवडी मोलानें दुसऱ्यांना गेली होती. निरनिराळ्या हातांतून प्रवास करीत, तिची मालकी फिरली होती. पण अखेर, दोनतीन वर्षांपूर्वी लक्ष्मी अक्कानेंच, 'आपल्या लगतची' या विचारानें, चारपांच रुपये वारांची जादा रक्कम वेचून, ती स्वतःच्या मालकीची केल्याचं माझ्या कांनीं आलं होतं !

किती विचित्र घटना वाटत होत्या मला, त्या साऱ्या ! !—

त्यामुळेंच, त्या विहिरीवर बसल्या बसल्या, आजहि फिरून मला वाटलं होतं—" खरंच ! स्थळ, काळ नि व्यक्ति यांचा कधीं कधीं एकमेकांशीं एक अद्‌भुत, असामान्य संबंध असतो, हेंच खरं ! आपण सदैव निर्मळ मनानं चांगलं करत राहणं, हेंच ज्याचं त्याचं कर्तव्य !—तें करत राहिलं, तर.... या ना त्या प्रकारें, कमी ना जास्त यश हें येतच राहतं ! गाडं हें चालतच राहतं ! डबक्यांतल्या प्रमाणें जिवंत विहिरीचं पाणी कधीं आटतं कां ?—"

आणि त्यावरूनच मला, सहज वाटणाऱ्या पण भयंकर अद्‌भुतच घटनांची एकदम जाणीव झाली—!—

काय गंमत तरी पहा—देशपांडे केव्हांच नामशेष झाले !—तरी हा विसू देशपांडे, या नानाच्या पाडांत, आजहि, जिवंतपणें हे विचार करीत बसला आहे!...बाबा पाटील गेले; तरी त्यांना बंद झालेला दोन कुंपणामधला तो गंजलेला फाटक आज राजरोसपणें पुन्हां उघडला गेला आहे !...नि त्यांचीच सून देशपांड्यांच्या आवाराची आजची मालकीण म्हणून निःशंकपणें,



सारख्याच हक्कानें अलीकडे पलीकडे वावरते आहे !.... केवळ स्वतःसाठींच स्वाभिमानानें गांठचा सारा पैसा ओतून खोदलेली पाटलांची विहीर अजूनहि भोंवतालच्या अगदीं साऱ्या साऱ्यांना गोडगोड पाणी पुरवून, ती भरलेलीच उरली आहे !...

चाकोरीच्या आयुष्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या माझ्या सारख्या वृद्ध माणसाचे हे विचार ! ते स्वतःच्याच समाधानाला नीट पुरत नाहींत; तर मी इतरांना काय नि कशाला सांगणार ते ?

*

तेवढ्यांत, देशपांड्यांच्या कुंपणाजवळूनची,—लक्षुमूअक्काचीच हांक माझ्या एकदम् कानीं पडली—" अरे ऽ ए ऽ — विसूमामा ऽ ! एकटा एकटाच रे ऽ काय बसलाहेस तिथं विहिरीवर ? इकडे ये ना ! — "

एकदम कानीं पडलेल्या तिच्या त्या हांकेनें, मी माझ्या विचारांतून प्रथम दचकूनच भानावर आलों.

मग उठून त्या बाजूस जात, हंसत हंसत तिला म्हणालों, — " अं ऽ ! काय सांगते आहेस ग नवीन, लक्षुमू अक्का ?—"

त्यावेळीं ती फाटकापलीकडे ' देशपांड्यांच्या आवारांत ' उभी होती. मी अलीकडेच, पाटलांच्या आंबराईत, झाडांजवळ मी उभा होतों.

कशी कोण जाणें, आमच्या लहानपणीं कुंपणावरून झालेल्या गप्पागोष्टींची मला सणकन् आठवण झाली.

त्यावेळच्या आमच्या उभं राहण्याच्या जागा मात्र आज बदललेल्या होत्या; ...आज तर, अलीकडे पलीकडे, लक्षुमूअक्काचेंच राज्य नांदत होतं !

तेवढ्यांत, लक्षुमूअक्का सस्मित चेहऱ्यानें पण गंभीर स्वरांत म्हणाली, —" अरे विसूऽ....मला एकदम सुचतंय्, एक—कालच म्हणत होतास ना तूं ?—कीं तुझ्या दहाबारा हजारांच्या फंडाची व्यवस्था केली पाहिजे तात्काळ म्हणून ?—आटोक्यांतली एखादी जमीन खरेदी करायचीय् ना तुला ?— "

मी गोंधळून तिच्याकडे पाहात विचारलं—" बरं मग ? आहे काहीं तुझ्या पाहण्यांत तसं ? "

" हो ऽ ना ऽ ! " अक्का, हंसत म्हणाली, " सुचलंय् तें पटकन् सांगून टाकतें !....असं रे कां नाहीं करीत तूं ? ही तुझीच निम्मी जमीन बरी

होईल कां तुला ! हं घेऊन टाक आजच—शुभस्य शीघ्रम्—तिथं चारपांच खोल्याचं एक बैठं घर बांधून टाक तूं आधीं;—मग मागल्या बाजूला चिकू-आंब्यांचीं कलमं लाव हळूहळू !—आमच्या वईजवळच्या तुझ्या भागांत तुमची पूर्वीची एक विहीर येतेच आहे, नाहींच पुरलं तिचं पाणी, तर तिकडे कुंपणापलीकडे...आमची विहीर आहेच !...कसं ? ''

तिची ती कल्पना अकस्मात् पुढें आली होती. त्यांत बालिश आपुलकी तुडुंब भरली होती.

त्या तिच्या उद्गारांनीं मी तर अक्षरशः गुदमरूनच गेलों.

कसा बसा, अडखळत्या शब्दांतच, मी तिला म्हणालों—'' अग पण मला गरिबाला त्या चिमुटभर रकमेंत सारं जमेल कसं, लक्षुम् अक्का ?.... तुलाच आधीं ती जमीन महाग पडलीय्—पोरखेळ का आहे तो ? ''

ती बालपणीं सारखीच खुदकन् हंसली; मला तिनें मध्येच थांबवलं नि म्हटलं-'' तें कांहीं नाहीं !....अरे आपण ठरवलं कीं ठरतं !....सारं कांहीं झेपतं ! देशपांड्यांची जमीन देशपांड्यांना नाहीं झेपणार, तर कोणाला रे ?... पैसे फार तर कमी जास्त होतील; पुढें मागें होतील ! नाहीं तरी, माझ्या मुलानातवांना कोण आहे दुसरं ?....तीं कांहीं माझ्या बाहेर नाहींत. ऐकतील माझं ! विसूमामाचा शेजार ! साऱ्यांनाच बरं तें ! ''

*

मी अगदीं स्तिमित नजरेनें अक्काकडे पहातच राहिलों. काय म्हणाली ती ? ' तुझी जमीन ! ' इतक्या वर्षांनीं नि इतकं सारं झाल्यावर देखील, लक्षुम्अक्का म्हणाली— ' तुझी जमीन !'

मला अगदीं भडभडून आलं; कालवलं; झरझर माझ्या डोळ्यांत आसवं उभीं राहिलीं; गालावरून ओघळलीं,...हळूच एक हुंदका, नाइलाज होऊन, बाहेरहि पडला.

त्यानें मात्र अक्का चपापली. हळुवार शब्दांत मला म्हणाली—'' अं ऽ ? हें काय रे ऽ ? काय झालं, विसू ऽ ? कांहीं उणाअधिक शब्द तर नाहीं ना गेला माझ्या तोंडून ? कांहीं चुकलं असलं तर क्षमा कर रे ऽ बाबा मला !-'' आम्हीं आपलीं अशिक्षित माणसं...''



मी अधिकच गुदमरून, रुद्ध स्वरांत, घाईघाईनें तिला म्हणालों—'' छेः छेः ! लक्षुम् अक्का ऽ, अकारणच आहे हें ! ''

तिनें गोंधळून विचारलं—'' म्हणजे ?....''

धोतराच्या सोग्यानें माझीं आसवं हळूच टिपत मी हंसून तिला म्हणालों, '' आठवतंय् ना तुला लहानपणचं ?....हें डोळ्यांना आलं....तें त्या तुझ्या विहिरीचं पाणी !...गोड गोड पाणी !...आज तेंच माझ्या हृदयांत, अंगांगांत भिनलंय् !....होय...देशपांड्यांच्या विसूला आज धन्य धन्य वाटतंय खरं ! म्हणूनच, तें पाणी, असं त्याच्या डोळ्यांतून आज घळघळतंय् ! !—''

● ● ●

# दुबळ्याची दुनिया

आतां जुनं सामान भरलेली ती तीस पस्तीस वर्षांपूर्वीची पिवळी ट्रंक आमच्या पॅसेजच्या कोपऱ्यांत अजूनहि पडलेली आहे. त्याला ती मी बक्षिस दिली होती; पण तो ती अखेर ओशाळेपणें मागें टाकूनच गेला. तिच्यामुळें, वर्षातून चारदोनदां तरी, मला त्याची आठवण येतेच.

कधीं घरीं, दारीं कोणाकडे 'सुमार' चहा घशाखालीं उतरवण्याची माझ्यावर पाळी आली, कीं, त्याची मूर्ति 'दत्त' म्हणून माझ्यासमोर उभी राहते. अर्धा कप म्हटला तर अर्धा, डझन म्हटलं तर डझन, कितीहि.... अगदीं एका फॉर्म्युल्याचे, फर्मास, जिभेला तासभर तरी न सोडणाऱ्या लज्जतदार चहाचे कप तो पुढें करी. ट्रेमधल्या कपांत तो गव्हाळी रंग पाहतांच मन संतुष्ट होई; पितांना तर पुसूंच नका!...

बिऱ्हाडाला डुप्लिकेट किल्ली करायला चालढकल नि उशीर होत होता; म्हणून, एकदां त्यानें मला सुनावलं होतं—"नाहीं तरी, नको तिथं, नको तो खर्च फार तुमचा, मामा! पाकिटांना दहाबारा आणे दिवसाला जातात; नि चार आण्याची किल्ली गेले तीन महिने आणतोंय् आपण—"

मी धोब्यासाठीं काढलेल्या कपड्यांच्या ढिगाऱ्यांतले, आपल्या दृष्टीनें, निम्मे बाजूला काढून, ते घरीं धुवून त्यांना स्वतः केलेली 'कच्ची' इस्त्री—माझ्या अंगावर चढवणं नि माझ्यातर्फे न बोलतां तशी माझी काटकसर करणं, हा त्याला आपला जन्मसिद्ध हक्कच वाटे—आयत्यावेळीं ते कपडे घालतांना व घातल्यावर माझी जी त्रेधा उडे त्याची त्याच्या एकमार्गी मनाला पर्वाच नसे.

तरी दोन तपं झालीं या गोष्टींना! मेव्हण्याला गंमतीनें 'अर्धी बायको' म्हणतात. मला अर्धी किंवा पुरी बायको नसतांनाच्या काळांत तो माझा ब्रह्मचारी संसार करीत असे, एवढं खरं.

*

आतां तो नाहीं......गेला! कायमचा निघून गेला.

हो गेला;....म्हणजे माझ्या जगांतून गेला. तसा तो आहे; अजून तो जिवंत आहे; पण त्याचं जग आतां पार निराळं आहे.

तो तसा आहे; पण आतां तो, तो नव्हे! तो पूर्वींचा तो आतां गेला; आतां आहे तें केवळ त्याचं भूत आहे! मानवदेहधारी भूत!—

तें मला इकडे तिकडे वावरतांना दिसतं; तें माझ्याशीं ओशाळेपणें एखादा शब्द बोलतं; त्यावरूनच, मला त्याची पुनः पुनः आठवण येते नि हळहळ वाटते! भूताची कींव येते.

—वाटतं उमद्या व्यक्तित्वाची मानवी जगांत केवढी प्रचंड नासधूस होतेय्!

त्यावेळीं तो भरीव अंगाचा, घोटीव बांध्याचा, गोटीसारखा, काळसर, तुकतुकीत कातडीचा, नुक्ती मिसरूड फुटलेला, विशी-आंतला जवान होता. आतां थलथलित, सुजल्यासारखाच दिसतो. तेव्हां त्याचे डोळे मंद, हंसरे, प्रेमळ होते. आत्तां ते सदा तरारलेले, भिरभिरणारे, लाल, कोणाची चाहूल लागतांच पायाकडे पाहणारे,....असे झाले आहेत. आतां त्याचीं पावलं बेताल, वांकडीं, एकांत एक गुंतत पडतात. हातांचे विचित्र हातवारे होत असतात. ओठांची तर सदैव पुटपुट चालते.

अगदीं ऐसपैस संथपणें, तो रस्त्याच्या कडेनें असा जात असला, जुनाट हाफ पँट नि विटका गंजिफ्राक अंगावर असला, कीं, समजावं, तो त्याच्या सुटीचा वार आहे; किंवा त्याला रात्रपाळी आहे.

त्यावेळीं तो माणसांत नसतो; एकेकदां माणसं ओळखून दूरच जातो.

*

त्या दिवशीं, कामानिमित्त मी त्या परिसरांत गेलों असतां, तो मला तसाच एका आडव्या पाऊलवाटेनें हमरस्त्याला लागतांना दिसला.

मागलं सारं आठवून, माझ्या मनांत त्याच्याबद्दलची आस्था आपुलकी दाटली; त्याची ती प्रत्यक्ष अवस्था पाहून, मला त्याची कींवच वाटली.

पण तें सारं दडवून, मी त्याला आज हटकायचं ठरवलं; त्याच्या हृदयाला हात घालायचं ठरवलं.

" काय गोप्या ?...कुठून कुठं ?..."

मोठ्यानें दचकूनच तो भानावर आला नि मागें वळून भांबावलं–ओशाळं हंसत, हंसत–चांचरत म्हणाला – " बरा हाय् , मामा !...जातुय् घरीं..."

" जाशील रे ऽ....मीहि तिकडेच येतोय् कीं..." झोकांड्या खात, मला झुकांडी देऊन पुढें जाण्याचा त्याचा बेत दिसतांच, मी त्याला थबकवलं; तेव्हां, नाइलाज होऊन, स्वतःला शक्य तितकं सांवरीत, माझ्या बरोबरीनें तो गुपचूप चालू लागला.

पांच पन्नास पावलांची ती शांतता. अखेर असह्य होऊन...तो हळूच पुटपुटला—" तुमी समदं हाय जानलं, मामा !—मंग मेलेल्याला जास्त मारूं नका, आतां;....मी उद्यां भेटेन् !...हवंत् तंवा दोन तोंडांत मारा ! —आत्तां माजा मी नाय्–हाय्;––जातूं मी !...उद्यां..."

" उद्यांचं उद्यां !....आज आधीं मला हें सांग––हल्लीं तूं पोर्टर आहेस ना रे, रेल्वेंत ? "

" हो...धा वर्स जालीं,...आतां भात्तर मिलतात...."

" माझ्याकडे होतास, तेव्हां दरमहा सात मिळत !...म्हणजे वरल्या शून्याला कांहींच नाहीं का रे किंमत ?...एकं, दहम्...गणित शिकलाहेस ना रे शाळेंत तूं ? "

तो चपापला; तसा तो चाणाक्ष आहे; त्याला माझा सगळाच्या सगळा रोख कळत होता.

" तुमच्याकून निगलों...नि मर्दी, आटनऊ वर्स, नक्षत्रच व्हतं माज्या पायावर !...काय गाठीं पडंच ना,...तरी बी जमलं तें समदं दादा सावकाराच्या पायावर घातलं !....ती पयली पळाली...नी तिच्या पायीं चढलेले दोनशें रुपये उरले न्हवते का उरावर ?...ते येनं पुरं केलं ! " तो खोकत, फुसफुसत, दमछाट करीत नि स्वतःला आवरीत–सावरीत, पण डोकं बरंच ठिकाणावर ठेवून, तें सविस्तर सांगत होता.



" आणि मग.....हीं मधलीं रेल्वेंतलीं दहा वर्षं ?..." मी त्याची गाडी रुळावरून घसरूं दिली नाहीं. त्याच्या हृदयाच्या गाभ्यांतच शिरायचं होतं आज मला !...

" वा ! लगीन केलं ना दुसरं !....साशें...साडेसाशें खर्च आला..." तो अभिमानी स्वरांत म्हणाला. त्यानें त्यावेळीं माझ्याकडे बघितलंन् , तेव्हां त्याचे तर्र डोळेहि चकाकले—" गोंद्याचं लगीन केलंन्, तवा बाबाला दोनशें नि धा दिले. आया आजारी पडली, तंवा...दीडशें उडाले.... आवशद–पाण्यांत..."

मधली त्याची भाषेची ब्राह्मणी शुद्धता आतां निघून गेली होती. ती फिरून आपल्या मूळच्या आदिवासी पातळीला आली होती.

तरी पण, बोलतां बोलतां, त्यानें हजार दीड हजारांचा हिशेब; इन्कम टॅक्स खात्यालाहि मंजूर होईल, इतक्या स्पष्टपणें दिला होता. त्यामुळें तर, गोप्याच्या त्या क्षणाच्या त्या स्थितीचं तें गौप्यगुपित मला आतां अधिकच गहन वाटूं लागलं होतं.

माझ्यासमोर जन्मलेली, वाढलेली ती व्यक्ति होती. कांहीं झालं तरी....

*

त्याला बोलतं करायला नि त्याच्या त्या धकाधकीच्या मधल्या जीवनाच्या आठवणींवर आपुलकीची फुंकर घालायला, मी थोड्या वेळानें म्हणालों— " वाः ऽ ! म्हणजे बरंच केलंस कीं ऽ !....बरी मिळाली ना दुसरी बायको ?...नांदते ना चांगली तुझ्याशीं ?...."

पण गोप्याचा चेहरा एकदम साफ पालटला. त्यावर सहस्र ढग झांकळून गेले....

शेवटीं, मन दडपून, वरवर हसरा चेहरा करून, तो म्हणाला—" तशी बरी हाय् ;...पन् या नव्या पोरी. मामा...अक्कल दिडकीची नाय;...आन् बामनांच्या बायांसारकं कराया बगतात ! नाकापर्क्षी मोती जड काय कामाचं ? नवरा काय भावलं हाय यांच्या मुठींत मावायला ?...चारदां सांगतों नि पांचव्या वख्ताला एक चांगली हणतो !...चालीत नाय् ती बायको काय ?"

" अरेऽ अरेऽ ! बरं नव्हे असं, गोप्या ! " मी समजावणीच्या स्वरांत म्हणालों.

" चार वर्सांपार्टी गेली होती रुसून, बापाकडं, वरीसभर. " तो त्याच्या ओघांतच म्हणाला—मी म्हनलं...'मर जाऽ ना !....नसल नाशिबीं आपल्या बायकू, तर हवी कशाला यातायात ? ' पन् मग...आली नाक मुठींत धरून, आपसूक परत,...आपल्याच पायांनीं..."

" ठीक झालं, ... तुमचं तंत्र तुम्हांला ठाऊक, बाबा ! ... तुला आतां मुलं बाळं रे किती ? "

पुन्हां त्याचा चेहरा काळवंडला, पडला. क्षणकाल, माझ्याबरोबर गप्प गप्पच चालून तो म्हणाला—" अं हंऽ क् ! ... तें नाय् दैवांतं ! माज्या आयान् आन् तिच्याकडच्यांनीं, खूप उपाय केले; ... अंगारे धुपारे भगत ... मांत्रिक ! .... दिला नाद सोडून तो आतां, मी ... "

" नि आतां हाऽ धरलास काय रे, मूर्खाऽ–" मी त्याला एकदम कैचींत पकडून पार हेटाळलं—" घामाच्या पैशाची कांहीं किंमत रे ? "

तेव्हां तो चपापला. त्यानें माझ्याकडे चोरट्या नजरेनें एकदां पाहिलं.

नि मग, एक निःश्वास टाकून तो म्हणाला..." खूप खूप केली, बरं ऽ पैशाची किंमत, मामा ऽ !...पन्, आतां.... काय पन् वाटत नाय् मला—"

" अरे ऽ पण, सोन्यासारख्या शरीराची माती होते ना ? ऽ ऽ ..." मी जरा हळहळल्या शब्दांत म्हणालों...." होतास कसा ? झालायस् कसा ? ....हल्लीं कधीं आरशांत पाहिलाहेस का तुझा असला म्होरा ?...प्रकृतीची अगदीं माती केली आहेस...माती ! "

पुन्हां गोप्या थोडा वेळ गप्प होता.

मग कडवट पणें हसून तो म्हणाला..." केली नाय्;...झाली. हा देह, म्हंजे.... मातीच हाय् !...पैसा म्हंजे तरी आखीर काय ?—मातीच !—त्यांत राम नाय्..."

" मग राम रे कशांत आहे? 'अच्छेरा...एक शेरां'त ?...मूर्ख कुठचा !..." मी चवताळलों.

त्यें कोन् जान् !....पन् त्यांत मोप जीव मातर हाय् !....आपल्या उरांतला समदां जीव वर...वर....ओढून अनायची खूप ताकत हाय् !.... त्या पुडं पैसा...माती !—देह माती ! " त्याच्यांत तत्त्वज्ञ शिरला होता.

*



तें तसं बोलतांनाहि, उचकीबरोबर त्याचा जीव 'वर' येत होता. त्याला एकदां दोनदां मला संभाळावंहि लागलं. 'बिन डिग्री' घेतल्यामुळें त्यालाहि कसली डिग्री उरली नव्हती; केवळ मी होतों म्हणूनच, त्याच्या शुद्धी बुद्धीचा थर्मामिटर साफ फुटला नव्हता, एवढंच.

पूर्वींचा विनयशील, अबोल, निर्व्यसनी गोप्या ! तोच इतका बेफाम, इतका बेडर झालेला पाहून, मला कसंसंच वाटलं; मी अतिशय अस्वस्थ, बेचैन झालों. शिकून अखेर हेंच याचं ? या विचाराचं वैफल्य मनांत फार दाटलं !

तेवढ्यांत, चालतां चालतां, तो एकदम थबकला, खालीं वांकला; मला कसली कल्पना होण्यापूर्वींच, त्यानें माझे पाय धरले; त्याच्या डोळ्यांतून आसवं गळत होतीं, नि तो कांपऱ्या स्वरांत म्हणत होता..." नाय् नाय् मी चुकलों, मामा !....मी चुकतोंय ! मला समदं समजतं ! पन् उमजत नाय ! मनाला काय पन् पेलत नाय् ! मन मेलंय् माजं,...त्याचीच माती माती झालीय्...."

त्या एकदम बदललेल्या देखाव्यानें, मला अगदीं गुदमरल्यासारखंच झालं.

कसंबसं त्याला उठवून, थोडं समजवीत, धरून चालून, मी म्हणालों.... "ऐक ! असं वेड्यासारखं काय करतोस ? तुमच्या आदिवासींमधला एवढा चांगला फायनलपर्यंत शिकला–संवरलेला तूं !....फावल्या वेळांत चांगलं वाचावं,.... नवं नवं शिकावं;...तसला नाद घ्यावा ! खरं ना ? "

" त्यें समदं समदं झालं माजं, मामा. " तो एकदम भानावर आल्यागत म्हणाला ... " ल्हानपणीं तुम्ही शिकवायचा, सांगायचा; तवा काय पन मजा वाटायची...तुमच्याकडं होतों तवा बी वाच वाच वाचायचों;....मनांत; खूप विचार करायचों ! ... पर आतां ? .... कशा कशांत रामच वाटत नाय् ! .... पुना मी ठोंब्या, दुबळा, आदिवासीच झालोंय् ! वाटतं,... आपलं वाचन आन् आपला विचार,... म्हंजी, या वरच्या हाप पँटी-सारकाच !.... त्याचा लोकांना दिसायलाच तेवढा उपेग ! आपन आंत जलमलों तसेच...अज्ञान, नंगे, रानटी, 'दुबळी'...."

बोलतां बोलतां तो गप्प झाला; त्यानें दोन तीन निःश्वास टाकले.

"असं कां रे सारं बदललं तुझं गोप्या ?" खूप खूप विचार करून, मी अखेर त्याला विचारलं....

"खरं सांगूं, मामाऽ ?" तो किंचित् काळानें म्हणाला—"मी पैसा पैसा करून, तुमच्या आसऱ्यांत बी दोन नोकऱ्या धरल्या, आन् तितूनच माजं हे समदं बदललं !...आन् बगा, तुमी दिलेली ती पिवळी टरंक मी ठेवून तुमच्याकडनं निगलों; तवा, त्या ट्रंकींतच माझी समदी अक्कल मागं ऱ्हायली !...ती एकदां हातनं हुकली ती हुकली; फिरून गावली नाय कदीबी..."

*

त्याच्या त्या शब्दांनीं मला केवढ्यानें तरी दचकल्यासारखं झालं. माझ्या-समोर ती सारी घटनापरंपरा झरकन् उभी राहिली.

लग्नानंतरच्या नव्या जमान्यांत, आम्ही दोघं ( नि तिसरा नवा चिमुकला जीव ) सुटींतली 'भ्रमंति' करायला, दीड महिन्यासाठीं निघालों.

तेव्हां गोप्याला मी सांगितलं होतं...."हे खर्चाला वीस घे,...घरीं दीड महिना तुझ्या आयाच्या हातचं खा;...तुझा पगार चालूच आहे;...माझं पत्र आलं, कीं मग ये मुंबईला... परत..."

पण आमच्या गैरहजेरींत, त्याचा कष्टाळू हिशेबीपणा एकदम जागा झाला होता. एकाच काळांत दोन पगार गाठीं करण्यासाठीं त्यानें एका दादरच्या वैद्याकडे तात्पुरती नोकरी धरली होती. तो घरीं गेलाच नव्हता.

त्याला मग माझं पत्र मिळालंच नव्हतं; आम्ही आल्यावरहि तो रुजू झाला नव्हता; झाल्या दिवसांचा त्याचा पगार, त्या नव्या ठिकाणीं अडकल्या-मुळें, त्याबरोबरच, त्याचा जीव व हातहि, त्या वैद्याकडे अडकला होता. आम्हांला तर खूप खूप रागच आला होता, त्याच्या त्या वागणुकीचा.

मग, जून महिना संपतां संपतां, तो दबकत दबकत आला होता.

आम्हीं मनांत रागावलों असलों, तरी राग बाहेर दाखवला नव्हता. त्याच्या हातचा पेटंट चहा करवून प्यालों होतों; त्यालाहि प्यायला दिला होता.

थोड्याच दिवसांपूर्वीं मी त्याला दिलेल्या ट्रंकेंत, त्याचे कपडे माझ्याच घरीं पडले होते. जातांना त्यानें सूचकपणें विचारलं होतं...."माझं इथलं सामान नेऊं ऽ मी, मामा ऽ ?"



'परत येऊं ना मी ?....' या अर्थाच्या आपल्या खऱ्या प्रश्नाला, त्यानें दिलेलं तें ओशाळं भिन्न रूप ध्यानीं येऊनहि, मी म्हणालों होतों—"अरे, तुझं ऽ सामान ! तें तूं नेणारच; ने ऽ कीं ऽ ! खुश्शा ऽऽ ल ! !"

असं लागोपाठ दोन महिन्यांच्या अखेरीला होऊन, अखेर, त्यानं आपलं तें सामान उचललं होतं; पण तो पिवळा ट्रंक मात्र तिथंच रिकामा करून ठेवला होता भिंतीपाशीं.

तो दाराबाहेर होतांना, तें ध्यानीं येऊन, मी आश्चर्यानें म्हणालों होतों—"हें ऽ रे काय, गोप्या ?....तुझी ट्रंक !...तुला दिलीय ना मी ती ?..." ती रे कां ठेवलीस, मागं ?"

तेव्हां तो घुटमळला होता; माझ्याकडे त्यानें चोरट्या नजरेनें पाहिलं होतं; नि कांपऱ्या आवाजांत मला म्हटलं होतं—"दिलीत् तुमी; पण माजी नाय् ती !...मला नाय् नेतां येणार;...असूं द्या इथंच..."

"बरं ऽ ! जशी तुझी मर्जी ऽ..." माझं मन ! आंत कालवत होतं; विचार बदलावासंहि वाटत होतं; तरी कठोरपणें मी पुढं कांहीं बोललोंच नव्हतों.

वाटलं, आपल्या पायांनीं जात्या जिवाला पाठीं ओढूं नये आपण !.... कोण कुणाचा असतो थोडाच, जगांत ?....

*

मग त्याच्या नव्या नव्या नोकऱ्या झाल्या होत्या. एकदां त्याचं नव्या कपड्यांचं बोचकंच प्रवासांत चोरीला गेलं होतं...दोन तीन वर्षांनीं तो कांहीं काळ बेकारहि झाला होता; तेव्हां, त्याचं मला पत्र आलं होतं... माझ्या एका चिठीचा, योगायोगानें उपयोग होऊन, मग त्या परंपरेंतून, केवळ जमत जमत, पुढें आजच्या या नोकरीपर्यंत, त्याच्याच गुणांनीं तो येऊन पोंचला होता.

माझ्याकडून निघाल्यामुळें, त्याचं तसं कसलं कसलंच कायम नुकसान झालं नव्हतं,....तो चांगला पगारदारहि झाला होता. त्याची ती जीवनांतली सारी बढती ! लांबून पाहून—ऐकूनहि मला एक प्रकारचं समाधानच वाटत आलं होतं.

आणि इतकं असूनहि, तो आज तसं म्हणाला; त्यानेंच मला जरा कसं-संच झालं !... माझं त्या क्षणचं तें गोप्याचं गौप्य अधिकच गूढ, गूढ, गंभीर स्वरूप धारण करूं लागलं. मन भारावून गेलं.

"खरं सांगूं, मामा ?" गोप्या मनावर ताबा ठेवून, शहाण्यासारखा बोलत होता... "मला पक्कं ध्यान हाय् – तुमी कोनाबरोबरसं बोलतांना एकदां म्हणला होता—'पानी किती बी वर चडलं,...तरी आखिर, आपलीच सपाटी तें शोदून काडतं !' अगदीं लाखाची गोष्ट ! आतां रोजचं पटतं, बगा, तें !"

त्यानें दिलेली ती आठवण मला कांहीं आठवत नव्हती, नि त्या क्षणीं त्याचा रोख कशावर होता, हेंहि मला समजत नव्हतं.

"आमी शिकलों; शहाण्यांत वावरलों,... तरी रानटी ते रानटीच !" तो क्षणभरानें म्हणाला... "बँकांचं गौडबंगाल आमाला ठाऊकच नाय ! आदीचं करज फेडलं,....मग नवं लगीन केलं,...पोरासाठीं जीव टाकला, भावाच्या सोयरिकीला मदत केली,...आयाला डॉक्टर–दवा केला ! मग, मला त्यें यसनच !...संवयच पैसा बाळगायची झाली, कोन-कोन नडीला माझ्याकड मांगे; त्याला धा–पांच–वीस करून दिलं; पर संगत समदी हलक्यांची, चोरांची ! पैसा हाय असं बोलायची बी सोय नाय ! ते मला हातोहात नागवूं लागले !...तवां मग म्हनलं, आपल्या जन्मदात्या आयावर आपुन आतां विश्वास टाकावा; ती आपल्याला अंतरनार नाय ! .... पन तिनं—तिच्या रानटीपणानं, माजा साप गळा कापला...मामा—"

मी दचकलों नि पटकन म्हणालों, "म्हणजे रे ? तिनं काय केलं !!"

गोप्याच्या डोळ्यांत झर्रकन पाणी उभं राहिलं.

*

मला तें पाहून, गुदमरल्यासारखं झालं. त्याच्याकडे मी नुसता पहातच राहिलों.

तेवढ्यांत दोन तीन आवंढे गिळून तो म्हणाला, "मला शिनीमाची चटक नाय–दुसरं बी व्यसन नाय, काय नाय; तवा बचेल तो पैका गोळा करून, आपले हजार पुरे करायचे नि ते या डोळ्यांनीं या जन्मांत परतक्ष बगायचे होते मला ! मंग धाची नोट झाली, कीं ती आयेकडं द्यायचों; तशा



धा नोटा झाल्या, कीं स्टेशनमास्तरकडून शंबराची करायचों; पन मग, तशा एकदोन मोठ्या नोटा केल्यावर, त्यांच्या बी डोळ्यावर आलं ! मंग लोकांना उगीच कुनकुन नको लागायला, म्हणून पुढं धा धाच आयाकडे द्यायचों, अशी माजी आयाच माजी बँक—भरभर पैसा भरला त्या बँकीमदी मी–"

आश्चर्यानें मी त्याच्याकडे पहातच राहिलों !

त्या त्याच्या भावपूर्ण बडबडींत नि त्याच्या त्या चिकाटीच्या उद्यमाच्या वृत्तांतांत, मला तो पूर्वीच्या–माझ्या परिचयाचा–गोप्या दिसूं लागला होता. वाटलं, आज बेफाम पितोच तोच का हा गोप्या ?

"माझ्या चोपडींत सातशेंचा आंकडा भरला–" तो चमकत्या डोळ्यांनीं म्हणाला, "नि मला खूप खूप आनंद झाला ! वाटलं आपण बग बगतां अर्ध्या पाऊन वाटेवर आलों. आनखी तीनचार धाच्या नोटा हातांत आल्याबरोबर, कोन घरीं नायसं बगून आयाला मी म्हनलों— 'आये—काड आपला ऐवज ! दोन मोठ्या हाइत नि धाकट्या दोन विसा नि धा असाया हवत !' आया हंसून म्हनली—'काय करनार तूं त्यांचं ?' मी बी हसून म्हनलों–'डोळे भरून बगनार हाय, पयल्या ! तूं बी बग...'"

गोप्या बोलतां बोलतां, एकदम अडखळला––गप्प झाला.

तेवढ्यांतच त्याला एक मोठा हुंदकाहि आला––

*

त्यामुळें मी गोंधळलों; त्याच्या बोलण्याची वाट पाहिली. अखेर मी सहानुभूतीनें त्याला म्हणालों, "म्हणजे ? झालं काय ? खर्चून का टाकले तिनें ?...पण मग थोडे तरी असतील कीं नाहीं, त्यांतले ?....

गोप्या ओक्साबोक्शीं रडत, क्षणभर गप्पच राहिला––मग डोळे पुसत म्हणाला,––"नाय हो ऽ, मामा ! घडी घडी पोटाला चिमटा घेणारी माजीच आया ती !...तें खर्चून टाकले असतेन् तरी बी ब्येस झालं असतं ! ...पन् त्यांतलं शिल्लक राहिलं...ती माती...नुसती माती !..."

"काय म्हणतोस काय ?" मी दचकलों. "कुठं लपवलं होतंन् ?"

त्यानें आपल्या पँटच्या खिशांतलं जुनंसं पाकीट काढून उघडलं नि त्यांतली एक चपटी पुडी काढून माझ्या हातीं देत म्हटलं..."ही माजी एक मोठी नोट...बाकीच्यांच्या झालेल्या चाळणी, भुगा नि माती ! चुलीजवळच्या

कोपऱ्यांत, व्यवस्थित पुरून ठेवल्या होत्यान् तिनें, बाबाच्या तंबाखूच्या 'बटव्यांत घालून...'"

त्या पुडींत सरकारी छापाचा हिरवा तुकडा नि त्याबरोबरच बारीक बारीक लहान मोठे तुकडे नि पूड होती. मी थंडगार पडलों—

घामाच्या पैशावर चढलेलं तें अज्ञानाचं रोगण, ती माती, मला बघवेना कांहीं केल्या !

" मला रागाच्या झिनझिन्या आल्या. दुःखाचा हुंदका आला..." तो आतां तें बोलतांनाहि हुंदकतच होता. मन विरघळून, त्याचं पाणी पाणी त्याच्या डोळ्यामधून अविरत ओसरत होतं.

अखेर, भावना दडपून गोप्या पुढें क्षणभरानें म्हणाला, " ती माझी बायकू असती....तर तिचा मी त्या वख्ताला खूनच केला असता ! पण मंग, ती माजी आयाच परतक्ष !....हातून कसली आगळीक नको व्हायला, म्हणून...पैशाच्या....माज्या घामाच्या पैशाच्या मातीनें भरलेला तो बटवा मी हातांत घेतला नी येड्यावानी धांवत सुटलों. दूर दूर येकांतमदीं, ते तुकडे.... तो भुगा, वरखालीं करून, डोळे भरून पाह्यला; धाय मोकलून रडलों ! आन् मंग हातीं लागलेला हा त्यांतला एक तुकडा ! कागदांत घडी करून तो पाकिटांत आठवणीला ठेवला ! उरली माती मातींत उडवली. आन् तिनापैकीं धाची एक नोट हातांत धरून, मी थेट त्या, कदी नाय त्या बाटल्यावाल्याकडं धांवलों !....तवापासन् सुटी सवड असली, कीं....मी....नाय माजे पावच ....या बाजूला वळतात. तें घर मला खायला उठतं ! "

शेवटीं, रडतच गोप्या म्हणाला—"आंया आपल्याच घरांत आतां चोरासारकी गप गप वावरते ! तें मला काय केल्या बगवत नाय् !....तें तिचं माजं दोगांचंच गुपित—हाय् !....पन् आमी आतां त्याची, कीं कशाचीच वार्ता करीत नाय् ! माजं मन रातदीस कुरतडतं नि मला म्हनतं...'तूं रानटी...तूं अज्ञान !...तुला नाय् जमायचं त्यें !....तुला आतां हेंच जमल !... आखिर काय बी आव आनलास, तरी—समदं...समदं,—तूं बी, येकच !.... माती ! निसती माती !!

*



त्याचं झोपडं जवळ आलेलं दिसतांच,—तो आधिक कांहीं न बोलतां, पटकन् तिकडे वळला. मीहि मग त्याला अडवलं नाहीं त्या क्षणीं.

तीव्र दुःख, वैफल्य, संताप, पश्चात्ताप, सामाजिक जबाबदारी, अर्धवट विचारी जाणीव, सारं सारं त्या पाठमोऱ्या मूर्तींत मला दिसत होतं ! तो हाडाचाच नादी, व्यसनी होता.

' गोप्याचं गौप्य ' ठाऊक नाहीं, ते त्याला व्यसनी म्हणोत;.... त्याचा गाभा सुसंस्कृत माणसाचाच !—

● ● ●

# मोहाचीं फळं

ललाटींच्या रेषेचा हवाला देऊन आपल्या वांटच्या छोट्या-मोठ्या सुखदुःखांत कुणी समाधान मानलं, कीं, माझ्या कपाळाची रेषा मात्र सणकन् सणकते !

मला वाटतं, पुरुषाच्या भाग्यावर भिस्त टाकून नि पुरुष प्रयत्नाला पाठमोरा होऊन, 'असेल माझा हरि तर देईल खाटल्यावरी' असा दुबळा मंत्र जपत चालणारा तसला तो प्राणी काळपुरुषाला खुशाल आव्हान देवो बापडा ! आपलं नाहीं चालणार तसं—

कारण, माझ्या तरी वांट्याला जें थोडंसं भाग्य अधूनमधून आलं आहे, त्यासाठीं प्रयत्नांची माझ्या हातून चौपट तरी नासधूस झाली असल्याचा माझ्यापाशीं पुरावा आहे. कठोर प्रसंगानं, क्षणकाळ मन कमकुवत झालं कीं, आल्या अपयशाचं नि त्या दुःखांचं सारं खापर, आपल्या नशिबाच्या नशिबींच फोडून, सोपं समाधान मानण्याइतका मीहि एक माणूस आहें. पण म्हणून, पुन्हां नव्या प्रयत्नांचा पसारा मांडून बसण्याचं माझं व्यसनहि कधीं सुटलं नाहीं, सुटणार नाहीं, हेंहि तितकंच खरं !

इतकं असूनहि माझ्या लहानपणच्या एका अद्‌भुतरम्य योगायोगाची मला जेव्हां जेव्हां आठवण होते, तेव्हां तेव्हां आमचा विष्णु त्या प्रसंगीं जें म्हणाला त्याची नि त्यानें उल्लेखिलेल्या त्याच्या व माझ्या ललाटींच्या रेषांची आठवण होऊन आणि त्यांच्या परिमाणांचा मीं पाहिलेला पुरावा समोर उभा राहून, मला त्या साऱ्याच चमत्कारिक घटनेची गंमत वाटल्या-वांचून रहात नाहीं !

*

मे महिन्याची सुटी—'कँडिडेट क्लास' म्हणजे धड ना शाळकरी ना धड कॉलेज–स्टुडंट असल्या, नुकतंच वारा प्यालेल्या मनःस्थितींत, वार्षिक उपक्रमाला अनुसरून मी बहिणीकडे मुक्कामाला गेलों होतों.

लहान 'भाच्या' मंडळींबरोबर, पायीं, नाहीं तर स्वतः बैलगाडी हाकलत शेजारपाजारच्या खेड्यापाड्यांतल्या ओळखीअनोळखीच्या लोकांना भेटी देत 'ज्ञानाचा अर्धा प्याला' प्यालेल्या मामागिरीच्या ब्रह्मज्ञानी गोष्टी, त्या गरीब बिचाऱ्या पोरांवर वर्षायच्या नि दिवस खातपीत मजेंत घालवायचे ! हाच आमचा त्या काळांतला एकूण खाक्या !

माझ्या बहिणींच्या मामंजींच्या, म्हणजे अगदीं बड्याबड्यांच्या ओळखी. एक दिवस, आम्हीं ठराव पसार केला नि दुपारीं आगगाडींत बसून सोपाऱ्याच्या अहंमद शेटजींकडे गेलों.

तीन भाचे, एक भाची नि त्यांचा म्होरक्या मी ! मुलांना काळजीपूर्वक सांभाळण्याचा मक्ता मीं घेतला होता. त्यांच्या करड्या आजोबांना तसली हमी देणं, म्हणजे एक जोखमीचा, तारेवरला नाच च होता. पण ती जबाबदारी शिरावर नाहीं घेतली तर भटकायला मिळायचं कसं ? तें भागच होतं.

*

स्टेशनापासून पूसतपास करीत आम्ही अहंमदशेटजीच्या बंगल्याशीं पोंचलों, एकदांचे.

नेहमीं बहिणीच्या घरीं येतांजातांना पाहिलेल्या ओळखीच्या विष्णूनं, शेजारींच, उंच बैठकीवर बसलेल्या, लांबलचक पांढऱ्या दाढीवाल्या अहंमद शेटजींकडे चटकन् हसत हसत पुकार केला.—"या ऽ ! हं. बाबासाहेबांचीं नातवंडं आलीं.....रावसाहेबांचे चिरंजीव दिसताहेत बरोबर...."

त्यांच्या म्हाताऱ्या लालबुंद भव्य चेहऱ्यावर वत्सल छटा उमटून गेल्या. आपल्या मित्राच्या नातवंडांना लाडिवाळपणें जवळ ओढून त्यांची थोडी लाडीक विचारपूस करून, अखेर ते विष्णूकडे वळले.

तो जमाखर्चाच्या वह्यांच्या ढिगांत छातीएवढा पुरला गेला होता नि कानावर लेखणी ठेवून माना मोडून, एकदोन वह्यांचीं पानं पुढंमागं चाळत होता.

तोंच–अहंमद शेट म्हणाले—" चल....पुरे तुझं तें;...ऊठ बघूं आधीं. कधीं नव्हत, तीं हीं पोरं आलीं आहेत, आपल्या घरीं ! जा, आपल्या वाड्या दाखीव त्यांना; नि बघ, त्या पलीकडल्या वाडींत तो आपला बुटका नारळ आहे ना ? त्याचीं कवळींकवळीं शाहाळीं पाज यांना; त्या धावज्याला घेऊन जा. धावज्याऽ....तूं पण जा बघूं यांच्याबरोबर...कुणी दमलं तर उचलून घे !...जा...विष्णु !... उठा हां ऽ हां ऽ...बाबा लोक, दोन घटका मजा करा ! अं ऽ ऽ..."

कलमदाणींत लेखणी टाकून व वह्यांच्या उंच ढिगावरून लांब ढेंग टाकून, विष्णु उठला.

अंगणांत काम करीत असलेल्या बंडी-लंगोटीवाल्या धावज्यानें हसत पुढं होऊन माझ्या सर्वांत छोट्या भाचीला उचललं नि खांद्यावर घेतलं.

" अन् , हें बगा ऽ....बाबा लोक; संध्याकाळच्या गाडींत बसण्यापूर्वीं, हलवा खायला, दूध प्यायला, अहंमद–आजोबाला भेटायला परत या हं इकडे; विसरूं नका ! " असं शेटजी दाढी गोंजारत म्हणत होते.

सर्वांच्या वतीनं, मीच त्यांना ' हं ' म्हणलं नि पायऱ्या उतरून विष्णूच्या मागून आम्ही वाड्यांच्या वाटेला लागलों.

*

बागायतीच्या, भाजीपाल्याच्या, केळीच्या, नारळीपोफळीच्या तीनचार वाड्या आम्ही पायाखालून घातल्या. त्यांच्या लागवडी, उत्पन्नाचे इत्थंभूत हिशेबी इतिहास, चालतां चालतां आमच्यासमोर उभे करायला, शेठजींचा तो अव्वल कारकून...विष्णूच, होता बरोबर.

त्याची खुलवून चाललेली ती टकळी मुख्यतः मलाच उद्देशून होती. गर्क होऊन मीहि तें सारं ऐकत होतों. तो खुलला होता.

तासाभरानें, अखेर, आम्ही एका नव्या दाट हिरव्यागार वाडींत शिरलों. बलसारी लोखंडी रहाटाला जुंपलेला टोणगा तिथल्या प्रशस्त विहिरीचं पाणी काढत होता. ताडाच्या चोपतूनें झुळझुळत खालीं येणारं पाणी निरनिराळ्या पाटांतून, उन्हांत चमचमत फिरत होतं.



आम्ही रमतगमत पुढें पुढें जात होतों.

अखेर, कोपऱ्यावरच्या अेका लहानशा नारळीच्या झाडापाशीं, च लतां चालतां, विष्णु थबकला नि माझ्याकडे पाहून हसत म्हणाला," हं, ही हो ऽ मघा अहंमदशेटजी म्हणाले, ती त्यांची ' पलीकडली वाडी ' नि अिथं पाहिलांत ? हाच तो आमचा सुप्रसिद्ध नारळ–मोहाचा नारळ ! "

*

नारळाकडे मीं पाहिलं–होता तीन अेक पुरुष अुंच; विस्तारहि मध्यमच. पण कसा अगदीं टवटवीत दिसत होता. पांच सहाच पेंडी लागल्या होत्या त्याला. त्याच्या खालीं उभा राहात, वर न्याहाळून पाहात मी म्हणालों, " मोहाचा ? म्हणजे ? ? "

" म्हणजे कुणालाहि अगदीं मोह पाडील असा ! " स्वतःच्याच शाब्दिक कोटीवर हसून, विष्णु क्षणभरानं पुढं म्हणाला, " तुम्ही अजून मोहाचा नारळ नाहीं पाहिलेला...? नाहीं खाल्लेला ? वाः...मग फुकट शिकलांत अितकं तुम्ही ! मामासाहेब, जगाची अजून अर्धीदेखील खरी कल्पना नाहीं तुम्हांला ! आश्चर्य आहे ! !..."

" नाहीं, नाहीं...तसं अैकलंय हो ऽ मीं;...पण..." त्यानें दिलेल्या माझ्या अज्ञानाचा निर्वाळा मला खपला नव्हता, पण माझं खरंखुरं अज्ञान कायमच होतं; म्हंणून, नुसता घुटमुळलों मी–

" अैकलं असेल हो तुम्हीं, मामासाहेब ! " चाणाक्षपणं तो प्रसंग जाणून तडजोडीची भाषा करण्याच्या स्वरांत, विष्णु पटकन् म्हणाला, " पण असला न्यारा मोहाचा नारळ तुम्हीं नक्कीच पाहिला नसेल ! अेखाद्याला आपण म्हणतों, ' वाढलाय नुसता ताडमाड. '–पण हा माड तर माडाअितकाहि उंच नाहीं ! पण महाराज ! ' लहान मूर्ति–उदंड कीर्ति ' असं मोठं गुणी ध्यान आहे हें ! अगदीं अमृतान्चंच झाड म्हणानां ! कल्पवृक्षच आहे बेटा !"

" म्हणजे खालीं उभं राहून मनांत आणूं तें तें देतो म्हणतां हा ऽ ? " मी हसून किंचित् खवचटपणें त्याला अडवीत म्हणालों.

" नाहीं, नाहीं ! विष मागितलंत तुम्ही, तर कसं देणार बरं तो तुम्हांला ? फक्त अमृतच द्यायचं, एवढी एक मर्यादा घालून घेतली आहे त्यानं

आपल्याला ! '' माझ्यावर युक्तिवादाची कुरघोडी केल्याचं समाधान विष्णूच्या चेहऱ्यावर दिसत होतं.

"म्हणजे असं बघा" क्षणभरानें विष्णु म्हणाला, "इतकीं वर्षं पाहतोंय ना आम्ही याला; एकूण बारापंधराच पेंडी येतात. दर वेळीं पुन्हां प्रत्येक पेंडीला बारापंधराच नारळ लागायचे, हेंहि ठरलेलें; जास्त लागले चुकून, तर लहान लहान असतांनाच ते झडायचे ! पण मग प्रत्येक फळ पाहिलंतना कसं पपनसापेक्षांहि मोठं आहे तें ? असं म्हणतात, 'देवाची करणी नि नारळांत पाणी;' पण महाराजा, इथल्या प्रत्येकांत पाणी नाहीं, साक्षात् अमृत आहे, अमृत–तुडुंब भरलेलं ! खोबऱ्याचा थर चांगला अंगठाभर जाड...त्याच्यावर पुन्हां चांगला बोटभर असतो साखरी थर, मलईसारखा ! आतां तुकडा काढून तोंडांत टाकाल आर्धा, तेव्हां सांगा मला–आंतल्या आंत विरघळून जाईल बरफीसारखा–कणभर चोथ्याचंसुद्धां नांव नका काढूं ! हं...अशी आहे गंमत."

त्याचं तें 'मोह-महात्म्य' 'शनिमहात्म्या'सारखं वाढवून, तितक्याच भाविकतेनं–तो मला सांगत होता. भक्तानें केलेली देवाची एकतर्फी स्तुति तशीच अतिशयोक्तिपूर्ण असायची, या विचारानें, शंकित मनानें, मी स्वतःशीं हसत आहें, इतक्यांत, विष्णूच जणुं एकदम भानावर येऊन पुन्हा म्हणाला, "पण तें कशाला ? प्रत्यक्ष सारं पाहालच कीं तुम्ही आतां. हे तुम्ही नि हा नारळ; हा सूर्य, हा जयद्रथ ! ... बघत काय ऱ्हायलास, धावज्या ऽ ? चल, चढ कीं लेका ऽ वर–"

*

धावज्या पटकन बेडकासारखा उडया मारीत वर चढला.

सरावलेल्या दृष्टीनें विष्णु खालूनच डोळा फिरवून म्हणत होता "हं... यांना कवळीं शाहाळींच देऊंया जरा आपण... कोणती पेंड काढशील ? अं ऽ ?... ती ? ती नको... अंहंऽ, ती पण नको– त्याच्या वरची... पली कडली रेऽ... हं तीच ! दोर आहे ना ? हं ... अलगद उतरव, बरं का ?"

आम्ही सगळे थोडं लांब उभं राहून, ती गंमत पाहात होतों.

धावज्यानं उतरवलेली पेंड, धारेच्या विळ्यानं सोलण्यांत त्याला एकीकडे मदत करतां करतां, एकीकडे मला सस्मित चेहऱ्यानं विष्णु सांगत होता,



"मनांतली शंका दिसतेय स्पष्ट तुमच्या चेहऱ्यावर ! पण आतां एकच घोट नि एकच घांस घ्या ! माझ्या प्रत्येक शब्दाची शंभर टक्के खात्री पटेल तुम्हांला. म्हणाल, काय जादूटोणा आहे कीं काय !"

सोललेल्या पहिल्या शाहाळ्यावर माथ्याशीं धावज्यानं अलगद विळ्याचा एक फटका मारला, तें उघडलं नि माझ्यापुढं धरलं.

मींहि विष्णूच्या बडबडीनं उत्सुकलेल्या मनानं हात यांत्रिकपणें पुढं केला.

तोंच, विष्णू बेचैनानं मधें हात धरून म्हणाला, "हं हं हं !... थांबा. सारं शिस्तींत होऊं द्या जरा. श्रीमंत बाबासाहेबांच्या छोट्या नातीला सुरुवात करूं द्या ! लहान मूल देव असतं– तेव्हां देवाला नैवेद्य आधीं !"

त्यानंच तिच्या तोंडाला तें उघडं शाहाळं लावलं. तिनं घोट घेतला, मिटक्या मारल्या, घटघट सारं संपवलं.

किती प्रफुल्ल झाला होता तिचा चेहरा त्या वेळीं !

तेवढ्यांत, आंतला गर विळ्यानं खरवडून धावज्यानं नरोटी तिच्यापुढं केली. ते तुकडेहि मटमट खात ती आमच्याकडे पाहून हसत होती.

माझी उत्सुकता तर क्षणाक्षणाला इकडे वाढतच होती. पण कलावंत विष्णूनं लहानापासून सुरुवात केलेली असल्यामुळं, सर्वांत मोठ्या मामाला आपली मामागिरी आंतल्या आंत दडपणं भाग झालं होतं. विष्णूच्या अध्यक्षतेखालीं टकरेपणें त्या पोरांकडे आपली पाळी येईतों नुसतं पाहात बसण्यावांचून दुसरं गत्यंतरच नव्हतं मला ! त्यांतच पुन्हां अधूनमधून माझ्याकडे पाहात विष्णु मिस्किल हसत होता....

अखेर, झालं एकदाचं सर्वांचं ! एक मोठं फळ तासून त्याचं तोंड धावज्याकडून उघडून घेत, विष्णु बऱ्याच वेळानं बोलला, "हं ...घ्या.... आतां मामासाहेब ! आली तुमची पाळी; पाहा जगांत मिळणारं स्वर्गीचं अमृत ! – निराशा नाहीं होणार... आहांतच म्हणा नशीबवान तुम्ही ! जो तो आपलं नशीब बरोबर घेऊनच जगांत शिरतो."

प्रथम मी जरा धडधडत्या छातीनं नि थरथरत्या हातानंच त्याच्या हातून तें घेतलं; घुटमळत, तें तोंडाला लावलं; तरीहि, विष्णू टक लावून–कां कोण जाणे–माझ्या तोंडावरील भाव निरखत होता.

त्या शहाळ्याचं पाणी खरोखरच अतिशय गार, अतिशय मधुर, कल्पनातीत मधुर होतं.

मग धावज्यानं दिलेला गर मी तोंडांत टाकला.

" खाल्लीत ना स्वर्गातली बर्फी, मामासाहेब ? " विष्णु माझ्या तोंडाकडे पाहून हसत होता.

*

प्रत्येकानें तशीं दोन दोन शाहाळीं पाणी नि गर फस्त करून ढेकर दिल्यावर, अखेरचा तोंडांत शिरणारा तुकडा मिटक्या मारत गिळून, मी समाधानी हास्य केलं नि विष्णूला आपुलकीनं म्हणालों. " पण...आतां तुम्ही पण एक घ्या कीं शाहाळं, उरलेल्यांतलं, विष्णुपंत !– तीनचार आहेत अजून...."

कां कोण जाणे, इतका वेळ खेळकरपणें हसणाऱ्या, बोलणाऱ्या विष्णूचा चेहरा खर्कन् पालटला !

किंचित् घुटमळून क्षणभरानें तो अस्पष्टपणें बोलला, " छे, छेः, तेवढं मात्र नका सांगू.–अशी विषाची परीक्षा नको घ्यायला ! ! "

ते उद्‌गार, तो त्याच्या चेहऱ्यावरला भाव–मला तर आश्चर्याचा धक्काच बसला !

" म्हणजे ? विषाची परीक्षा ? ?...ती कशी ? अमृत ना हें ? ? तुम्हीच म्हणालांत मघां, विष मागितलंत तरी नाहीं मिळणार या इथं ! " मी गोंधळून म्हणालों.

विष्णु त्यावर हसला खरा. पण त्यांत, मला अगम्य अशी खिन्नताच अधिक होती.

मग क्षणभरानं नाइलाजानं बोलल्याप्रमाणं. तो म्हणाला, " त्यांतला तुम्ही खरा अर्थ समजलांत नाहीं, राव ! माझं मघाचंहि खरं;...नि आतां म्हणालों मी, तेंहि खरं !...हा कल्पवृक्ष अमृतच देतो; पण...पण...त्याची दुसरी बाजू नाहीं ठाऊक तुम्हांला,...म्हणून, आग्रह करताहां तुम्ही मला ! हमने घी देखा है–और बडगा भी देखा है. "

काय चमत्कारिक माणूस हा ! त्याच्या त्या संदिग्ध उद्‌गारानं, माझं कोडं तर अधिकच दाट झालं.



" त्याचं असं आहे, मामासाहेब—" विष्णूनंच तेवढ्यांत पुनः सुरुवात केली, " हा वृक्षराज बारापंधरा पेंडी देतो—पण त्यांतल्या एकदोन तरी हटकून साध्या नारळाच्या असतात, ज्या मोहाच्या पेंडी असतात, त्यांतल्या प्रत्येकींत हटकून दोनतीन तरी अगदीं साधे नारळ असतात ! सारीं दिसायला वरून इतरांसारखींच;--पण कांहींत अमृत; कांहींत साधंसुधं पाणी,....गर खाल्लात तर तोंडांत चोथा घुटमळेल ! "

हें काय आणखीं नवीनच ? त्यानं म्हटलेलं लक्षांत घेऊन मीं पेंडींतल्या उरलेल्या चार शाहाळ्यांकडे अेकदां गोंधळून पाहिलं.

तोंच, विष्णु अेकदम म्हणाला, " आतांपर्यंतसुद्धां माझ्या मनाला काळजीच वाटत होती. प्रत्येकाच्या वांट्याला येतंय ना मोहाचंच फळ ? पण तुम्ही सारींच निराळीं माणसं ना ! प्रत्येक मोठंमोठं नशीब घेऊन जन्माला आलेलं ! रांकेनं दोनदोन फळं प्यालांत, खाल्लींत. तरी ही ग्यानबाची मेख, तुमच्या कुणाच्या ध्यानीं येण्याचं कारणच पडलं नाहीं ! कशी येणार ? कायसं म्हणतात ना ? 'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टो ऽभिजायते !' मग ? तुमच्यासारख्यांच्या तोंडांत, पाणी प्यायला गेलांत तरी अमृतच पडायचं ! नि उलट आमच्यासारखा एखादा अमृत प्यायला म्हणून आशेनं पुढं झाला, अगदीं कल्पवृक्षाच्या छायेंत असला तरी...."

" हं हं अशा अर्थानं विषाची परीक्षा म्हणतां, होय ? " मी त्याच्या खिन्न पण आश्चर्यकारक स्पष्टीकरणांतूनहि स्पष्टार्थ काढीत म्हणालों, " पण मग, विष्णुपंत, चार फळं शिल्लक आहेत, अजून; प्रत्येक पेंडींतल्या दोन साध्या फळांचाच हिशेब सांगितलांत. तें कांहीं नाहीं;...अेक घेतलंच पाहिजे तुम्हीं ! "

तितक्याच खिन्नपणें हसून, विष्णु हात पुढं करीत म्हणाला, " बरं तर.... जशी तुमची अिच्छा ! जसा तुमचा आग्रह ! ....घेतों विषाची परीक्षा;... होऊं द्या तुमचं समाधान !... तुमच्याच हातानं निवडून द्या..." तेव्हां, उरलेल्या चारांतलं, चांगलं, मोठं नि तकतकीतं फळ निवडून, धावज्याकडून सोलून उघडून घेऊन, मीं विष्णूच्या हातीं दिलं. तो, म्हणाला, " तुमची अिच्छा ! "

त्या वेळच्या त्याच्या हालचालींची क्षणभर मला गंमत—पण खिन्न गंमतच वाटली. जणुं औषधाचा प्याला हातीं घेऊन, माणसानं पिण्याचा धीर करीत घुटमळावं, तशी अळंटळं करीत होता तो!

अखेर, तोंडाजवळ नेऊनहि, त्यानं तो परत खालीं आणला. अेका बाजूस हळूच कलवला नि हातावर थोडं ओतून तीर्थासारखं एक आचमनच घेतलं.

दुसऱ्याच क्षणीं केवढ्या मोठ्यानं, एखाद्या वेड्यासारखाच तो खदखदून हसत म्हणाला, "तुम्हीं थाप नको म्हणायला; हा माझा नारळ!...पूर्वीचा दोन वेळचा तोच अनुभव आहे. होऊंद्या आतां खात्री तुमची! घ्या, झाली म्हटल्याप्रमाणं—माझी विषाची परीक्षा? माझ्यासाठीं पॅकबंद सीलबंद करून ठेवलेलं कल्पवृक्षाखालचं विष हें"....

मी तें हातीं घेतलं, खाल्लं. तो म्हणत होता तें पुरेपूर खरं होतं. पाणी पचपचीत; खोबऱ्यांत चोथा!

केवढं आश्चर्य वाटलं मला! उरलेल्या तीन फळांकडे पाहून मी म्हणालों, "काय चमत्कार आहे! थांबा तर मग!"

त्यांतला मुद्दाम एक बारकासा निवडून, मीं तो उघडवून, माझ्या मोठ्या भाच्याकडे दिला. त्याच्या पूर्वीसारख्याच मिटक्या; कातळ्यांचे पूर्वीसारखेच बोकणे!....

मीं चव घेतली; पूर्वीचाच गोड अनुभव!

"खरं ना? आहे ना ही विषाची परीक्षा?" विजयी स्वरांत, पण विषण्ण हंसत विष्णु म्हणाला.

"नाहीं, अजून दोन आहेत, प्रयोग पुरा करायला—ठरायला." मी हट्टास पेटल्याप्रमाणं उरलेल्या दोहोंतला मोठा धावज्याकडे देत म्हणालों, "दे रे उघडून हा विष्णुपंतांना."

"अ हं ऽ क्!....माझी पाळी संपली. धावज्यालाच खाऊं द्या तो आतां. विष्णु खवचट हसून पुढं म्हणाला, "हं....खा रे धावज्या, मोहाचा नारळ लेकाऽ!"

तो सोलून, धावज्यानं त्याची टोपी उघडली आणि तो तोंडाला लावणार अितक्यांत माझ्या मनांतच अेक नवी चलबिचल झाली.



वाटलं, 'हाच तो दुसरा साधा नारळ पचपचीत पाण्याचा, चोथ्याचा! म्हणजे विष्णूचंच गणित पुन्हां बरोबर ठरेल!....हें नाहीं उपयोगी—'

तसा मी ओरडलों, "थांब!" नि त्याच्या हातून, जवळजवळ तो हिसकूनच घेत म्हणालों, "तो उरलेलाच तूं खा, धावज्या; हा मी घेतों."

तोंच माझी भाची कुरकुरली, "अं ऽ! मला देऽ रेऽ तो मामा!"

मला तें पटलं पटकन्; ती लहान म्हणून व शिवाय पुन्हा माझ्या पुराव्यालाहि त्यामुळं बाध येणार नाहीं म्हणून; मी तिची समजूत करीत म्हणालों "बरं बरं, अर्धं तुझं, अर्धं माझं."

विष्णु अिकडे गालांतल्या गालांत हसत होता.

तेवढ्यांत भाची प्याली, मी प्यालों. खोबरं पाणी, तसंच पूर्वीसारखं मधुर नि गोड.

केवढं आश्चर्य!—खदखदत ओरडून विष्णु म्हणाला,

"झालं?....घेतलंत ना आमच्या धावज्याच्या तोंडचं अमृत, मामासाहेब? अहोऽ त्या भांडीघाश्याच्या नशिबीं कुठचं अमृत?....प्रथम त्याच्या हातीं दिलंत तरी त्याच्या वांटचं नव्हतं तें;...म्हणूनच तर, आयत्या वेळीं दुसरी बुद्धि तुम्हांला सुचली—तसं तें परत काढून घेण्याची!"

तें विष्णु बोलत नव्हता. त्याच्यांत त्या क्षणीं संचारलेला विघ्नसंतोषी—दुःखातच सुख मानणारा-नतद्रष्ट वकील बोलत होता!

*

तरी संशोधकाची चिकाटी न सोडतां, मी उरलेल्या एकुलत्या एका नारळाकडे पाहात विष्णूला विचारलं, "का होऽ विष्णुपंत, तुमच्या हिशेबानें एका पेंडींत साधे नारळ किती?"

"एक, दोन, कधीं कधीं तीनहि!" विष्णु तरीसुद्धां हसतच होता. "पण बहुतेक दोन!...कां बरं? काय करायचा विचार आहे आतां?"

"बस्स्!....हा उरलेला नारळ, बाबासाहेबांचे दोघे नातूच खातील." विष्णूचा विजयी अडाखा धसास लावण्याच्या इर्ष्येनें मी म्हणालों, "तुमच्या पैकीं कुणालाहि खाऊं देणार नाहीं तो, मी!—"

"बरं. तसं का होऊन जाऊंद्या ना, मामासाहेब!" विष्णु जणुं खात्रीच्या आत्मविश्वासानं म्हणाला.

माझे भाचे आयत्या वेळीं पोट भरल्याच्या तक्रारी करूं लागतांच, मला प्रयोग ऐन वेळीं कुणीं उधळून टाकल्याचा संताप आला; नि मामागिरीच्या भाषेंत मी ओरडलों, " तें कांहीं नाहीं ! खोबरं नका खाऊं हवं तर; पण पाणी प्यालंच पाहिजे. "

" असं करा, " विष्णूनें हसतहसत तडजोड काढली नि सुचवली, " पाणी हे दोघे पितील, थोडं खोबरं तुम्ही खा; नि आम्ही मोहाचा नारळ खावा असं तुम्हांला वाटतच असलं, तर उरलेलं द्या आम्हां दोघांना ! बरं, साध्या शहाळ्याचं खोबरं कांहीं वाईट नाहीं लागत;....आम्हांला आहे संवय... "

विष्णूचा तो नियम आतां हमखास माझ्याच बाजूचा या खात्रीनं मीहि म्हणालों, " अगदीं योग्य तडजोड ! योग्य सूचना ! ! "

माझ्या दोघां भाच्यांच्या चेहऱ्याकडे पुढले कांहीं क्षण, लॉटरीचा निकाल ऐकायला गेलेल्या तिकीटवाल्या माणसासारखं मी पाहात होतों.

उलट विष्णूनं आम्हां सर्वांकडे पाहिलं. बक्षीस आपल्यालाच लागल्याची आगाऊ बित्तंबातमी लागलेल्या माणसाप्रमाणं तो पाहात होता.

*

तोंच, दोघांनाहि आश्चर्याचा एकच धक्का बसला ! ' नको नको ' म्हणणारे माझे दोघेहि भाचे, पाण्यासाठीं नि खोबऱ्यासाठीं आपसांत भांडूं लागले होते आतां !–

" आश्चर्य ! नियम खोटाच तर तुमचा, विष्णुपंत ! " मी चमकून म्हणालों.

आश्चर्य तर खरंच !–आळख्या पेंडींत, आज फक्त ऐकच साधा नारळ ! विष्णु प्रथम किंचित् ओशाळला.

मला कृतकृत्य वाटलं.

पण पुन्हां नवं अवसान आणून, शरण येण्याऐवजीं विष्णु म्हणाला, " पण, म्हणजे, माझा नियम कसा खोटा ? आमच्या तोंडांत तर नाहीं ना पडत अमृत ? "

" कां ऽ बरं ?... खोबरं कुणीं खायचं ठरलंय् आपलं आधींच ? " मी विष्णूला मुद्दाम खिजवलं.



पण, निरुत्तर न होतां, तत्त्वज्ञान्याचा आव आणून विष्णु म्हणाला, " तें मान्य !....पण मामासाहेऽब आम्हांला मिळणारं अमृत...तो मोहाचा नारळ यांच्या नशिबानं ! आमच्या नव्हे ! ! एकेकाच्या ललाटींच्या रेषा असतात बरं ऽ या !... अहो ऽ शेटजींच्या, नाहींतर तुमच्यासारख्यांच्या, भाग्यानंच, आमच्यासारख्या खर्डेघाश्या नि भांडीघाश्यांच्या ललाटींच्या रेषा उमटल्या तर उमटायच्या ! नि त्यांच्याच नशिबानं आम्हांला कधीं चुकलामाकला अमृतलाभ झाला तर व्हायचा ! स्वतःचं नशीब कुठलं इतकं शिकंदर ? उलट त्याचं मवासारखं–"

विष्णु मोठमोठ्यानं हसत होता. पण, त्याच्या कांहींशा विरस झालेल्या चेहऱ्यावर, खिन्नतेचं दाट पटलच उमटलेलं, पसरलेलं दिसत होतं.

ठरल्याप्रमाणं दोन वांटण्या करून, त्यांतल्या आपल्या वांट्याचं तें गोड-गोड कोवळंकोवळं मोहाचं खोबरं खातांखातां, त्याच्या चेहऱ्यावरील भावांत कडवटपणाचंच अधिक मिश्रण होत होतं !....जणुं, जिवावर उदार होऊनच तो तें खात असल्यासारखं वाटत होतं, मला !...

*

त्यावेळीं नि त्यानंतर, ज्या ज्या वेळीं ती सर्व घटना मला आठवते, त्या त्या वेळीं, त्या विचित्र, अद्भुतरम्य योगायोगाच्या प्रत्यक्ष अनुभवाचा मला एक अभिनव नि मिश्र धक्का बसतो !

आणि त्या कडवट गमतीबरोबरच, त्यावेळचे ते कांहींशा पिळवटलेल्या स्वरांतले विष्णूचे खिन्न शब्द कानांवर येऊन आदळतात, " आमच्यासारख्या, अगदीं कल्पवृक्षाच्या छायेंत असला, तरी प्रत्यक्ष अमृताचांहि विष व्हायचं ! तेव्हां, नकोच ती विषाची परीक्षा ! असं असतं...या असतात एकेकाच्या ललाटींच्या रेषा ! "

कांहीं कांहीं घटना जीवनांत अद्भुतच घडतात यांत संशय नाहीं.

● ● ●

# नो क री ला ग ली

कर्मधर्मसंयोग मला माहीत आहे. पण मला वाटतं—हा घडला तो एक धर्मकर्म संयोगच होता !

गेल्या आठवड्यांत मला मुंबईत लागलेल्या नोकरीची गोष्ट.

सगळेच कांहीं ‘झुलते’ नि राणीचे बाग पहायला तेवढे मुंबईला येत नाहींत. यावेळीं तरी, माझं नशीब नव्यानें पहायलाच मुंबईला आलों होतों मी.

मोठ्या आशेनें केलेला एक स्वतंत्र धंदा अंगावरून गेला नि पक्षघाता-प्रमाणें मी मनानें लुळा झालों ! तेव्हां दोघां दोस्तांच्या दाढ्यांना हात लावून पांचां पांचाच्या दोन कुबड्या खांकेजवळच्या खिशांत ढकलून, त्यावर मी माझा जीव कसाबसा उभा केला होता. नि डिप्लोमा सर्टिफिकिटांसह, माझ्या नशीबाची कांस धरून, मुंबई गांठली होती.

तसं एक नशीब होतं, म्हणूनच, तिकिटासह माझा मुंबईचा प्रतिष्ठित प्रवास झाला. दुसरं नशीब होतं, म्हणूनच, दोस्तांचे चार पैसे बाळगून मुंब-ईत उतरूं शकलों. तिसरं नशीब होतं, म्हणूनच, पत्ता सांगायला, झोंपायला, व निदान सकाळचा चहा प्यायला, फूटपाथऐवजीं, दादरला रहाणाऱ्या चुलत भावाचा ब्लॉक मला होता. चौथं नशीब होतं, म्हणूनच, अंगावरचे कपडे वुलनचे नि फॅशनेबल होते...

दरम्यान, तशी मुंबई क्षणाक्षणाला बदलत आली होती. त्याला माझा इलाज नव्हता. तरी, कुठेंहि एकटं फिरण्याइकी माझी लायकी होती, खासच !

*

कारण गजबजलेले मोठमोठे रस्ते क्रॉस करूनहि जिवंत राहतां येणं; मागल्या बाजूस तोंड करून, मुंबईकर ऐटींत ट्राममधून खालीं उतरण्याचे (गांवढळ व अशास्त्रीय) प्रयोग न करतां कुठूनहि कुठं ७ नया पैशांच्या ‘डायरेक्ट’ तिकिटांत जाऊन येणं; एखाद्या कागदावरचा अस्पष्ट पत्ता स्पष्ट-पणें प्रत्यक्ष शोधून काढून, कोणाच्याहि दारांत न गांगरतां साक्षात् जाऊन उभं राहणं; असल्या कला ज्याला येतात, त्याची मुंबईत फिरण्याची लायकी नाहीं असं कोण म्हणेल ? मला तें सारं सारं जमतं !—

पुन्हां असं—रेल्वे पुलाच्या टोंकाला एखादं कोंडाळं दिसलं आणि उपडे राजे—राण्या—गुलाम बिनचूक ओळखतांच, कोणाच्या पांच रुपयाच्या नोटीचे दहा रुपये देणारी उदारमतवादी दाती कुबेर मंडळी व भोंवतालीं गर्दी कर-णारी बघी झुंबड असली, तरी मोहानें तिथें न थांबण्याइतका, मी आतां स्थितप्रज्ञ झालों आहें.

सोन्याचा तुकडा उगीच रस्त्यांत पडणार नाहीं आणि पडला तरी आप-ल्याला सांपडल्यावर तो (अगदीं पितळेच्या भावानें) माझ्यासारख्या अनो-ळखी माणसाला तो उचलून कोणी देणं कधीं शक्य नाहीं, एवढं साधं ज्ञान समजण्याइतकी अक्कल, मला आतां नक्कीच आली आहे.

हातांतलं तथाकथित उंची (‘सोळा ज्युएल’) घड्याळ म्हणा, किंवा टॅायपेन वा हिऱ्याची आंगठी म्हणा—झटकन् हात पुढें करून, बंदुकीप्रमाणें धरीत, जाणाऱ्या येणाऱ्या एखाद्या बावळट दिसणाऱ्या खावजाच्या तोंडावर, त्याची गुणवर्णनपर सुरस आख्यायिका एकदम फेकून त्याला चकित करणारे व सवंग सौदा करणारे कित्येक चमत्कारिक प्राणी, आतां कोटांतल्या फुट-पाथवर फिरतां फिरतां माझ्या चांगलेच परिचयाचे झाले होते व बिनधोक शीरसलामतीनें मी त्यांच्या गराड्यामधूनहि वावरूं शकत होतों.

नाहीं म्हणायला, मी कधीं मधीं थबकत असतों, तो ‘कोडॅक’च्या अकराशें रुपयांच्या ‘रिफ्लेक्स’ व इतर कॅमेऱ्यांसमोर; वुलन पँट इ. तयार कपड्यांसमोर;—(किंमतींना मोठमोठ्या तांबड्या फुल्या मारून ‘एका आण्यांत एक रुपया’ कमी झाल्याचा अभास निर्माण करणाऱ्या कार्डांचा खच पाडलेल्या) विविध सेल वस्तूंसमोर !

अशा वेळीं, दरिद्री डोळ्यांना मेजवानी मिळते व त्या वस्तूंशीं सुसंबद्ध अशा माझ्या भावी काळच्या ' फाइव्ह इयर प्लॅन ' नें माझं मन भारून भेदरून जातं. माझा आशाळभूतपणा मला अगदीं मंत्रमुग्ध करून, तास तास तिथं उभा ठेवी. इतका, कीं, इतरांनीं मला तिथं दुकानदारांनींच उभा केलेला एखादा मेणाचा पुतळा समजावं !

तरी पण, त्यांत भीति नसते; खिशांत पाकीट असलं, तरी त्यांत फारसं कांहीं असल्याचं माझ्या माहितींत नसतं. पुन्हां माझे डोळे व मी बाहेर, तर त्या मूल्यवान वस्तू आंत असतात. मध्यें दोन तीन पुरुष उंच अशी एक अभेद्य एक इंची कांच असते. तिच्यापुढें माझा क्षणिक चोरटा पुरुषार्थ क्षणार्धांत लोपून जातो!—

त्या ठिसूळ क्षणभंगुर कांचेला ' अभेद्य ' म्हणण्याचं कारण तरी एव-ढंच, कीं, माझ्या अब्रूचीहि कांच, अजून, माझ्या मतें, संपूर्ण ' अभेद्य ' आहे. त्यामुळेंच, माझ्या डोळ्यांमागून माझं मन जरी त्या ' अभेद्य ' कांचां-तून आंत शिरून गेलं तरी त्यावेळीं माझे हात मात्र असतात तिथंच, बाहेर राहतात. चार इतर सभ्य लोकांत माझी गणना असते.

अशा अगदीं सर्वांगीण कडेकोट बंदोबस्तानें मी माझी मुंबईतील ती पाय-पीट चालवतों.

पण माझ्या नशिबाचा हात धरून व हातांत ( अकलेच्या माझ्या पूर्व प्रदर्शनाची गोळा केलेलीं ) सर्टिफिकिटं धरून, मी तशी अहोरात्र पायपीट करत असतांहि, प्रत्येक वेळीं, माझं नशीब माझ्या पायाला लोंबकळतें व माझे पाय पुढेंच पडत नाहींतसे होतात, माझी मला लाख समजत असते—पण, इतर कुणाला माझी किंमतच नसते. जरूरीच नसते, त्या अवाढव्य मुंबईंत !

खिशांतले पैसे कमी कमी होत चालले, कीं, ओशाळा जीव, कुठल्या तरी मित्राकडे यथेच्छ जेवल्याची सज्जड थाप, थारा देणाऱ्या नातेवाइकाला अगदीं रुबाबांत मारून जातो; पण त्यानंतर, अखेर, पांचच मिनिटांनीं बाहेर पडून, कोपऱ्यावरच्या जरा बारक्याशा इराण्याकडे बन-चहा मारून, दिवसभर पाणीदार ढेकर देत राहतो.

असं चारदोनदां झालं, कीं, आपणच मग, उलट आपल्या नशिबाला हळूच एकांतांत टपली मारतो नि ओरडतो—' हं, बस्स झाली तुझी सदाची रड !



मुंबई कांहीं तुझ्या बापाची नाहीं, युगांतापर्यंत—राहायला ! तिथं नशिबाऽ तुझं तूं पहा ! तूं वाटेल तें कर ! पण, तिकिटाचे पैसे खिशांत आहेत तोंपर्यंतच मी आपला स्वतःला गाडींत कोंबून, घर गांठणार आहें, सकाळीं !—'

माझं तसंच होऊन, मी पुन्हां—' नोकरीपेशा हा निष्क्रिय मेंढ्यांचा ! त्यापेक्षां स्वतंत्र धंदा बरा. मुंबई म्हणजे बकाल ! सब गोलंकार ! आपल्याला न झेपणारी ! त्यापेक्षां लहानसं नि रिकामं रिकामं असलं तरी आपलं गांव नि आपलं घर, तें आपलं—' अशा शांत निर्णयापर्यंत येऊन पोहोंचलों होतों.

दुपारीं, त्या कडवट समाधानांतच भरती करून, अखेर मी, भावाच्या बिऱ्हाडीं शिरलों होतों.

शनिवार म्हणून, तोहि लौकर घरीं आला होता. त्याचा बटाटे पोहे चहा चालला होता. तेव्हां नाइलाज झाला. 'खूप खाल्लंय रेऽ' असं तोंडानं म्हणत म्हणत, अखेर, त्याच्या आग्रहानें, त्याच्याबरोबर मीहि खूप खूप खाल्लं. सकाळीं, उद्यांच्या तिकिटासाठीं मी जेवणाला दिलेल्या फांट्याचा, तसा आपोआप सफाईनें वचपा निघाला. जीवाला जरा बरं वाटलं !—

इथें एक गैरसमज मात्र होऊं देतां कामा नये. त्यानें माझ्या पदरीं उगीच कृतघ्नपणा यायचा !—

हा माझा भाऊ, मुंबईत येण्याच्या माझ्या उद्देशाबाबत बेदरकार भावशून्य होता, असं मुळींच नव्हे. माझ्या तेथील वाढत्या उपस्थितीबद्दल त्याला कसलं वैषम्य वाटण्याचं प्रत्यक्षाप्रत्यक्षहि त्याच्या बोलण्या वागण्यांत नव्हतं; किंब-हुना, माझ्या त्या ' तसल्या ' संशोधनाचे मुंबईतील प्रयोग ' खास लोकाग्रहास्तव ' आणखी एखादा आठवडा वाढले असते तरी त्या सद्गृहस्थाची त्या गोष्टीला मुळींच ना नव्हती—नि याची मलाहि पुरी खात्री होती.

पण मग, त्या बाबतींत झटपट स्वतःच कांहीं सक्रिय करायला तोहि कांहीं देव नव्हता; तो कुठल्या कॉंग्रेसचा अध्यक्ष, चिटणीस, पुढारीहि नव्हता; तो कोणी मंत्री नव्हता; कीं, त्याचा सेक्रेटरी किंवा दुसरा कुणी अधिकारीहि नव्हता. एखाद्या साध्या बऱ्या पगाराच्या कारकुनानें, या दिवसांत,—चहा, बटाटेपोहे, अधून मधून आपण घरांत असतांना आग्रहानें जेवण, झोपायला खाट—गादी नि दिलखुलास गप्पागोष्टी, याहून—प्रत्यक्ष अगदीं ब्रह्मदेव पाहुणा

आला तरी–त्याला अधिक काय द्यावं ?–आणखी हातून होण्यासारख्या खटपटी त्याच्या चालूच होत्याल.

पण, मला आपलं, माझं अंथरूण पाहून पाय पसरायचे होते; नि म्हणूनच सकाळीं उठून मी तिकीट काढून गाडी पकडणार होतों !

*

ती माझी घोषणा ऐकतांच तो थोडा आश्चर्यानें चमकला. ‘त्या ह्याचं रे काय झालं ?, ‘आणि त्याला पुन्हां कां नाहीं तूं भेटलास ?’ ‘घेलाभाई सोमवारीं येईल बघ दिल्लीहून–’ असल्या पूर्ण सहानुभूतीपूर्ण प्रश्नोत्तरांच्या जाळ्यांत अडकवून, त्यानें माझी मुक्काम वाढवण्याची आपल्या बाजूनें मला मोकळीक ठेवली.

पण तरी, माझ्या महत्त्वाच्या काल्पनिक ॲपॉइंटमेण्टसाठीं, गांवीं जायचंच म्हणून मी पुन्हां नक्की केलंच–

तेव्हां मग एकदम आठवल्यासारखं करून त्यानें खिशांतून आपलं पैशाचं पाकीट काढलं नि पांचाच्या तीन व दहाची एक अशा चार नोटा माझ्यापुढें सरकवीत तो म्हणाला, “त्या बाबूरावाचे एवढे पैसे त्यांना मी दिले आहेत, म्हणून सांग. ते फिरतीवर गेले असले, तर चार दोन दिवसांत घराकडे परततीलच तेव्हां मात्र, सवड काढून हे दे, म्हणजे झालं.”

मला क्षणभर गुदमरल्यासारखं झालं, क्षणभर–आणखी दोन दिवस, आल्यासारखी खटपट करावी, असा मोहहि झाला.

पण मग क्षणार्धांत; त्या प्रसंगामुळेंच, माझ्या अदृश्य अब्रूच्या अभेद्य कांचेचा मला अभिमान वाटला; त्या नैतिक विचारानें, माझ्या छातीनें विस्तार केला; आणि माझ्या मनानें, धोपटमार्गी स्थितिस्थापकत्वानें, पलटीं खाली व परत जाण्याचा माझा बेत पुन्हां नक्की झाला.

अशा मनाच्या दुहेरी रस्सीखेंचीतच मी ‘कामाला जाऊन रात्रीं येतों’ असें भावाला म्हणून दारांतून बाहेर पडलों.

*

माणसांच मन फार हलकं असतं हेंच खरं. तें दुमडलं तर ढाक्याच्या ऐतिहासिक तलम धोतराप्रमाणें आंब्याच्या कोयींत राहील; नाहींतर, दडपण



जातांच, विस्तार पावून, बघतां बघतां, साऱ्या जगभर पसरेल !– विश्वांतहि तें सामावणार नाहीं !

मग माझ्याच मनानं काय पाप केलं होतं ?

बाबूरावांचे पैसे भावानें माझ्या खिशांत टाकले. पण त्याची खोटी ऊब, क्षणार्धांत, मला भासूं लागली. व्यवहारांत, अगदीं त्याच (दिलेल्या नंबराच्या) नोटा ज्याच्या त्याला नेऊन देण्याची, नक्कीच पद्धत नसते. नेऊन देणारा कांहीं पोष्टमन नसतो. तेव्हां एखाद्या दिवसाचा विलंब अगदीं क्षम्य असतो. बाबूरावांनीं फिरतीवर जाणं व अगदीं आठवडाभर परत न येणं, हें अगदीं शक्य असतं व त्यावर, आपलंहि कसलंच नियंत्रण नसतं !–शिवाय, आपलीं यायचीं येणीं साधारणतः येत नाहींत, मिळत नाहींत, हें जरी अनुभवसिद्ध आणि खरं असलं, तरी याच आठ दिवसांत, तीं साफ येणारच नाहींत, असा कांहीं सिद्धांत कोणाला सांगतां येणार नाहीं. विशेषतः, वेळ पडल्यास, आपल्या नेहमींच्या बैठकींत मित्रांकडून (दहा नाहीं निदान पांच तरी) उभे करून, कमी पडणाऱ्या रकमेची वेळेवर भरपाई करून टाकणं आपल्याला अगदींच अशक्य नसतं !

पण या इथं मात्र, या सर्व शोभिवंत दिसणाऱ्या व वाटणाऱ्या कल्पनांना व माझ्याकडे असलेल्या, माझ्या अब्रूच्या अभेद्य कांचेला एकदम अज्ञात ठोसा बसला ! नि, तिला भेगा पडून, तुकडे उडण्याचा आवाजहि, माझ्या कानांवर आदळला !

*

पण, काय आश्चर्य ! त्याच वेळीं, चालत चालत, मी टिळकपुला-पलीकडच्या गर्दीतून जात असतां, एकदम एक प्रत्यक्ष आवाजहि माझ्या कानांवर आदळला–“शे ऽ ट.... गरीबावर दया करा — धर्म करा —”

पटकन् भानावर येऊन, मी त्या दिशेनें पाहिलं—

ती एक विटकसंच लुगडं नेसलेली, जुना फाटलेला (पण, फॅशनेबल शिलाईचा) ब्लाऊज घातलेली, कपाळाला बारीक कुंकू व डोळ्यांत थोडं काजळ घातलेली, बाविशी–पंचविशीकडील बाई होती, तिच्या पायांजवळ एक दोनतीन वर्षांचं सद्रा घातलेलं शेंबडं नागडं पोर बसून, तिच्या पायांतल्या फाटक्या चपला ओढत, कांहीं बडबड करीत होतं.

आपल्याच विचारांत, मी किती गर्क झालों होतों, याच्या एकदम झालेल्या जाणीवेमुळेंच, मी दचकलों होतों—पण, जसं कांहीं झालंच नाहीं, ऐकलंच नाहीं, असा मी पुढें चालूं लागलों.

तेवढ्यांत, त्या पोराला चटकन् कडेवर आदळून तीहि माझ्या मागून चालूं लागली. बोलूंहि लागली—" असं नका करूं, शेट ! या गरीब पोराकडे तरी पहा ! ....तुम्हीच त्याचे मायबाप ! ...त्यानें तुमच्या नाहीं तर कुणाच्या हो ऽ तोंडाकडे पाहायचं ? "

पंधरा वीस पावलं पुढें भरभर चालून गेलों; तरी तिची ती बडबड व धिंडका माझ्या मागोमागच येत असलेली पाहून, शेवटीं, मी चालतां चालतां थबकलों व मागें वळून, तिच्याकडे जरा रागानेंच पाहिलं—

तेव्हां, ती पण थांबली...माझ्याकडे पाहून खुदकन् हसली—नि कडेवरील मुलाचा चिमुकला हातच पुढें करून ती अजीजीनें म्हणाली— " असं ऽ काय बरं ?....द्या ऽ ना ऽ आमाला खाऊला. काहींतरी, म्हणावं ऽ मायबाप..."

तेवढ्यांत, तें पोरहि ' द्या—द्या....' करीत हंसलं— तीहि, थोड्या तिरक्या मिस्किल डोळयांनीं माझ्याकडे पहात, गालांतल्या गालांत हंसत होती.

मी तर क्षणभर सर्दच झालों. भांबावलों. कसं कोण जाणें, मीहीपॉकेट—मधून यांत्रिकपणें माझं पाकीट काढलं,—नाण्याच्या कप्प्यांत हात घातला नि हाताला लागलेलं दोन आण्यांचं नाणं त्या पोराच्या हातावर ठेवलं.

तिनें लागलीच, त्याचा तो छोटा हात वर धरून हलवीत, म्हटलं— ता ऽ ता ऽ... ता ऽ ता म्हणावं— "

मी अधिकच गोंधळलों. मला तिचा रागहि आला. आणि चार चौघांत अधिक कसला मूर्खपणा पदरीं येऊं नये, म्हणून मी शेजारीं दिव्याच्या झगझगाटांत दिसणारी ' मटन प्लेट हाऊस ' ची पाटी पाहून, चटकन आंत शिरलों व एका रिकाम्या टेबलाजवळील खुर्चीचा आसरा घेतला.

*

अर्थात्, समोर पोऱ्या आला. मला त्याच्या ' बोलक्या यादीनें विव्हळ केलें—आणि मी ऑर्डरहि देऊन बसलों—



समोर टेबलावर पसरलेल्या प्लेटी पाहून, चार दिवस एकसंधी खाद्य खात आलेल्या मनाला, बरंहि वाटत होतं. पण मग, खातां खातां, जणुं एखादं हाडुक घशाला टोंचल्यासारखंहि वाटत होतं.

तरी पुन्हां, स्वतःशींच हंसत, खातां, खातां, विचार येत होते— " छोड देव, यार !— इसमें क्या बडी बात है ?— ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ! देहस्य भस्मीभूते पुनरागमनं कुतः? देहधर्म आहेत हे. ते कुणाला सुटतात थोडेच ? "

देहधर्म ? खरंच ! ते कुणालाहि सुटलेले नाहींत. राजा असो वा भिकारी ती मघांची भिकारीण नाहीं का ? नेहमीं काय करत असेल, देव जाणे; अन् तें बिचारं तिचं पोर अरे रे....

काऊंटरवर पाकिटांतल्या चिल्लरींतले पावणेदोन रुपये पडले तेव्हां, माझ्या ध्यानीं आलं. " आपल्या तिकिटाचे जपून ठेवलेले निम्मे पैसे ते ! तेच आपण खाल्ले ! "

आणि पायऱ्या उतरतां उतरतां, माझं धाबं क्षणभर दणाणलंहि—

पण मग पुन्हां वाटलं—" कशाला एवढा गोंधळ ? —गांवीं,—बाबूरावांना पैसे द्यायचे आहेत ! इथं घरीं गेल्यावर, भावाला नव्हे ! काय मोठासा गुन्हा करतो आहेस ? पण मग, आतां इतकं झाल्यावर एक मस्त पानपट्टी हवींच नि एवढ्या जड जेवणावर, निदान अर्धं पाकीट कॅप्स्टन किंवा गोल्ड फ्लेक..."

अखेर, धुराचे फवारे सोडीतच, मी गर्दींत मिसळलों—" परिस्थिति ! पैसा विश्वास ! अब्रू !! हं....सारं मोठं गमतीचंच आहे जगांतलं ! मानलं तर देव ! नाहींतर दगड !! द्या सोडून ! असल्या वायफळ विचारानेंच, माणसाचा एखाद वेळीं दगड होऊन जायचा ! आतां आपण जरा फिरायला तरी जाऊं— "

*

मी माझ्या घड्याळांत पाहिलं. पावणेनऊ होत आले होते.

भोंवतीं पाहिलं... चालत चालत, मी शिवाजीपार्कच्या रस्त्यानें समुद्राजवळपास आलों होतों—पांच पंचवीस यार्डांवर धक्का दिसत होता—

थोडा वेळ निवांत बसावं, म्हणून मी धक्क्यावर चढलों—

समुद्र फेसाळत होता. मी माझ्या तंद्रींत होतों.

दुसरी कीं तिसरी सिगारेट, मी शिलगावली होती. मला सुस्तावल्यासारखं झालं होतं.

मनांत आलं—गौरीसमोरच्या सायबासारखं धक्क्यावर काय अवघडून बसायचं– ? वाळूंत थोडं ऐसपैस पडूं या–कीं !...जाऊं थोड्या वेळानें..."

तेव्हां, खालीं उतरून, दहा पंधरा पावलं पुढें जाऊन, मी स्वच्छ भाग पाहिला व तिथंच वुलन पँटसह बसकण ठोकली.

आजूबाजूला वर्दळ नव्हती. समुद्राचा जोराचा आवाज तेवढा कानावर पडत होता. कोट नीट सांवरून, मी पसरलों; व पडल्या पडल्या, धूर सोडूं लागलों––

चारदोन मिनिटंच गेलीं असतील, एवढंच. कदाचित्, वाऱ्याच्या झुळकीनें माझा डोळा लागला असेल कीं काय कोण जाणे...

पण एकदम दचकूनच, मी भानावर आलों.

कोणीतरी माझ्या जवळच बसल्याची मला चाहूल लागली.

मी पटकन् उठून बसलों आणि आतां बाजूला होणार, तोंच, बांगड्यांचा सूक्ष्म आवाज माझ्या कानांवर पडला.

त्याबरोबरच एकदम बायकी उद्गारहि ऐकूं आले–" थांबा ना ! चाललांत कुठें ? बसा कीं !...असं काय तें ?–"

" कोण ? " मी पुन्हां दचकून उठून उभा राहिलों व टवकारून पाहिलं—

त्या अंधुकशा प्रकाशांतहि, ती मघाची बाई मी पटकन ओळखली....तें पोरगं, तिच्या कडेवर बसल्या बसल्याच, पेंगुळत होतं आतां...

तीहि अगदीं माझ्याजवळ, मला जवळ जवळ खेटून, उभी राहिली.

काय होत आहे, तें मलाच समजत नव्हतं...

तेवढ्यांत माझा एक हात धरून, ती म्हणाली, ' काढा ! खिशांतलं पाकीट निघूं द्या बाहेर !–नि मग खुशाल जा ! '

" चल हट...नादान कुठची..." असं अगदीं रागारागानें म्हणत, मी तिला हिसडून बाजूला होऊं लागलों.



पण, तेवढ्यांतच, तिनें डाव्या हातांतला निजलेला पोरगा एकदम वाळूंत सोडला; नि दोन्हीं हातांनीं माझं मनगट घट्ट पकडत ती दरडावणीच्या स्वरांत म्हणाली– " हं, खबरदार इथून हलला तर !– मी आतां हात तर सोडणार नाहींच तुमचा पण मोठ्यानें किंकाळी मात्र फोडीन !–चला ! पाकीट काढा आधीं ऽ – "

त्या अनपेक्षित घटनेनें, मी तर अधिकच गोंधळून गेलों...

तरी समजावणीच्या पद्धतीनें मी म्हणालों...." मी तुला मघां धर्म केला त्याचं हें फळ काय ?...चल सोड हात ! नि हो दूर, हलकट...."

दोन्ही हातांनीं तिनें घट्ट पकडलेलं माझं मनगट तिला ढकलून मी कसंबसं सोडवलं.

मी दूर होत आहेसं दिसतांच, आपल्या अस्ताव्यस्त ढळलेल्या पदरासह तसंच धांवत पुढें येऊन, पुन्हां माझा हात धरण्याचा प्रयत्न करीत, ती ओरडली..." गरीब बायाबापड्याची अशी अब्रू घेऊन आतां पळाल कुठं ? –कुठं फेडाल हीं पापं ? ? –"

आतां मात्र माझ्या डोक्यावर मोठमोठे दगड पडल्यासारखं झालं–त्यावर काय बोलावं तेंच मला सुचेना—" काय ? आतां कां दांतखिळी बसली?... बोला ऽ बोला ऽ ना ! ! " ती मोठमोठ्यानें ओरडत होती–आणि मी चालूं लागतांच, माझ्या आड पुन्हां पुन्हां येत होती.

आतां काय करावं, तेंच मला समजत नव्हतं !—

" काय हो, ऽ मिस्टर ? काय, आहे काय भानगड ही ? अं ऽ ?...."

तेवढ्यांत, धक्क्याच्या बाजूनें एक उंच गृहस्थ पुढें होऊन, मलाच उद्देशून, जरा अधिकारवाणीनें बोलूं लागला–"तुम्ही तर अगदीं जंटलमन दिसतां !– आणि ही बाई हो कोण ?–नि तुम्ही इथं कसे ?–काय चाललंय् इथं ? ?— बोला ? "

त्या दुहेरी आरडाओरडींत, तें वाळूंत झोपलेलं पोर तेवढ्यांतच उठलं नि रडत रडत, आम्ही उभे होतों तिकडे धांवत आलं...

त्याला जवळ ओढून घेत, ती बया म्हणाली–" उगी ऽ उगी ऽ माझ्या बाळा !–मला मारलं नाही कांहीं त्यांनीं !–वाटलं होतं खूप...पण काय ? नशीब तुझं फुटकं !...त्याला काय करूं ?...

आतां मात्र, माझ्या अंगाला, मला नकळतच, घाम फुटूं लागला !...

तेवढ्यांत, तो उंचेला मनुष्य, आपली उंच टोपी मागें सारीत, तिला म्हणाला–" हा मुलगा तुमचा बाई ?...आणि मग, हे ऽ कोण ?–"

तिथल्या अंधुक उजेडांत त्याचे सोन्याचे पुढचे दोन दांत चकाकले. हातांतली लवंगी काठी आपल्या पायांतील बुटावर आपटून, तो मिस्किल हंसत माझ्याकडे व त्या बाईकडे क्षणभर पाहात राहिला....

इतक्यांत ती म्हणाली––" कसं सांगू मीं माझं दुर्दैव तुम्हाला ? तें हाच धुवूनच पाठीं लागलंय् माझ्या नि माझ्या या अनाथ पोराच्या ! तुमची पुरुषजात तेवढी निष्ठुर-दगडाच्या अंतः करणाची ! तुम्हांला काय मीं सांगणर नि कशी समजणार माझी. स्थिति ?–"

इतकं म्हणून, ती त्या पोराला कवटाळून ओक्सा-बोक्शी रडूंहि लागली.

मी आपला पाहातच राहिलों, त्या साऱ्या प्रकाराकडे !

' अस्सं ऽ ? आत्तां आलं सा ऽऽ रं ध्यानांत माझ्या ! " तो गृहस्थ, तेवढ्यांत मान हलवून मला म्हणाला. " मी पोलीस खात्यांतलाच माणूस आहे. आतां मिस्टर तुम्हाला दोघांना चौकीवर आलं पाहिजे– शहानिशा झाली पाहिजे ! चला––"

तें सारं कांहीं विद्युत् वेगानेंच घडत गेलं होतं.

पण आतां मात्र, माझी खरोखरच दांतखिळी बंद झाली होती––

" कशाला ?–तुम्ही पोलीस काय करणार नि देव आला तरी काय करणार माझ्या दुर्दैवाला ? " असं म्हणत, त्याच्या मागून ती रडत रडत चालूं लागली. " चला दादा ! मसणांत. की न्या ना मला यांच्या बरोबर...."

मी पाय खिळून जागींच थबकलों.

*

तेवढ्यांत, तो गृहस्थ मागें वळून, मला म्हणाला–" अहो ऽ मिस्टर ! चला चला–आतां आतां थांबून काय उपयोग ? काय सांगायचं असेल तें आमच्या इन्स्पेक्टरसाहेबांना सांगा– "

" अहो पण–हें ऽ तुम्ही– " मी बोलण्याचा प्रयत्न करीत होतों. पण, काय बोलावं, तेंच मला समजत नव्हतं !



रात्रीची वेळ, चौकी, ती बाई, तें पोर, इन्स्पेक्टर, जबानी, जमाव.

त्या पुढल्या साऱ्या दृश्यांनीं, आतां मात्र, माझ्या त्या अभेद्य कांचेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून, मला रक्तबंबाळ करणारा त्याचा एक भयानक वर्षावच माझ्या अंगावर होत असल्यासारखं, मला वाटत होतं–

" ऐकलं का ? चौकीवरच होऊं द्या सारं–" तो चालतां चालतां म्हणाला. " तुम्ही शिकलीं सवरलेलीं माणसं; हाताला धरून न्यायला नको कांहीं आम्ही तुम्हांला ! खरं–ना ? "

त्यामुळें मात्र, अगदीं नाइलाज होऊन मी त्या लटांबरांतून गपचूप पुढें चालूं लागलों––

इतक्यांत, दुसऱ्या बाजूनें एक सिल्क सूट वगैरे घातलेला अपटुडेट गृहस्थ जातां जातां थबकला; व पुढें होत, लंगी काठीवाल्याला म्हणाला " काय जमादारसाहेब ?.... कुठल्या कामगिरीला ?–आणि ही मंडळी कोण बरोबर ?

" अहो, मुंबई आहे ही, महाराज ! " जमादार व्यक्ति हंसत मागें आमच्याकडे पहात म्हणाली... " स्वप्नात सुद्धा येणार नाहीं कोणाच्या, हें असं कांहीं होतं, होईल, म्हणून !– अहो शिरसाट दुनिया झुकती है... झुकानेवाला चाहिये ! मुंबईचा हा समुद्र, ही बाई, तिचा १॥–२ वर्षांचा मुलगा...ते जंटलमन ! आलंच असेल ध्यानांत तुमच्या आतां... "

शिरसाट, जमादार, त्यांच्या मागून ती पोराला कडेवर घेतलेली बाई, थोड्या अंतरावर मी...

मला या चमत्कारिक उद्गारांच्या कचाट्यांतून, अनपेक्षित प्रसंगांतून नि अकारण नाचक्कीतून, सुटावं कसं, तेंच समजत नव्हत.

*

तेंवढ्यांत, चालतां चालतां शिरसाट मागें राहून माझ्या जवळून चालूं लागला व मला हळूंच म्हणाला..." काय राव ? कांहीं गोंधळ असला तर मला सांगा !....ती चौकी नि बिवकी, हवी ऽ हो ऽ कशाला–?...सत्रा वाटा असतांना, हा गोंधळ हो कशाला ?–"

" अहो, गोंधळ कसला ? ती बाई बघा पक्की लफंगी आहे !–" मी रागारागानें म्हणालों– " तिला धर्म केला ना मी ?...तेव्हां, त्याच वेळीं,

असलं नीच कृत्य सुचलं तिला !– पैशाचं पाकीट मागत होती....नाहींतर ओरडा करीन.... म्हणाली...आणि मग..."

" अस्सं ऽ अस्सं ऽ ! आलं ऽ ध्यानांत–! " शिरसाट आपुलकीच्या स्वरांत म्हणाला –" बरं केलंत ! अहो,....आपलं पाकीट काय वाटेवर पडलंय् ?– " हल्लीं मुंबईत हें फार झालंय् !–"

त्याच्या नोकझोकावरून व बोलण्यावरून, क्षणभर, माझ्या मनाला आसराहि वाटला.

तेवढ्यांत तो म्हणाला–" पण मग, या त्रांगड्यांतून आतां सुटणार कसं तुम्ही ?–...मी सांगूं ऽ हें पहा मिस्टर....काय नांव तुमचं ?–"

" सदाशिव सरसावंत ! कां बरं ? " मी उत्सकतेनें म्हणालों–

" सरसावंत ? ते यू. यू. सरसावंत इन्स्पेक्टर ... झालंच तर, हायकोर्टातले ते एम्. टी. सरसावंत ? त्यांना मी ओळखतों चांगला – ते तुमच्यांतलेच असतील. " शिरसाटनें, चालतां चालतां, माझाकडे पाहिलं.

तीं सारीं नांवं माझ्या कानावरचीं होतीं –

" बरं पण ते असो – सदाशिवराव – " शिरसाट समजावणीच्या स्वरांत म्हणाला.

"अशा वेळीं, आपली बाजू अगदीं — सूर्यप्रकाशासारखी सत्य असूनहि, फार खोल पाण्यांत शिरण्यांत अर्थ नसतो. अहो, ऽ हा बायकी मामला, कुठें फट् म्हणतां ब्रह्महत्या व्हायची ! हें पहा– या जमादारांनींच इथं मिटवून टाकलेलं बरं !म्हणजे, कबूल असाल, तर मी करतों त्याची समजूत– "

शिरसाट अधिक मागें रेंगाळून, त्यांनीं मला पुन्हां खूण केली.

आणि मी थांबल्यावर, ते म्हणाले–

" एक पांचांची नोट असेल तर द्या माझ्याकडे ! रामबाण लागेल शकांच नको ..."

यावेळीं मात्र मी पुरा गोंधळलों.

शिरसाट खरा, कीं, खोटा, ह्याबद्दल मला आतांपर्यंत संशय नव्हता. पण पुन्हां मन डळमळायचं ... संध्याकाळीं पाकिटांत शिरलेली दहाची एक



नवीन
रघुवीर सामंत वाङ्मय
❀ दिलजमाई ❀
लघु निबंध, पृ. १३०; मू. रु. ३–५०
❀ आपलें व्यक्तित्व ❀
[मानसशास्त्रीय 'स्वयंसंस्कार' पुस्तक]
[ पृ. १८४; मू. रु. ५–०० ]

विश्वासपात्र सुप्रसिद्ध
आरोग्य
ति ल गि री
सर्वत्र मिळतें.

ठेवीदार-सभासद
सहस्रांनी आहेत.
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
[ टे. नं. २७०९४ ]
गिरगांव, मुंबई ४.
– सोयीच्या शाखा –
फोर्ट, दादर, माहीम, वरळी,
पुणें, बेळगांव.
— आपली सर्वांगीण सेवा. —

## श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.

[ जन्म–२४ डिसेंबर १९०९ ]

- १९२९ सालीं 'प्रगती' मधून प्रसिद्ध झालेल्या 'शब्दचित्र' या अभिनव वाङ्मयप्रकारानें 'कुमार रघुवीर' या टोपण नांवाकडे मराठी रसिक प्रथम आकर्षिले गेले. त्या शब्दचित्राचा 'हृदय' हा पहिलाच संग्रह ( डि. १९३२ ) बराच गाजला व रसिकमान्य ठरला. त्या पाठोपाठ ( १९३३–३५ दरम्यान ) श्री. रघुवीर सामंतांनीं संपादिलेलें व मोठ्या उमेदीनें चालविलेलें, अभिजात अभिरुचीचें व उच्च दर्जाचें 'पारिजात' मासिक बरेंच रसिकप्रिय झालें.
- श्री. सामंताच्या आजवरच्या विविध वाङ्मयीन प्रकाशनांमध्यें शब्दचित्र, लघुकथा, लघुनिबंध, स्वभावचित्र, कादंबरी, 'सागा', काव्य, बालवाङ्मय, चरित्र—इत्यादि विविध वाङ्मय प्रकार समाविष्ट आहेत.
- याशिवाय, 'सुरंगीची वेणी' 'टॉम सॉयरची धाडसें', 'इसापनीति', 'मॉबी डिक' इ. सारख्या पुस्तकरूपांनीं त्यांनीं सुरस अनुवादहि केलेला आहे. असा सुमारें सहा हजार पृष्ठांचा त्यांचा प्रकाशित वाङ्मयप्रपंच आहे.
- यांतील कांहीं पुस्तकें विश्वविद्यालयीन व शालेय अभ्यासक्रमांत पाठ्यपुस्तकें वा पुरवणी पुस्तकें म्हणून नेमलीं गेलीं होतीं व त्यांतील अनेक वेंचक उतारे क्रमिक पुस्तकांमध्येंहि समाविष्ट झालेले आहेत.
- श्री. सामंतांनीं 'ज्योति' मासिक ( १९३९–४२ ) संपादून चालविलें होते. त्यांतूनच पुढें ( १९४२–४४ मध्यें ) 'अमर–ज्योति विभागाच्या रूपानें त्यांनीं योजनाबद्ध बाल–वाङ्मयाचा एक डोळ्यांत भरण्यासारखा प्रयोग करून पाहिला.
- अशा लेखन–प्रकाशन–व्यापांशिवाय, अध्यापक–मुख्याध्यापक या नात्यानेंहि श्री. सामंताचा गेलीं बावीसएक वर्षे शैक्षणिक क्षेत्राशीं घनिष्ट संबंध आहे. आकाशवाणीवरील नाट्य, काव्यगायन इ. त्यांचे छंदहि रसिकांना सुपरिचित आहेत.